CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, २५ नोव्हेंबर २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४२ वे अंक १० । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तृतीय सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांचा आज तिथीनुसार जन्मदिन

एखाद्या सभा-संमेलनाची व्यवस्था करणारा 'व्हॉलंटियर' म्हणजे आमचा स्वयंसेवक नव्हे. राष्ट्राची स्वत:हून सेवा करण्यासाठी, स्वत:ला अधिकाधिक योग्य बनविण्यासाठी सतत प्रयत्नशील असणारा, ही आमची 'स्वयम्सेवक' या शब्दाची संकल्पना आहे. त्याच्या या प्रयत्नांसाठी लागणारे सर्व वैचारिक अधिष्ठान त्याचे त्याने प्राप्त करून घ्यावे ही संघाची अपेक्षा असते.

**- बाळासाहेब देवरस**
रा. स्व. संघाचे तृतीय सरसंघचालक

## महत्त्वाचे

### नफावसुलीने बाजारात पडझड

**मुंबई :** भारतीय शेअर बाजारात सोमवारी मोठी अस्थिरता दिसून आली. कामकाजाची सुरुवात सकारात्मक झाली असली तरी दुपारनंतर गुंतवणूकदारांनी



जोरदार नफावसुली केल्याने बाजारात मोठी पडझड झाली. सकाळच्या तेजीनंतर दुपारी झालेल्या विक्रीमुळे प्रमुख निर्देशांक घसरणीसह बंद झाले. निर्देशांक ३३१ अंकांनी घसरून ८४९०० वर बंद झाला तर निफ्टीत १२७ अंकांची मोठी घसरण झाली आणि तो २५,९४१ वर बंद झाला. मुंबई बाजारातील ३० पैकी केवळ पाच कंपन्यांचे शेअर्स वधारले होते. त्यातही टेक महिंद्रामध्ये सर्वाधिक २.४ टक्क्यांची वाढ झाली. त्यापाठोपाठ एशियन पेण्ट्स, इन्फोसिस, अदानी पोर्ट आणि सन फार्माचे शेअर्सही तेजीत राहिले. याउलट, सर्वात मोठी घसरण बीईएलच्या शेअर्समध्ये नोंदविण्यात आली. महत्त्वाचे म्हणजे घसरणीचा हा सलग दुसरा दिवस आहे. मागील आठवड्यातील तेजीच्या सत्रानंतर ही घसरण आहे.

### मस्क यांच्या नेतृत्वातील अमेरिकी विभाग बंद

**वॉशिंग्टन डी.सी. :** अब्जाधीश उद्योगपती एलन मस्क यांच्या नेतृत्वाखालील अमेरिकन सरकारचे संरक्षण विभाग नियोजित वेळेच्या आठ महिने आधीच बंद करण्यात आले आहे. २० जानेवारी २०२५ रोजी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या कार्यकारी आदेशाने ते स्थापन करण्यात आले होते आणि ४ जुलै २०२६ पर्यंत ते कार्यरत राहणार होते. या विभागाने २.५ लाखांहून अधिक सरकारी कर्मचाऱ्यांना थेट त्यांच्या नोकऱ्यांवरून काढून टाकले होते किंवा त्यांना खरेदी आणि लवकर निवृत्तीचे पॅकेज दिले होते. हा विभाग एकेकाळी बराच सक्रिय होता, परंतु आता त्याचे उच्च अधिकारी वेगवेगळ्या सरकारी कार्यालयांमध्ये काम करत आहेत. सरकारला लहान, जलद आणि कमी खर्चिक बनवणे हा यामागील उद्देश होता.

### भारतीय संरक्षणमंत्र्यांचे विधान चिथावणीखोर
#### पाकिस्तान खवळला

**इस्लामाबाद :** पाकिस्तानच्या सिंध प्रांताचा संदर्भ देणाऱ्या भारतीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या विधानावर पाकिस्तानने आक्षेप घेतला आहे. पाकिस्तानने एक निवेदन जारी करून हे विधान खोटे, चिथावणीखोर आणि धोकादायक असल्याचे म्हटले आहे. पाकिस्तानने असे म्हटले आहे की, अशी विधाने आंतरराष्ट्रीय कायद्याच्या विरोधात आहेत आणि देशांमधील सीमा निश्चित करतात आणि भारतीय नेत्यांनी अशी विधाने करण्यापासून परावृत्त करावे अशी मागणी केली आहे. कारण त्यामुळे या प्रदेशात तणाव वाढू शकतो. राजनाथसिंह यांनी रविवारी म्हटले होते की, सिंध आज भारताचा भाग नसला, तरी संस्कृतीनुसार तो नेहमीच भारताचा भाग राहील. जमिनीचा प्रश्न आहे तर, सीमा कधी बदलेल हे कोणाला माहित आहे आणि उद्या सिंध भारतात परत येऊ शकते.

# जुबेर हंगरगेकरचे अक्कलकोट कनेक्शन?

## ● चौकशीसाठी पथक दाखल; उलटसुलट चर्चेला ऊत

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि २५ नोव्हेबर**

केंद्रीय गुप्तचर विभागाच्या टीमकडून अल कायदा व दहशतवादी संघटनेशी संबंध असल्यावरून मूळ सोलापूरच्या जुबेर हंगरगेकर याच्या संपर्कातील लोकांची शोध मोहीम सुरु असतानाच यास अक्कलकोट कनेक्शन आहे का याबाबतची चौकशी संबंधित विभागाच्या एका पथकाकडून शहर व परिसरात केल्याची चर्चा आहे. दहशतवाद हे भारतासमोरील सर्वात मोठ्या आव्हानांपैकी एक आहे. काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र एटीएसने संशयित दहशतवादी जुबेर हंगरगेकरला अटक केली होती. त्याच्यावर अल कायदा इन इंडियन सबकॉंटिनेन्ट (एक्यूआयएस) या दहशतवादी संघटनेच्या समर्थनार्थ जिहादचा प्रसार आणि प्रचार करण्याचा आरोप आहे.

महाराष्ट्रात ए.टी.एस. ची कारवाई सुरु असतानाच दिल्लीत बॉम्बस्फोट झाला. बॉम्बस्फोटानंतर ए.टी.एस. ने मुंब्रा व कोंढवा येथून जुबेरशी संबंधीत दोघांना ताब्यात घेतले. केंद्रीय गुप्तचर विभागाने संबंधीत जुबेर बाबत माहिती गोळा करताना त्याच्या संपर्कातील लोकांकडील माहिती जमा करण्यात आली असतानाच अक्कलकोट कनेक्शन आहे का? त्या दृष्टीने संबंधित विभागाच्या पथकाने शहर परिसरात चौकशी केल्याची चर्चा आहे. सदर घटनेबाबत शहर व तालुक्यात खळबळ उडाली असून, जुबेरच्या संपर्कातील अक्कलकोटचे कोण याबाबतची चर्चा रंगू लागली आहे. या बाबत कसून चौकशी करण्याची मागणी शहर व तालुकावासियातून होत आहे. यापूर्वी देखील अशाच एका प्रकरणी संबंधित विभाग शहर व परिसरात चौकशीसाठी आलेले होते.






### संशयित दहशतवादी हंगरगेकर नेमका आहे तरी कोण?

झुबेर हंगरगेकर हा सॉफफ्टवेअर इंजिनिअर असून त्याने गेल्या १५ वर्षांपासून पुण्यातील हिंजवडी आणि कल्याणीनगर येथील नामांकित आयटी कंपन्यांमध्ये नोकरी केलेली आहे. झुबेरने सोलापूर सोशल असोसिएशन उर्दू हायस्कूलमध्ये शिक्षण घेतले, त्यानंतर त्याने सोलापूरच्या वालचंद इन्स्टिट्यूट ऑफफ टेक्नॉलॉजीम धून बी.ई पदवी घेतली आहे. आता तो एका दहशतवादी संघटनेसाठी काम करत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

**जिहादसाठी तरुणांना मार्गदर्शन**

हंगरगेकर आंतरराष्ट्रीय टेलिग्राम गटांसह अनेक टेलिग्राम ग्रुपचा सदस्य आहे, हे ग्रुप अतिरेकी सामग्री प्रसारित करतात. अनेक तरुणांना त्याने 'जिहाद करण्याचे मार्ग' यावर व्याख्यान दिले आहे. जिहाद हाच भारतात खिलाफफत आणण्याचा आणि शरियत शासन स्थापित करण्याचा एकमेव मार्ग आहे असं त्याने तरूणांच्या मनावर कोरण्याचा प्रयत्न केला. तसेच लोकशाही शरियतच्या विरोधात असल्याचा उपदेश त्याने अनेकांना दिला आहे. सध्या तपास यंत्रणा झुबेरची कसून चौकशी करत असून तो किती तरुणांच्या संपर्कात आला? त्याने कुठे हल्ला करण्याची योजना आखली होती? त्याच्यासोबत आणखी कोण-कोण या गुन्ह्यात सहभागी आहे? याचा तपास केला जात आहे. तसेच तो आतापर्यंत कोणत्या दहशतवाद्यांच्या संपर्कात आला याचाही शोध घेतला जात आहे.

**१० वर्षांपासून दहशतवाद्यांच्या संपर्कात**

समोर आलेल्या माहितीनुसार झुबेर २०१५ मध्ये दहशतवादाशी संबंधित व्यक्तीच्या संपर्कात आला, त्याने अतिरेकी धर्मोपदेशकांकडून मिळणारे कट्टरपंथी साहित्य वाचण्यास सुरुवात केली. आयईडी बनवणे, एकटे हल्ले करणे आणि गनिमी कारवाया करणे यावरील पुस्तकांचा हंगरगेकरने अभ्यास केला. कालांतराने तो गनिमी युद्ध, विविध प्रकारचे आयईडी तयार करण्यात पारंगत बनला.

# 'वीरू' काळाच्या पडद्याआड

## ● सुवर्णयुगातील एक तारा निखळला...!
## ● अभिनेते धर्मेंद्र यांचे निधन, देशात शोककळा



**◆ मुंबई, २४ नोव्हेंबर**

**हिंदी सिनेसृष्टीत सहा दशकांहून अधिक काळ गाजवणारे पद्म पुरस्कार विजेते अभिनेता धर्मेंद्र यांचे दीर्घ आजाराने सोमवारी निधन झाले. ते ८९ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर विले पार्ले येथील स्मशानभूमीत कुटुंबीय, नातेवाईक, सिनेजगतातील दिग्गज आणि असंख्य चाहत्यांच्या उपस्थितीत अन्त्यसंस्कार करण्यात आला.**

सनी देओल यांनी पित्याला मुखाग्नी दिला. धर्मेंद्र बऱ्याच दिवसांपासून आजारी होते. त्यांना श्वास घेण्यास त्रास होत होता. ३१ ऑक्टोबर रोजी प्रकृती बिघडल्याने ब्रीच कॅण्डी हॉस्पिटलमध्ये त्यांना दाखल करण्यात आले. १० नोव्हेंबरपासूनच ते जीवन रक्षक प्रणालीवर होते. त्यांच्या पहिल्या पत्नी प्रकाश कौर यांच्या इच्छेनुसार १२ नोव्हेंबर रोजी घरी आणण्यात आले. तेथेच त्यांची पूर्ण काळजी घेतली जात होती. मात्र, त्यांचे शरीर उपचारांना प्रतिसाद देत नव्हते. अखेर सोमवारी दुपारी १ वाजताच्या सुमारास पोलिसांच्या माध्यमातून कुटुंबीयांनी धर्मेंद्र यांच्या निधनाची माहिती दिली.

विले पार्ले येथील स्मशानभूमीत सिनेजगतातील कलाकारांनी धर्मेंद्र यांना अखेरचा निरोप दिला. अन्त्यसंस्काराला अमिताभ बच्चन, सलीम खान यांच्यासह शाहरूख खान, आमीर खान, अक्षय कुमार, संजय दत्त, सलमान खान, अभिषेक बच्चन, रणवीरसिंह, दीपिका पदुकोण यांच्यासह मायानगरीतील कलाकार उपस्थित होते. (वृत्तसंस्था)

### शोकमग्न हेमा मालिनी

अभिनेत्री आणि खासदार हेमा मालिनी या धर्मेंद्र यांच्या पत्नी आहेत. धर्मेंद्र यांच्या अन्त्यसंस्कारासाठी हेमा मालिनी स्मशानभूमीत पोहोचल्या तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावरील दु:ख स्पष्टपणे दिसत होते. आयुष्याचा जोडीदार गमावल्याच्या भावना त्यांच्या डोळ्यात तरळत होत्या. तरीही त्यांनी अतिशय धीरोदात्तपणे या प्रसंगात मुलींना सांभाळत पतीला अखेरचा निरोप दिला.

### सिनेसृष्टीतील देखणा 'ही-मॅन'
### एका युगाचा अंत...

(पान २ वर)

### जय-वीरूची अजरामर जोडी तुटली!

'शोले' चित्रपटाने सिनेसृष्टीत इतिहास निर्माण केला. या चित्रपटाने दिलेली जय-वीरूची जोडी प्रत्यक्ष जीवनातही तितकीच पक्क्या मैत्रीचे उदाहरण होती. आता धर्मेंद्र यांच्या जाण्याने जय-वीरूची ही जोडी कायमची तुटली आहे. आपल्या प्रिय मित्राला अखेरचा निरोप देताना अमिताभ बच्चन यांना अश्रू अनावर झाले होते.

ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांचे जाणे भारतीय सिनेसृष्टीची मोठी हानी आहे. कलाकार म्हणून त्यांनी सिनेसृष्टीत दिलेले योगदान नव्या कलाकारांसाठी आदर्श ठरले आहे.
**- द्रौपदी मुर्मू** । राष्ट्रपती

धर्मेंद्रजी यांच्या निधनाने एका युगाचा अंत झाला आहे. ते असे कलाकार होते ज्यांनी आपल्या भूमिकांमधून लोकप्रियता मिळवली. आपला साधेपणा, विनम्रता आणि प्रेमळ वागणुकीसाठी ते ख्यात होते.
**- नरेंद्र मोदी** । पंतप्रधान

भारतीय सिनेजगताच्या सुवर्णकाळाचे साक्षीदार राहिलेले अभिनेते धर्मेंद्र अतिशय कसलेले कलावंत होते. अगदी रोमॅंटिक भूमिकांपासून आशयगर्भ अभिनयापर्यंत त्यांचा हातखंडा होता. त्यांचे जाणे चाहत्यांसाठी मोठा आघात आहे.
**- देवेंद्र फडणवीस** । मुख्यमंत्री

धर्मेंद्र हे केवळ एक उत्तम अभिनेताच नव्हते तर अतिशय साधे, सरळ व्यक्ती होते. माझे त्यांच्याशी आणि त्यांच्या कुटुंबीयांशी अतिशय जिव्हाळ्याचे संबंध आहेत. सिनेसृष्टीतील त्यांचे योगदान कधीही विसरले जाऊ शकत नाही.
**- नितीन गडकरी** । केंद्रीय मंत्री

# न्या. सूर्य कांत यांनी घेतली सरन्यायाधीशपदाची शपथ

**◆ नवी दिल्ली, २४ नोव्हेंबर**

न्या. सूर्य कांत यांनी आज सर्वोच्च न्यायालयाचे ५३ वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतली. राष्ट्रपती भवनात झालेल्या समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी न्या. सूर्य कांत यांना सरन्यायाधीशपदाची शपथ दिली.

९ फेब्रुवारी २०२७ पर्यंत न्या. सूर्य कांत यांचा सरन्यायाधीश म्हणून कार्यकाळ आहे.

शपथग्रहण समारंभाला उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला, संरक्षणमंत्री राजनाथसिंह, गृहमंत्री अमित शाह, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे.पी. नड्डा, वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियुष गोयल, कायदा मंत्री अर्जनराम मेघवाल, अवजड उद्योगमंत्री एच.डी. कुमारस्वामी, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीपसिंग पुरी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

नवे सरन्यायाधीश म्हणून विद्यमान सरन्यायाधीश भूषण गवई यांनी न्या. सूर्यकांत यांच्या नावाची शिफारस केली होती. ३० ऑक्टोबर २०२५ ला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ही शिफारस मान्य करत न्या. सूर्यकांत यांची नवे सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती केली. मुळचे हरयाणाचे निवासी असलेले न्या. सूर्यकांत यांनी पंजाब आणि हरयाणा उच्च न्यायालयात वकिली केली. हरयाणातून सरन्यायाधीश झालेले न्या. सूर्यकांत हे पहिले आहेत. ९ जानेवारी २००४ ला पंजाब हरयाणा उच्च न्यायालयात स्थायी न्यायमूर्ती म्हणून त्यांची निवड झाली. नंतर हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयात ते मुख्य न्यायाधीश झाले. २४ मे २०१९ ला सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून त्यांची नियुक्ती झाली. अनेक गाजलेले निर्णय त्यांनी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून दिले. (तभा वृत्तसेवा)



राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडून पद आणि गोपनीयतेची शपथ घेताना न्यायमूर्ती सूर्य कांत

## अनंत गर्जेला गुरुवारपर्यंत कोठडी

**◆ मुंबई, २४ नोव्हेंबर**

डॉक्टर पत्नीला आत्महत्येसाठी प्रवृत्त केल्याचा आरोप असलेला मंत्री पंकजा मुंडे यांचा स्वीय सहायक अनंत गर्जे याला अटक करण्यात आली असून, गुरुवारपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायालयाने सोमवारी दिल्याची माहिती पोलिसांनी दिली.

डॉ. गौरी पालवेचा दहा महिन्यांपूर्वी अनंत गर्जेसोबत विवाह झाला होता. घरगुती वादामुळे तिने मध्य मुंबईतील परळी येथील सदनिकेत गळफास घेऊन शनिवारी आत्महत्या केली, असे अधिकाऱ्याने सांगितले. डॉ. गौरीच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे वरळी पोलिसांनी गर्जे आणि त्याच्या दोन नातेवाईकांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला.

गर्जेला आज न्यायदंडाधिकारी न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला २७ नोव्हेंबरपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला. डॉ. गौरीच्या शवविच्छेदनाचा अहवाल अद्याप मिळालेला नसल्याने त्याला पोलिस कोठडी देण्यात यावी, अशी मागणी पोलिसांनी न्यायालयात केली. या प्रकरणातील इतर आरोपी फरार असल्याचे सरकारी वकिलाने सांगितले. (वृत्तसंस्था)

# पंतप्रधानांच्या हस्ते अयोध्येत आज फडकणार 'धर्मध्वज'

## पवित्र केशरी ध्वज रामराज्याचे प्रतीक

**◆ अयोध्या, २४ नोव्हेंबर**

येथील राम मंदिराचे काम पूर्ण झाल्याचे प्रतीक म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मंगळवारी राम मंदिराच्या कळसावर भगवा ध्वज फडकवला जाणार आहे.



१० फूट उंच आणि २० फूट लांबीच्या या काटकोन त्रिकोणी ध्वजावर भगवान रामाच्या तेजाचे आणि शौर्याचे प्रतीक असलेल्या तेजस्वी सूर्याची प्रतिमा आहे तसेच कोविदार वृक्षाच्या प्रतिमेसह 'ओम' लिहिलेला आहे, अशी माहिती पंतप्रधान कार्यालयाने निवेदनात दिली.

पवित्र भगवा ध्वज रामराज्याच्या आदर्शांना मूर्त रूप देत प्रतिष्ठा, एकता आणि सांस्कृतिक सातत्याचा संदेश देईल, असे पंतप्रधान कार्यालयाने म्हटले आहे. पारंपरिक उत्तर भारतीय नागर शैलीत बांधलेल्या कळसावर ध्वज फडकेल तर दक्षिण भारतीय स्थापत्य परंपरेप्रमाणे संरचना असलेल्या मंदिराभोवती बांधलेले ८०० मीटरचे परकोट मंदिराच्या स्थापत्य विविधतेचे प्रदर्शन करते, असे त्यात म्हटले आहे. महर्षी वशिष्ठ, महर्षी विश्वामित्र, महर्षी अगस्त्य, महर्षी वाल्मीकि, देवी अहिल्या, निषादराज गुहा आणि माता शबरी यांच्या सप्तमंदिरांना नरेंद्र मोदी अयोध्येतील मुक्कामादरम्यान भेट देतील. या भेटीत ते शेषावतार मंदिराच्या भेटीनंतर देणार आहेत.

ते माता अन्नपूर्णा मंदिरालाही भेट देतील तसेच राम दरबार गर्भगृहात दर्शन आणि पूजा करतील. त्यानंतर रामलल्ला गर्भगृहात दर्शन घेतील. दुपारी १२ वाजता मोदी अयोध्येतील पवित्र श्री रामजन्मभूमी मंदिराच्या शिखरावर औपचारिकरीत्या भगवा ध्वज फडकावतील. तो मंदिराच्या बांधकामाचे पूर्णत्वाचे आणि सांस्कृतिक उत्सव तसेच राष्ट्रीय एकतेच्या नवीन अध्यायाची सुरुवात करण्याचे प्रतीक आहे, असे निवेदनात म्हटले आहे. (वृत्तसंस्था)



### डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या भेटीच्या साक्षीदार
# यमुनाबाई बोकेफोडे यांचे १०५ व्या वर्षी निधन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२४ नोव्हेंबर-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दोन वेळा चरण स्पर्श लाभलेल्या भीमनगर बार्शी येथील जेष्ठ अनुयायी यमुनाबाई बोकेफोडे (वय-१०५) यांचे दि.२१ रोजी निधन झाले. दि. २४ जानेवारी १९३७ साली स्वतंत्र मजूर पक्षाच्या प्रचारासाठी बाबासाहेब बार्शीत आले होते. स्वागत करुन मिरवणूक काढण्यात आली होती. यामध्ये यमुनाबाई आवर्जून उपस्थित होत्या. दि. २३ फेब्रुवारी १९४१ रोजी कसबे तडवळे येथे आयोजित सोलापूर जिल्हा व मोगलाई मराठवाडा परिषदेसाठी जाताना बार्शी रेल्वे स्टेशनवर बाबासाहेबांच्या दर्शनासाठी बार्शीतील अनुयायांनी गर्दी केली. यामध्ये ही यमुनाबाई बोकेफोडे आवर्जून उपस्थित होत्या. त्या भारत मुक्ती मोर्चाचे जिल्हा कार्याध्यक्ष तानाजी बोकेफोडे यांच्या वडिलांच्या आत्या होत.



महामानवाला जवळून पाहिलेल्या यमुनाबाई म्हणजे आंबेडकर इतिहासाच्या साक्षीदार होत्या. आजच्या तरुण पिढीला डॉ. बाबासाहेब समजावून सांगण्यासाठी त्या नेहमी या कर्तृत्वान महापुरुषाच्या ऐतिहासिक घटना आवर्जून सांगायच्या आणि त्या इतिहास सांगायल्या लागल्या की किती वेळा पण फक्त ऐकावे वाटायचे, असे तानाजी बोकेफोडे यांनी सांगितले. त्यांचे अनुभव हा दलित आणि वंचित समाजासाठी एक मोठा प्रेरणास्रोत होता. बाबासाहेबांच्या समता, बंधुता आणि न्यायाच्या विचारांची मशाल त्यांनी आपल्या कार्यातून अखेरपर्यंत तेवत ठेवली. यमुनाबाई बोकोडे यांच्या निधनाने आंबेडकरी चळवळीतील एक महत्त्वाचा दुवा निखळला आहे.

# बीडमध्ये ५ वर्षीय चिमुकलीवर बलात्कार

## गुन्हा दाखल न करण्यासाठी पिडीतेच्या आईवर दबाव

**बीड, दि.२४ नोव्हेंबर-**

एका ५ वर्षीय चिमुकलीवर बलात्कार झाल्याची संतापजनक घटना बीड जिल्ह्यात समोर आली आहे. विशेष म्हणजे बलात्काराची घटना घडल्यानंतर गावातील काही लोकांनी सदर मुलीला तब्बल ४ दिवस उपचारासाठी जाऊ दिले नाही. तसेच तिच्या आईवरही या प्रकरणी गुन्हा दाखल न करण्यासाठी दबाव टाकला. पण अखेर आपल्या मुलीची वेदना पाहून या महिलेने पोलिस ठाणे गाठून गुन्हा दाखल केला.



यासंबंधीच्या माहितीनुसार, नाशिक जिल्ह्यातील मालेगावच्या डोंगराळे येथील एका ३ वर्षीय चिमुकलीवर नुकताच बलात्कार व हत्या झाल्याची घटना घडली होती. या घटनेमुळे अवघे समाजमन सुन्न झाले असताना आता बीड जिल्ह्यातही अशीच एक घटना घडली आहे. बीड जिल्ह्यातील ताज्या घटनेत एका ५ वर्षीय लैंगिक अत्याचार झाला आहे. नात्यातीलच एका मुलाने हा घात केला आहे. पीडित मुलीवर सध्या बीड जिल्हा रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. ही घटना गत ११ नोव्हेंबर रोजी घडली. पण ती आज समोर आली. ही घटना घडल्यानंतर गावातील काही नागरिकांनी पीडित मुलीच्या आईवर गुन्हा दाखल न करण्यासाठी दबाव टाकला. या प्रकरणी बदनामी टाळण्यासाठी त्यांनी चक्क ४ बैठका घेतल्या. या कालावधीत मुलगी तशीच तडफडत आपल्या घरी होती. ग्रामस्थांनी तब्बल ४ दिवस तिला घरीच रोखून धरले. पण मुलीच्या नातलगांना ही गोष्ट कळल्यानंतर त्यांनी थेट पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्याशी संपर्क साधला.

त्यानंतर वेगाने सूत्रे हालत शिरूर कासार पोलिसांनी गुन्हा दाखल केला. ४ दिवस वेदना असह्य झाल्यानंतर अखेर मुलीच्या आईने उपचारासाठी बीड गाठले. तिथे तिच्यावर उपचार सुरू आहेत. पीडित मातेला झाला प्रकार सांगताना अश्रू अनावर होत होते.

## आई-वडिलांचा सांभाळ मुलांचे कर्तव्य

**मुंबई, २४ नोव्हेंबर**

जेष्ठ नागरिकांच्या देखभाल आणि कल्याण कायद्यांतर्गत आई-वडिलांची काळजी घेणे, त्यांचा सांभाळ करणे हे मुलांचे कर्तव्य तर आहेच पण कायदेशीर जबाबदारीही आहे, असे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाने नोंदवले. पालकांच्या मालमत्तेचा ताबा मुलांकडे आहे की नाही, मालमत्ता वारसा हक्काने मिळणार आहे की नाही यावर आई-वडिलांची काळजी घेणे ही बाब अवलंबून राहणार नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

ज्येष्ठ नागरिकांसाठी सन्मान, आरोग्य आणि आर्थिक दृष्टीने जीवन सुनिश्चित करणे हे वैधानिक कर्तव्याचा भाग असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. मोहिनी पुरी यांना २४ ऑगस्ट २०२५ रोजी गंभीर मस्तिष्काघातामुळे वांद्रे येथील होली फॅमिली हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मुलाने त्यांच्याकडे दुर्लक्ष केले होते.

सोलापूर
Solapur Tarun Bharat
तरुण भारत
Digital
बातमी नव्हे विचार
NEWS
सोलापूर तरुण भारत
डिजिटल न्यूज
आता प्रत्येक क्षेत्राची खबर
थेट आपल्या पर्यंत...
#बातमी नव्हे विचार

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# पेशावरमध्ये आत्मघाती हल्ला

## तीन कमांडोंसह सहा ठार; तेहरीक-ए-तालिबानवर संशय

**पेशावर, २४ नोव्हेंबर**

येथील निमलष्करी दलाच्या मुख्यालयावर सोमवारी झालेल्या आत्मघाती हल्ल्यात तीन सुरक्षा रक्षक ठार, तर इतर दोन जखमी झाले, असी माहिती वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने दिली. हा आत्मघाती हल्ला यशस्वी झाला असता, तर निमलष्करी दलाचे मुख्यालय पूर्णतः उद्ध्वस्त झाले असते.

तीन आत्मघाती हल्लेखोरांनी फेडरल कॉन्स्टॅब्युलरीच्या (एफसी) मुख्यालयात घुसण्याचा प्रयत्न केला. मात्र, सुरक्षा रक्षकांनी केलेल्या गोळीबारात ते ठार झाले, असे शहराचे पोलिस प्रमुख मियान सईद यांनी सांगितले. एका हल्लेखोराने स्वतःला मुख्य प्रवेशद्वाराजवळ स्वतःला उडवले. इतर दोघांनी परिसरात प्रवेश केला होता. एफसीच्या सैनिकांनी गोळीबार करीत त्यांना जागीच ठार केले, अशी माहिती सईद यांनी दिली.

एफसी मुख्यालयात दोन आत्मघाती स्फोट झाले. त्यापैकी एक मुख्य प्रवेशद्वारावर झाला तर दुसरा परिसरात असलेल्या असलेल्या मोटारसायकल स्टॅण्डवर झाला, अशी माहिती खैबर पख्तुनख्वाचे पोलिस महानिरीक्षक झुल्फिकार हमीद यांनी सांगितले. प्रवेशद्वारावर झालेल्या शक्तिशाली स्फोटामुळे जवळपासच्या रहिवासी आणि व्यावसायिक भागात दहशत पसरली. या स्फोटाचा आवाज दूरपर्यंत ऐकू गेला, असे त्यांनी सांगितले.

स्फोट होताच घटनास्थळावर बचाव पथके आणि अतिरिक्त कुमक पाठवण्यात आली तसेच परिसरात सुरक्षा व्यवस्थेला अतिसतर्कतेचा इशारा देण्यात आला. या हल्ल्यात तीन नागरिकांसह पाच जण जखमी झाल्याचे रुग्णालयातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

खैबर पख्तुनख्वाचे मुख्यमंत्री सोहेल आफ्रिदी यांनी या दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध केला. प्रांतीय सरकार पोलिस आणि कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांसोबत भक्कमपणे उभे असल्याचे त्यांनी सांगितले. या निमलष्करी दलाचे मूळ नाव फ्रन्टियर कॉन्स्ट्युबलरी होते. जुलैमध्ये सरकारने त्याचे नाव बदलून फेडरल कॉन्स्ट्युबलरी केले. हे मुख्यालय लष्करी छावणीच्या जवळ आणि गर्दीच्या भागात असल्याचे 'डॉन'ने दिलेल्या वृत्तात म्हटले आहे. *(वृत्तसंस्था)*



दहशतवाद्यांपैकी एकाने फेडरल कॉन्स्टॅब्युलरीच्या मुख्यालयाच्या मुख्य दरवाज्यासमोर स्वतःला उडवून लावले

### जे पेरले तेच उगवले

**पाकिस्तान १९८० पासून दहशतवाद्यांना पाठिंबा देत आहे. भारतात दहशतवादी हल्ले घडविणारे दहशतवादी पाकिस्तानात आश्रयाला आहेत. तेहरिक-ए-तालिबान ही खैबर पख्तुनख्वा प्रांतात कार्यरत आहे. ज्या तालिबान्यांना पाकिस्तानी सरकार आणि लष्कराने पोसले तेच आता त्यांच्यावर उलटले आहेत. तेहरिक-ए-तालिबानने अनेक हल्ले करीत पाकिस्तानच्या नाकात दम आणला. म्हणतात ना, जे पेराल, तेच उगवणार!**

## दिल्लीच्या धावपट्टीवर विमानांची टक्कर टळली

**नवी दिल्ली, २४ नोव्हेंबर**

रविवारी येथील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर काबूलहून आलेले एरियाना अफगाण एअरलाईन्सचे विमान चुकून धावपट्टीवर उतरले, जिथून दुसरे विमान उड्डाण घेत होते आणि तिथेच एक मोठी टक्कर टळली.

एरियाना अफगाण एअरलाईन्सच्या एफजी-३११ (काबुल-दिल्ली) विमानाला धावपट्टी २९एल वर उतरण्याची परवानगी देण्यात आली होती. तथापि, विमान धावपट्टी २९आर वर उतरले, असे त्यांनी सांगितले.

एरियाना फ्लाईटच्या पायलट-इन-कमांड (पीआयसी) ने सांगितले की, त्याने ४एनएम (नॉटिकल मैल) वर आयएलएस (इंस्ट्रुमेंट लॅण्डिंग सिस्टिम) गमावली आणि विमान उजवीकडे वळले, त्यानंतर कॅप्टनने धावपट्टी २९आर वर दृश्यमान दृष्टिकोनाने उतरवले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

आयएलएस ही एक अचूक रेडिओ नेव्हिगेशन प्रणाली आहे जी रात्रीच्या वेळी, खराब हवामान आणि कमी दृश्यमानतेदरम्यान धावपट्टीवर जाण्यासाठी विमानाला कमी अंतराचे मार्गदर्शन प्रदान करते. *(वृत्तसंस्था)*



## एका युगाचा अंत...

लाखो लोकांचे आदर्श असलेले, चित्रपटसृष्टीतील सर्वात प्रिय व्यक्तिमत्तांपैकी एक असलेले धर्मेंद्र कलाकारांच्या पिढ्यांना कायम प्रेरणा देतील.
- **सी.पी. राधाकृष्णन** । उपराष्ट्रपती

लोकप्रिय चित्रपट अभिनेते धर्मेंद्र यांचे निधन अत्यंत दुःखद आहे. कला आणि चित्रपट जगताचे कधीही भरून न येणारे नुकसान झाले आहे.
- **योगी आदित्यनाथ** । मुख्यमंत्री, उत्तर प्रदेश

सहा दशके आपल्या उत्कृष्ट अभिनयाने देशातील प्रत्येक प्रेक्षकाच्या हृदयाला स्पर्श करणारे धर्मेंद्रजी यांचे निधन भारतीय चित्रपट उद्योगाचे कधीही भरून न येणारे नुकसान आहे.
- **अमित शाह** । केंद्रीय गृहमंत्री

१९६० च्या दशकात भारतीय सिनेसृष्टीत पदार्पण करून धर्मेंद्र यांनी भारतीय प्रेक्षकांची मनं जिंकून सिनेजगतात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. आताच्या तरुणाईला कल्पना नसेल पण एक पिढी त्यांच्या लकबीची, त्यांच्या केशभूषेची, वेशभूषेची चाहती होती.
- **शरद पवार** । राकॉ. श. प.

१९६० च्या दशकात धर्मेंद्र नावाचा एक देखणा, शरीराने अतिशय सुदृढ, मोहक हास्य, मर्दानीपणा सहज जाणवत असला तरी त्यात कुठेही दांडगाई नाही. कित्येक दशकं त्याने हिंदी चित्रपटसृष्टीवर गारुड केलं.
- **राज ठाकरे** । अध्यक्ष मनसे

धर्मेंद्र यांचा चित्रपट प्रवास म्हणजे मेहनत, समर्पण आणि कलाविश्वाप्रती असलेल्या निःस्वार्थ प्रेमाचे प्रतीक आहे.
- **अजित पवार** । उपमुख्यमंत्री

भारतीय चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते, पद्मभूषण धर्मेंद्र यांच्या निधनाची बातमी अत्यंत वेदनादायक आहे. त्यांनी भारतीय सिनेमाला एक वेगळं स्थान प्राप्त करून दिले.
- **ॲड. आशिष शेलार** । सांस्कृतिक कार्य मंत्री

धर्मेंद्र कामाबद्दल खूप उत्साही होता. त्याच्यासोबत काम करणे हा एक अद्भुत अनुभव होता. तो त्याच्या सहकाऱ्यांबद्दलही खूप विचारशील होता. बाहेरच्या शूटिंगमध्ये खूप गर्दी असायची, पण तो सर्वांची काळजी घ्यायचा.
- **आशा पारेख** । ज्येष्ठ अभिनेत्री

लहानपणापासूनच तो असा हिरो होता जो प्रत्येक मुलगा बनण्याची स्वप्ने पाहत होता. धरम पाजी त्यांच्या चित्रपटांद्वारे आणि त्यांच्या प्रेमळ स्वभावाद्वारे नेहमीच लोकांच्या हृदयात राहतील.
- **अक्षय कुमार** । अभिनेता

धरमजी हे माझ्या आईवडिलांचे आवडते आणि माझ्या बालपणीच्या आवडत्या नायकांपैकी एक होते.त्यांचे चित्रपट, लोकांवरील त्यांचे प्रेम आणि त्यांनी उभी केलेली शक्ती आपल्यासोबत कायम राहील.
- **मनोज बाजपेयी** । अभिनेता


काही लोक केवळ तुमच्या आयुष्यात काम करत नाहीत. ते तुमच्या हृदयात राहतात. धरम जी त्यापैकी एक होते.
- **संजय दत्त** । अभिनेता

# मी साकारलेल्या पेंटिंगवर धर्मेंद्र यांनी दिली होती दाद : महेश गादेकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर -**

सोलापूर शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे अध्यक्ष महेश गादेकर यांनी प्रसिद्ध अभिनेता धर्मेंद्र यांची दोन अँक्रॅलिक कलर मध्ये पेंटिंग साकारली आहेत.

८ जानेवारी २०१५ रोजी पुण्यातील एका कार्यक्रमात त्यांनी अभिनेता धर्मेंद्र यांना दोन्ही पेंटिंग दाखवली. त्यावेळी धर्मेंद्र यांनी दोन्ही पेंटिंगवर सही करत अप्रतिम अशी दाद दिली होती.



महेश गादेकर हे मुळात कलाकार आहेत. पुण्यातील अभिनव कला महाविद्यालयातून त्यांचे चित्रकलेचे शिक्षण झाले आहे. ते समाजकारण आणि राजकारणात सक्रिय असले तरी चित्रकलेची आवड मात्र त्यांनी अजूनही जोपासली आहे. त्यांनी खासदार शरदचंद्र पवार, गुलजार यांच्यासह त्यांनी इतर अनेक पेंटिंग्ज साकारली आहेत. या दोन पेंटिंग मधील सिंगल पोर्ट्रेट धर्मेंद्र यांना खूप आवडले. ते पोर्ट्रेट त्यांनी फार्म हाऊसमध्ये लावण्यासाठी मागितले. परंतु मी आठवण म्हणून माझ्याकडेच ठेवण्याचा निर्णय घेतला.




# मुक्त व्यापार करारावर भारत-कॅनडा सहमत

**नवी दिल्ली, २४ नोव्हेंबर**

२०३० पर्यंत द्विपक्षीय व्यापार ५० अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत वाढविण्याच्या उद्देशाने भारत आणि कॅनडा मुक्त व्यापार करारासाठी (एफटीए) वाटाघाटी पुन्हा सुरू करण्यास सहमत झाले आहेत, असे वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी सांगितले.

एफटीए किंवा व्यापक आर्थिक भागीदारी करार (सीईपीए) मध्ये अनेक धोरणात्मक घटक आहेत आणि ते दोन्ही देशांमधील विश्वासाचे प्रदर्शन आहे. या करारामुळे दोन्ही बाजूंच्या गुंतवणूकदारांना, व्यवसायांना आत्मविश्वास मिळेल, असे गोयल यांनी सोमवारी येथे एका कार्यक्रमात सांगितले. आम्ही २०३० पर्यंत उच्च-महत्त्वाकांक्षी सीईपीएवर वाटाघाटी सुरू करण्यास आणि दोन्ही देशांमधील व्यापार दुप्पट करण्यास सहमती दर्शविली आहे. दोन्ही देश नैसर्गिक मित्र आहेत, असे ते म्हणाले. *(वृत्तसंस्था)*





# सिनेसृष्टीतील देखणा 'ही-मॅन'

अभिनेता धर्मेंद्र यांची प्रतिमा ८० च्या दशकानंतर दणकट बांध्याचा 'जट यमला' अशी राहिली आहे. मात्र, अनेकांना हे माहिती नसेल की जागतिक स्तरावर देखण्या अभिनेत्यांच्या यादीत स्थान मिळवणारे धर्मेंद्र पहिले आणि एकमेव अभिनेते होते. हॉलिवूडच्या मोठमोठ्या देखण्या, रूबाबदार अभिनेत्यांच्या पंक्तीत त्यांनी स्थान मिळवले होते.


धर्मेंद्र यांचा जन्म ८ डिसेंबर १९३५ रोजी पंजाबमधील लुधियाना जिल्ह्यातील सहनेवाल गावात एका जाट शीख कुटुंबात किशन सिंग देओल आणि सतवंत कौर यांच्या पोटी झाला. त्यांचे वडिलोपार्जित गाव डांगो आहे, जे पखोवाल तहसील रायकोट, लुधियानाजवळ आहे. त्यांचे सुरुवातीचे आयुष्य सहनेवाल गावात गेले आणि लुधियानातील लालटन कलान गावातील सरकारी वरिष्ठ माध्यमिक शाळेत शिक्षण घेतले, जिथे त्यांचे वडील गावातील शाळेचे मुख्याध्यापक होते. त्यांनी १९५२ मध्ये फगवाडा येथे मॅट्रिक पूर्ण केले, हे त्यांच्या मावशीचे मूळ गाव आहे, ज्यांचा मुलगा वीरेंद्र हा एक सुपरस्टार आणि पंजाबी चित्रपटांचा निर्माता-दिग्दर्शक होता. दहशतवादाच्या काळात लुधियानामध्ये 'जट्ट ते जमीन' या चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान दहशतवाद्यांनी त्यांची गोळ्या घालून हत्या केली होती. त्यावेळी पंजाबमधील शाळा पंजाब विद्यापीठ, चंदीगड अंतर्गत होत्या. वडील मुख्याध्यापक असले तरी धर्मेंद्र यांना शिक्षणात फारशी रूची नव्हती.

धर्मेंद्र हे अभिनेता होण्याचे स्वप्न बाळगून जगणाऱ्यांपैकी एक होते. आपल्या मनातील ही गोष्ट त्यांनी आईसोबत शेअर केली होती. त्यानी आपल्या लेकाला पाठिंबा दिला. त्यामुळेच कदाचित धर्मेंद्र यांनी बॉलिवूडमध्ये शिखर गाठले. आईच्या सल्ल्यानेच धर्मेंद्र यांनी फिल्म फेअरच्या 'न्यू टॅलेंड हंट' या स्पर्धेसाठी अर्ज केला होता. ही स्पर्धा जिंकल्यानंतर या अभिनेत्याचा 'पंजाब टू मुंबई' या प्रवासाला योग्य दिशा मिळाली.




### अभिनय कारकीर्द

धर्मेंद्र हे फिल्मफेअर मासिकाच्या राष्ट्रीय स्तरावर आयोजित 'न्यू टॅलेंड हंट' चे विजेते होते आणि पुरस्कार विजेते म्हणून, चित्रपटांमध्ये काम करण्यासाठी पंजाबमधून मुंबईला गेले, परंतु चित्रपट कधीच बनला नाही. त्यांनी नंतर १९६० मध्ये अर्जुन हिंगोरानीच्या 'दिल भी तेरा हम भी तेरे' या चित्रपटातून पदार्पण केले. १९६१ मधील बॉय फ्रेंड चित्रपटात त्यांची सहाय्यक भूमिका होती आणि १९६० ते १९६७ दरम्यान अनेक चित्रपटांमध्ये त्यांना रोमँटिक हिरो म्हणून काम मिळाले.



### धर्मेंद्र यांचे वेगळेपण

अभिनेता म्हणून धर्मेंद्र यांचे वेगळेपण यात होते की त्यांनी नायिकाप्रधान चित्रपटांना कधीही नकार दिला नाही. त्यामुळे ते निर्माता, दिग्दर्शकांसोबतच अभिनेत्रींचेही लाडके हिरो बनले. त्यांनी नूतनसोबत सूरत और सीरत (१९६२), बंदिनी (१९६३), दिल ने फिर याद किया (१९६६), आणि दुल्हन एक रात की (१९६७) मध्ये काम केले; माला सिन्हासोबत अनपढ (१९६२), पूजा के फूल (१९६४), बहारे फिर भी आएगी (१९६६), आणि आंखे (१९६८); नंदासोबत आकाशदीप (१९६५); आणि शादी (१९६२), सायरा बानूसोबत आयी मिलन की बेला (१९६४) रेशम की डोरी (१९७४) हे चित्रपट केले. धर्मेंद्र यांची मीना कुमारीसोबतची जोडी प्रचंड यशस्वी ठरली आणि सात चित्रपटांमध्ये त्यांनी एकत्र काम केले, ज्यात मैं भी लडकी हूं (१९६४), काजल (१९६५), पूर्णिमा (१९६५), फूल और पत्थर (१९६६), मजली दीदी (१९६७), चंदन का पालन (१९६७) आणि बहार (१९६७) यांचा समावेश आहे. फूल और पत्थर (१९६६) मध्ये त्यांची एकल नायकाची भूमिका होती, हा त्यांचा पहिला ॲक्शन चित्रपट होता. मीना कुमारी आणि धर्मेंद्र यांचे १९६० च्या दशकात घनिष्ट संबंध होते, अशी चर्चाही होती. १९६६ चा सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट फूल और पत्थर ठरला आणि धर्मेंद्र यांना पहिल्यांदाच सर्वोत्कृष्ट अभिनेत्याच्या फिल्मफेअर पुरस्कारासाठी नामांकन मिळाले. 'अनुपमा'मधील त्यांच्या अभिनयाचे समीक्षकांनी कौतुक केले. या चित्रपटातील त्यांच्या अभिनयाबद्दल त्यांना १४ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये स्मृतिचिन्ह देण्यात आले. २२ त्यांनी आयी मिलन की बेला, आये सावन झूमके, मेरे हमदम मेरे दोस्त, इश्क पर जोर नहीं, प्यार ही प्यार आणि जीवन मृत्यु यासारख्या चित्रपटांमध्ये रोमँटिक भूमिका केल्या. त्यांनी शिकार, ब्लॅकमेल, कब क्यूं और कहाँ आणि कीमत सारख्या सस्पेन्स थ्रिलर चित्रपटांमध्येही काम केले. १९७१ च्या मेरा गाव मेरा देश या चित्रपटातील ॲक्शन हिरोच्या भूमिकेसाठी त्यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्यासाठी फिल्मफेअर नामांकन मिळाले. रोमँटिक आणि ॲक्शन हिरोच्या भूमिका साकारल्यानंतर, १९७५ पर्यंत ते एक बहुमुखी अभिनेते म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यांची सर्वात यशस्वी जोडी हेमा मालिनी यांच्यासोबत होती, जी नंतर त्यांची पत्नी बनली. या जोडीने राजा जानी, सीता और गीता, शराफत, नया जमाना, पत्थर और पायल, तुम हसीन मैं जवान, जुगनू, दोस्त, चरस, माँ, चाचा भतीजा, आझाद आणि शोले यासारख्या अनेक चित्रपटांमध्ये एकत्र काम केले.

### दिलीप कुमारने केले होते कौतुक



अभिनयाचे विद्यापीठ समजले जाणारे दिलीप कुमार यांनी स्वतः धर्मेंद्र यांची बरेचदा स्तुती केली होती. दिलीप कुमार म्हणायचे की, मी परमेश्वराला नेहमी म्हणतो मला तू धर्मेंद्रसारखे देखणे रूप का दिले नाही? त्याच्या देखणेपणाचा मला नेहमीच हेवा वाटतो.

### मनोज कुमार खास मित्र



संघर्षाच्या काळापासून धर्मेंद्र यांची अभिनेता मनोज कुमार यांच्यासोबत गाढ मैत्री राहिली. ज्या काळात धर्मेंद्र यांच्याकडे चांगले कपडे घेण्यासाठी पैसे नसायचे तेव्हा मनोज कुमार यांनी मदत केली. एक वेळ अशीही आली होती जेव्हा धर्मेंद्र निराश होऊन घरी परतणार होते. त्यावेळी मनोज कुमार यांनी त्यांना थांबवले आणि म्हणूनच सिनेसृष्टीला एक उत्तम अभिनेता मिळू शकला. मनोज कुमार यांच्या निधनानंतर धर्मेंद्र फार खचले होते. माझा मित्र सोडून गेला, असे म्हणत त्यांनी आयुष्यातील मैत्रीचे एक सुंदर पर्व संपल्याचे म्हटले होते.

### राजकीय कारकीर्द



धर्मेंद्र यांनी २००४ ते २००९ पर्यंत भारतीय जनता पक्षाच्या वतीने राजस्थानातील बिकानेरचे मतदारसंघाचे खासदार म्हणून काम केले. २००४ मध्ये निवडणूक प्रचारादरम्यान, त्यांनी 'लोकशाहीसाठी आवश्यक असलेले मूलभूत शिष्टाचार शिकवण्यासाठी त्यांना कायमचे हुकूमशहा म्हणून निवडून द्यावे' अशी आक्षेपार्ह टिप्पणी केली, ज्यासाठी त्यांच्यावर टीका झाली. सभागृहाचे अधिवेशन चालू असताना ते क्वचितच संसदेत उपस्थित राहत असत, त्यांच्या फार्महाऊसवर चित्रपटांचे चित्रीकरण किंवा शेतीचे काम करण्यात वेळ घालवणे पसंत करत असत.

### अजरामर गाणी...

- आपके हसीन रूख पे आज नया नूर हैं
- कोई हसीना जब रूठ जाती हैं तो
- आज मौसम बडा बेईमान हैं
- झिलमिल सितारों का आँगन होगा
- मैं जट यमला पगला दिवाना
- देखा हैं तेरी आँखो में
- किसी शायर की गझल ड्रीम गर्ल
- आजा तेरी याद आयी
- क्या मिलिए ऐसे लोगों से
- चाहे रहो दूर चाहे रहो पास
- अब के सजन सावन में
- जमाना तो हैं नौकर बीवी का
- राफ्ता राफ्ता देखो आँख मेरी लडी है
- पल पल दिल के पास
- होली के दिन दिल खिल जाते हैं
- एक हसीन शाम को दिल मेरा खो गया
- ये दोस्ती हम नहीं छोडेंगे
- मैं कहीं कवी ना बन जाऊ
- गर तुम भुला ना दोगे



### धर्मेंद्र यांच्याविषयी थोडक्यात...

- अभिनेता धर्मेंद्र यांचे बालपण फगवाडा येथे गेले. मोठे स्टार झाल्यानंतरही ते फगवाडा येथे वेळात वेळ काढून जायचे आणि कधीही मोठेपणाचा आविर्भाव न आणता जुन्या मित्रांची घरी जाऊन भेट घेत.
- धर्मेंद्र ४५० कोटींच्या संपत्तीचे मालक
- ६५ वर्षांच्या करिअरमध्ये ३०० चित्रपटात काम
- चित्रपटासोबतच विविध उद्योगातही चांगली गुंतवणूक
- त्यांचे गरम धरम आणि ही मॅन रेस्टॉरंट अतिशय प्रसिद्ध
- करिअरमधील पहिला चित्रपट दिल भी तेरा हम भी तेरे साठी त्यांना केवळ ५१ रुपये मिळाले होते.
- लोणावळा येथे १०० एकर परिसरात भव्य फार्म हाऊस
- धर्मेंद्र शाही गाड्यांचे शौकीन होते. त्यांच्या ताफ्यात मर्सिडीज बेंझ, लॅण्ड रोव्हर सारख्या महागड्या गाड्याही होत्या. तरीही त्यांची आवडती गाडी ६५ वर्षे जुनी फियाट होती.
- चित्रपटाप्रमाणेच त्यांनी छोट्या पडद्यावरही प्रभाव दाखवला. 'इंडियाज गॉट टॅलेंट'चे ते परीक्षक होते. याशिवाय वेबसीरिजमध्ये त्यांनी आपली छाप सोडली.
- दोन लग्न केले तरीही कधी कुटुंबात वाद निर्माण होऊ दिले नाही.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे...

### आर्थिक कारणासाठी पत्नीचा छळ; पतीसह सहा जणांवर गुन्हा

**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

आर्थिक कारणासाठी पत्नीचा छळ केल्याप्रकरणी पतीसह सहा जणांवर एमआयडीसी पोलिस ठाण्यात सोमवारी गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी मेहक अक्रम शेख (वय २१, रा. प्रभाकर नगर, नई जिंदगी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पती अक्रम, सासू सायरा, जैनुद्दीन शेख, नणंद अल्फिया, आर्शिया, आयेशा सय्यद (रा. पुणे) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.फिर्यादी मेहक यांचा विवाह झाल्यानंतर आरोपींनी घरगुती कारणावरून तसेच पैशाच्या कारणावरून त्यांना मारहाण केली. यात त्यांना मुक्कामार लागून शिवीगाळ दमदाटी करून शारीरिक व मानसिक त्रास दिला. अशा आशयाची फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून वरील आरोपींवर गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा तपास हवालदार राकेश पाटील करत आहेत.

### घरातील तीन लाखांच्या ऐवजाची चोरी

**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

मुस्लिम पाच्छा पेठ येथील रहिवासी निजामुद्दीन इब्राहिम बिजापुरे यांच्या घरातील रोख रक्कम आणि दीड तोळे सोन्याचे नेकलेस असा एकूण तीन लाख रुपयांचा ऐवज चोरीला गेल्याची घटना १० ऑक्टोबर रोजी घडली. याबाबत बिजापुरे यांनी रविवार ११ नोव्हेंबर रोजी जेलरोड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी आस्मा परविन आरिफ जमादार (रा. शास्त्री नगर) हिच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.फिर्यादी बिजापुरे यांच्या घरातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण ३ लाखाचा ऐवज अज्ञाताने चोरला. ही बाब कळाल्यानंतर याबाबत त्यांनी फिर्याद दिली आहे. या प्रकरणी एका आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या घटनेचा तपास सपोनि संदीप पाटील करत आहेत.

### घातक शस्त्रांचा वापर करणारा संजय उपाडे दोन वर्षासाठी तडीपार

**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

शहरात साथीदारांसह दंगा माजवत, मारामारी करणे, घातक शस्त्रांचा वापर करणारा संजय ऊर्फ संजीव नागनाथ उपाडे (वय ३४, रा. संतोष नगर, बाळे) याला सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार करण्यात आले आहे. याबाबतची माहिती सोम वारी वाचक अधिकारी पोलिस उपनिरीक्षक एन. एस. कानडे यांनी पत्रकाव्दारे दिली.आरोपी उपाडे याच्यावर २०१७, २०१८, २०१९, २०२१ व २०२४ मध्ये साथीदारांसह दंगा व मारामारी करणे, घातक शस्त्रांचा वापर करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे यासारखे गुन्हे दाखल करण्यात आले आहे. यामुळे त्याच्या विरूध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्याकडून त्याच्या तडीपारचा प्रस्ताव पाठवण्यात आला होता. यामुळे त्याला पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी १७ नोव्हेंबर रोजी त्याला तडीपार करण्याचे आदेश दिले.

# कनेक्टिव्हिटीचे प्रकल्प युध्दपातळीवर पूर्ण करणार : मुख्यमंत्री

## 'युथ कनेक्ट'मध्ये साधला हजारो जणांशी संवाद



**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २४ नोव्हेंबर-**

मुंबईतील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी विविध पायाभूत प्रकल्पांची कामे आगामी पाच वर्षात पूर्ण करण्यात येणार आहे. मुंबईच्या पूर्व-पश्चिम तसेच उत्तर-दक्षिण जोडणीला वेग देणार, अनेक महत्त्वाचे प्रकल्प युद्धपातळीवर पूर्ण करण्यात येणार आहेत., असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी सांगितले.

मुंबईतील वरळी डोम येथे इंडियाज् इंटरनॅशनल मूव्हमेंट टू युनाईट नेशन्स (आयआयएमयूएन) आयोजित 'यूथ कनेक्ट' कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी हजारो युवकांशी संवाद साधला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सी-लिंकचा वर्सोवा-दहिसर-भाईंदरपर्यंत विस्तार, दहिसरकडील नवीन लिंक रोड, फ्री-फ्लो ब्रिजेस, तसेच विविध टनेल प्रकल्पांमुळे मुंबईतील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल. सध्या मुंबईतील ६० टक्के वाहतूक पश्चिम द्रुतगती मार्गावर असल्याने या क्षेत्राला पर्याय उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

बीकेसी ते इतर भागांना जोडणारे बोगदे, नवीन लिंक रोड नेटवर्क, ओव्हर एक्स्प्रेसवे कनेक्शन आदी प्रकल्पांमुळे शहरातील प्रवासाचा सरासरी वेग मोठ्या प्रमाणात वाढेल. मुंबईत पूर्णतः बोगदे रस्ते तयार करण्यात येणार आहेत.

येत्या पाच वर्षात मेट्रोचे संपूर्ण जाळे तयार होणार आहे. हे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबईतील सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम आणि वापरण्यास सोपी बनेल. 'मुंबई वन' हा एकात्मिक मोबिलिटी अॅप नागरिकांसाठी वन-स्टॉप सोल्युशन असल्याचे सांगून फडणवीस म्हणाले की, पालकांमध्ये खासगी शाळांविषयी आकर्षण वाढल्याने शासकीय व महानगरपालिका शाळांची संख्या कमी होत आहेत असे चित्र समोर आले. परंतु वास्तवात परिस्थिती बदलत आहे.

महानगरपालिकांच्या शाळांना आंतरराष्ट्रीय मानकांपर्यंत नेण्याचा संकल्प असून मुंबई महानगरपालिकाकडे ती क्षमता आहे. शासकीय शाळांना योग्य प्रशिक्षण, अध्यापन पद्धती आणि पायाभूत सुविधा दिल्यास त्या खासगी शाळापेक्षा सरस ठरतील, असेही मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पर्यावरण बदल ही केवळ पुस्तकी चर्चा नसून वास्तवातील मोठी समस्या आहे. आपण हवामान बदलाचा अनुभव घेणारी पहिली पिढी आहोत आणि त्याबद्दल काहीतरी करू शकणारी शेवटची पिढी आहोत. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही प्रदूषणाची सर्वात मोठी कारणे असतात, त्यामुळे मुंबईत वाहतूक व्यवस्था इलेक्ट्रिक करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

मेट्रो संपूर्णपणे इलेक्ट्रिक आहे. पुढील टप्प्यात सार्वजनिक वाहतुकीला पूर्णपणे शून्य-उत्सर्जनच्या दिशेने नेणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. ते म्हणाले, अनेक वर्षे मुंबईचे सांडपाणी थेट समुद्रात सोडले जात होते, मुंबईसारख्या महानगराचा १०० टक्के सीवेज समुद्रात टाकला जाणे योग्य नाही. त्यामुळे नियम तयार करून आता संपूर्ण मुंबईत सीवेज ट्रीटमेंट प्लांट्स उभारत आहोत. पुढील वर्षापर्यंत १०० टक्के ट्रीटेड पाणीच समुद्रात सोडले जाईल. असे त्यांनी सांगितले.

# विद्यापीठातील ५ कोटींचे वादग्रस्त निविदा प्रकरण : संपूर्ण प्रक्रिया 'जैसे थे'

## तीन महिन्यानंतरही उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून आदेश नाहीच

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ नोव्हेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील सात कामांसाठी काढण्यात आलेल्या निविदा प्रक्रिया नियमबाह्य पद्धतीने झालेल्या असल्याने त्याची फेरनिविदा काढण्यात येतील, असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील जाहीर केले होते. त्या घोषणेला तीन महिन्यांचा कालावधी लोटला. परंतु अद्यापपर्यंत संपूर्ण प्रक्रीया 'जैसे थे' आहे. तक्रारदारांसह इतर सदस्यही या निविदाप्रक्रियांबाबत शांतच आहेत.

विद्यापीठाने सोलार प्रकल्पासाठी पाच कोटींच्या निविदा मे २०२५ मध्ये काढल्या होत्या. पण, त्या शासन नियमांच्या विरोधात असल्याची तक्रार विद्यापीठाच्या अधिसभा सदस्या अॅड.




नीता मंकणी यांनी कुलगुरु व राज्यपाल यांच्याकडे केली होती. चुकीच्या पद्धतीने राबविण्यात आलेली प्रक्रिया थांबवून, पुन्हा नव्याने पारदर्शक पद्धतीने निविदा काढाव्यात, अशी त्यांची मागणी होती. त्या तक्रारीची दखल घेऊन, विभागीय शिक्षण सहसंचालक डॉ. उमेश काकडे व सिनियर ऑडिटर गोविंद बोंदर यांच्या पथकाने जुलै महिन्यात विद्यापीठात अचानक भेट देऊन चौकशी केली. कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर विद्यापीठाचे लेखा अधिकारी, अभियंत्यासह निविदा प्रक्रियेतील सर्व जबाबदार अधिकाऱ्यांनी मंत्रालयातील सुनावणीत संपूर्ण दप्तरासह बोलाविण्यात आले. मंत्रालयात त्यांची सुनावणी झाली. सप्टेंबर महिन्यात विद्यापीठाच्या पदवीदान सोहळ्याच्या निमित्ताने उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पाटील सोलापूरच्या दौऱ्यावर आले होते. त्यावेळी वादग्रस्त निविदांबाबत त्यांना विचारले असता, त्यासंदर्भात आलेल्या तक्रारीवरून स्वतंत्र चौकशी समिती नियुक्त केली होती. त्या समितीने केलेल्या चौकशीमध्ये चार निविदा ठेकेदारांच्या सोईनुसार काढल्याचे तर तीन निविदा योग्य होत्या, असा उल्लेख आहे. चौकशी समितीने फेरनिविदा करण्याचा शेरा असल्याने, संपूर्ण निविदांची पुनर्प्रक्रिया करण्यात येईल, असेही मंत्री पाटील यांनी जाहीर केले होते. परंतु, अध्यापर्यंत त्याचे लेखी पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून आले नसल्याने, मागील पाच महिन्यांपासून ही प्रक्रिया रखडली आहे.

### आदेशानंतर पुढील निर्णय

निविदा प्रक्रीयांची विभागीय शिक्षण संचालकांच्या समितीने चौकशी केली. त्यामुळे ही प्रक्रिया थांबवली आहे. मार्च २०२६ पर्यंत निधी खर्चाची मुदत असल्याने त्या प्रक्रियांबाबत पुढे काय करायचे? याबाबत उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे विद्यापीठाने मार्गदर्शन मागविले आहे. त्यासंदर्भात स्मरणपत्र देखील दिले आहे. पण, अद्याप वरिष्ठ कार्यालयाकडून काही लेखी आदेश नाहीत. आदेशानंतर पुढील निर्णय होईल.
**- प्रा. डॉ. अतुल लकडे, प्रभारी कुलसचिव**

# श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र : भूमिपूजनानंतरच्या ठळक घटना



अयोध्या नगरी पुन्हा एकदा नवचैतन्याने आणि रामभक्तीच्या उत्साहाने भारून गेली आहे. भव्य श्रीराम मंदिराच्या पूर्णत्वानिमित्त मंदिराच्या मुख्य शिखरावर धर्मध्वजारोहण सोहळा २५ नोव्हेंबरला होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २५ नोव्हेंबर २०२५ रोजी मंदिराच्या मुख्य शिखरावर धर्मध्वजा फडकवली जाणार असून संपूर्ण राम मंदिराचे लोकार्पण होणार आहे. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत उपस्थित राहणार आहेत.

**५ ऑगस्ट २०२०**

भगवान श्रीरामाच्या जन्मभूमीचे भूमिपूजन आणि नवभारताच्या उन्नतीचा विजयोत्सव.

**२९ ऑगस्ट २०२०**

श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्राचे विश्वस्त डॉ. अनिल मिश्रा यांनी नकाशा संमत होऊन बांधकाम सुरू व्हावे, यासाठी श्रीराम जन्मभूमी मंदिराचा नकाशा आणि इतर आवश्यक कागदपत्रे मंजुरीसाठी अयोध्या विकास प्राधिकरणाचे उपाध्यक्ष आणि सचिवांकडे मंजुरीसाठी सादर केली.

**९ ऑक्टोबर २०२०**

श्रीराम जन्मभूमी मंदिराच्या बांधकामासाठी कोरलेले दगड कार्यशाळेतून मंदिर परिसरात हलवण्याचे काम सुरू झाले. याच दगडांनी भव्य-दिव्यश्रीराम जन्मभूमी मंदिर बांधण्यात आले.

**४ नोव्हेंबर २०२०**

श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र जन्मभूमी संकुलाच्या ७० एकर क्षेत्राच्या मास्टर प्लॅनसाठी सर्व विद्वान, वास्तुविशारद यांच्या सूचना मागवण्यात आल्या.

**१३ फेब्रुवारी २०२१**

श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टच्या स्थापनेपूर्वी श्रीराम जन्मभूमी न्यासाने श्रीराम मंदिराच्या उभारणीसाठी अनेक पक्षांशी करार केले. ट्रस्टच्या स्थापनेनंतर त्या सर्व करारांचा आढावा घेण्यात आला आणि पूरक करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

**१५ मार्च २०२१**

प्रातःकाळी शुभ मुहूर्तावर श्रीराम जन्मभूमी स्थळावर वैदिक पूजनाने श्रीराम मंदिराच्या पायाभरणीचे कार्य सुरू झाले. यावेळी श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्राचे वरिष्ठ पदाधिकारी आणि अधिकारी उपस्थित होते.

**१७ ऑगस्ट२०२१**

अयोध्येत श्रीराम जन्मभूमीमंदिराच्या बांधकाम ालागती देत गर्भगृहाच्या स्थानावर कूर्मशिला स्थापनेचे कार्य शास्त्रोक्त विधीनेपूर्ण झाले.

**३१ मे २०२१**

श्रीराम जन्मभूमी संकुलाच्या पायाभरणीसाठी सातत्याने उत्खनन केल्यानंतर, तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार पायाभरणीचे काम रोलर कॉम्पॅक्ट काँक्रीट तंत्रज्ञानाने केले जाईल, असा निर्णय घेण्यात आला. सुमारे १,२०,००० चौरस फूट क्षेत्र आधीच ४ थर ठेवले गेले होते. अशाच प्रकारे एकूण ४०-४५ थरांचे नियोजन करण्यात आले होते.

**१३ ऑगस्ट २०२१**

शतकानुशतकांनंतर भगवान रामलल्ला चांदीच्या झोपाळ्यावरविराजमान झाले.

**२९ ऑगस्ट २०२१**

माननीय राष्ट्रपतींनी श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टच्या सदस्यांकडून श्रीराम जन्मभूमी परिसरात सुरू असलेल्या मंदिर बांधकामाची सविस्तर माहिती घेतली आणि परिसरात वृक्षारोपण केले.

**२८ ऑक्टोबर २०२१**

श्रीलंकेचे उच्चायुक्त, उप उच्चायुक्त आणि केंद्रीय मंत्री श्रीराम जन्मभूमी मंदिरासाठी दगडांसह श्रीलंकेतील अशोक वाटिका येथून अयोध्येत पोहोचले आणि त्यांना भगवान श्रीराम लल्ला यांच्या चरणी अर्पण केले. त्यानंतर सर्व पाहुण्यांनी भगवंताची पूजा व आरतीत सहभाग घेतला.

**३ नोव्हेंबर २०२१**

अयोध्येतील श्रीराम जन्मभूमी परिसरात दीपोत्सव साजरा.

**१ जानेवारी २०२२**

दि. १ जानेवारी २०२२ रोजी सुमारे १,१२,००० भाविकांनी श्रीराम जन्मभूमी येथील तात्पुरत्या मंदिरात विराजमान भगवान श्रीराम लल्ला सरकारांचे दर्शन घेतले.

**१३ जानेवारी २०२२**

अयोध्येत भगवान श्रीरामांच्या पवित्र जन्मभूमीवर बांधण्यात येत असलेल्या भव्य श्रीराम जन्मभूमी मंदिराच्या बांधकामाची संपूर्ण प्रक्रिया ३ऊ चित्रपटाच्या माध्यमातून सादर करण्यात आली.

**२४ जानेवारी २०२२**

श्रीराम जन्मभूमी मंदिराच्या जागेवर बांधलेल्या राफ्टवर पूजा विधीनंतर ग्रॅनाइट दगडांचा ब्लॉक ठेवून मंदिराच्या फरशीची उंची वाढवण्याचे काम सुरू झाले. यावेळी ट्रस्टचे सदस्य, सन्माननीय संत आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

**एप्रिल २, २०२२**

चैत्र नवरात्र आणि नवीन वर्षाच्या प्रारंभी अयोध्येतील श्रीराम जन्मभूमी मंदिराची पूजा करण्यात आली आणि नवीन ध्वज फडकवण्यात आला.

**१० एप्रिल २०२२**

रामनवमीच्या पावन पर्वावर अयोध्या स्थित श्री राम जन्मभूमीपरिसरातफुलांनी सुंदर सजावट करण्यात आली.

**१ जून २०२२**

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी शिलापूजन करून श्रीराम जन्मभूमी मंदिराच्या गर्भगृहाच्या बांधकामाचा शुभारंभ केला. यावेळी श्रीराम जन्मभूमी न्यासचे पदाधिकारी, पूज्य संत आणि प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

**१३ ऑगस्ट २०२२**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानंतर श्रीराम जन्मभूमी मंदिर संकुलात ध्वजारोहण करण्यात आले.

**२३ ऑक्टोबर २०२२**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अयोध्येत दीपोत्सवाच्या प्रसंगी श्रीरामलला दर्शन-पूजन व मंदिर बांधकामाचे निरीक्षण.

**३ ऑक्टोबर २०२३**

श्रीराम जन्मभूमी मंदिराचे रक्षण व पुनःप्राप्तीसाठी गेल्या ५०० वर्षांमध्ये हौतात्म्य पत्करणाऱ्या हुतात्म्यांच्या आत्म्याच्या शांतीसाठी श्री वाल्मिकी रामायण आणि श्रीरामचरित मानस यांच्या नवाह्न पारायणाचा प्रारंभ श्रीराम जन्मभूमी परिसरात करण्यात आला.

**९ ऑक्टोबर २०२३**

श्रीराम जन्मभूमी मंदिराचे भव्य सिंहद्वार, नृत्य मंडप आणि मजल्यावरील कोरीवकाम सार्वजनिक करण्यात आले.

**१३ ऑक्टोबर २०२३**

श्रीराम जन्मभूमी चळवळीत प्राणांची आहुती देणाऱ्या रामभक्तांच्या आत्म्यांच्या शांतीसाठी अयोध्येत राम की पौडीयेथे दीपदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**५ नोव्हेंबर २०२३**

श्रीराम जन्मभूमि मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी लोकांना आमंत्रित करण्यासाठी जन्मभूमी परिसरातअक्षत पूजन करण्यात आले आणि कार्यकर्त्यांमध्येवितरण करण्यात आले.

**११ नोव्हेंबर २०२३**

श्रीराम जन्मभूमी मंदिरात दीपोत्सव आणि पूजा.

**१९डिसेंबर २०२३**

श्रीराम मंदिराचे मुख्य वास्तुविशारद चंद्रकांत सोम पुरा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी बांधकामाचे निरीक्षण केले.यावेळी ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय आणि इतर विश्वस्तही उपस्थित होते.

**२७ डिसेंबर २०२३**

श्रीराम जन्मभूमी परिसरात चार वेदांच्या सर्व शाखांचे पठण करण्यातआले आणि अखंड यज्ञ करण्यात आला.या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टने देशातील सर्व प्रांतांतील प्रख्यात वैदिक विद्वान आणि यज्ञाचार्यांना आमंत्रित केले होते.

**१ जानेवारी २०२४**

१ जानेवारी २०२४ रोजी हजारो रामभक्तांनी अयोध्येतील श्रीराम जन्मभूमी मंदिरात भगवान रामलल्ला सरकारची पूजा केली.

**४ जानेवारी २०२४**

श्रीराम जन्मभूमी मंदिराच्या प्रवेशद्वारांवर गज, सिंह, हनुमान आणि गरुड यांच्या मूर्ती स्थापित करण्यात आल्या. या मूर्ती राजस्थानमधील बंसी पहाडपूर गावातील हलक्या गुलाबी वाळूच्या दगडांनी बनविल्या आहेत.

**११ जानेवारी २०२४**

श्रीराम जन्मभूमी परिसरात, श्रीरामलला प्राण प्रतिष्ठानाचा एक भाग असलेल्या चतुर्वेद सहाकारांतर्गत शुक्ल यजुर्वेद माध्यंदिनाय शाखा स्वाहाकार पारायण यज्ञ करण्यात आला. या यज्ञात भारताच्या भूमीच्या पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत आणि उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत १०१ पूज्य ब्राह्मणांनी भाग घेतला.

**२२ जानेवारी २०२४**

श्रीरामलल्ला सरकार प्राण प्रतिष्ठा अनुष्ठानात स्थापन करण्यात आलेल्या देवतांची दैनिक पूजा, हवन, पारायण इत्यादी कार्य, प्रातः मध्वाधिनास, मूर्तीचे ११४ ११४ कलशांच्या विविध औषधी पाण्यासह स्नपन, महापूजा, उत्सवमूर्तींची प्रासादपरिक्रमा, शय्याधिनास, तत्त्वन्यास, महान्यास, आदिन्यास, शान्तिक-पौष्टिक - अघोर होम, व्याहृति होम, रात्रिजागरण, सायंपूजाव आरती करण्यात आली.

**२६ जानेवारी २०२४**

शास्त्रीय परंपरेनुसार श्रीराम जन्मभूमी मंदिरात राग सेवा आयोजित करण्यात आली. हा कार्यक्रम भगवंतासम ोरील गुढी मंडपात आयोजित करण्यात आला, त्यामध्ये देशभरातील विविध प्रांत आणि कला परंपरांतील १०० हून अधिक प्रख्यात कलाकारांनी ४५ दिवस भगवान श्रीराम लल्ला सरकारच्या चरणी आपली राग सेवा दिली.

**१ मे २०२४**

भारताच्या राष्ट्रपती श्रीमती. द्रौपदी मुर्मू यांनी श्रीराम जन्मभूमी मंदिरात भगवान श्रीरामलल्ला सरकारची पूजा केली आणि आरतीमध्ये भाग घेतला.

**५ मे २०२४**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अयोध्या धाम येथील श्रीराम जन्मभूमी मंदिरात प्रभू श्रीरामलला सरकारांचे दर्शन व पूजा केली.

**३० ऑक्टोबर २०२४**

श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्ट, श्री कांची कामकोटी पीठ तसेच चिन्मयी सेवा न्यास यांच्या वतीने श्रीराम जन्मभूमी परिसरातील यज्ञशाळेत १८ नोव्हेंबर २०२४ ते १ जानेवारी २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या श्री महानारायण दिव्या रुद्र सहित शत सहस्र चंडी विश्वशांती महायज्ञ यशस्वीपणे पार पडावा यासाठी तीन दिवसाच्या अनुष्ठानाचे आयोजन करण्यात आले. या अनुष्ठानांतर्गत विघ्नेश्वर पूजा, भूमी पूजा आणि वनदुर्गा महाविद्या हवन करण्यात आले. यावेळी श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे श्री चंपत राय आणि इतर संबंधित म ान्यवर उपस्थित होते.

**११ जानेवारी २०२५**

श्रीराम जन्मभूमी मंदिरात प्रभू श्रीरामलला सरकार यांच्या प्राणप्रतिष्ठेच्या प्रथम वर्षपूर्तीनिमित्त प्रतिष्ठा द्वादशी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**१७ मार्च २०२५**

श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे अध्यक्ष पूज्य महंत नृत्य गोपाळ दास यांच्या अध्यक्षतेखाली मासिक बैठक झाली, यामध्ये मंदिराशी संबंधित भविष्यातील योजनांवर सविस्तर चर्चा झाली. मंदिराच्या बांधकामाच्या अद्ययावत स्थितीची माहिती देण्यात आली आणि उर्वरित कामे पूर्ण करण्याच्या संभाव्य कालावधीची माहिती देण्यात आली.

**६ एप्रिल २०२५**

श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टच्या वतीने श्रीराम जन्मोत्सवाचे आयोजन.

**५ सप्टेंबर २०२५**

भूतानचे पंतप्रधान श्री. दाशो शेरिंग तोबगे श्रीराम जन्मभूमी मंदिरात प्रभू श्रीरामलल्ला सरकार यांच्या दर्शनासाठी सपत्नीक आले. भगवान रामलला सरकारांच्या दर्शनानंतर त्यांनी श्रीराम दरबारला भेट दिली आणि त्यानंतर कुबेर टिला येथे भगवान शिवाचा जलाभिषेक आणि आरती केली.

**१२ सप्टेंबर २०२५**

मॉरिशसचे पंतप्रधान नवीनचंद्र रामगुलाम पत्नीसह अयोध्येतील भव्य राम जन्मभूमी मंदिरात दर्शनासाठी आले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# बुद्धिमत्तेच्या ब्रह्मास्त्राचे बूमरँग!

माध्यमांचा आभासी मंच म्हणून जगभर वेगाने फैलावलेल्या समाजमाध्यमांनी अवघे माध्यमविश्वच आपल्या कवेत घेतल्याने, माध्यमांच्या नीतिनियमांचे रूढ संकेत आजकाल फारसे गांभीर्याने पाळले जात नाहीत असे अनेकवार उघड झाले आहे. जवळपास प्रत्येकाच्याच हाती असलेल्या मोबाईल नावाच्या तळहाताएवढ्या साधनाचा वापर करून माध्यमविश्वात सहज संचार करण्याची शक्ती प्रत्येकासच प्राप्त झाल्यामुळे या संकेतांचा संकोच होत गेला ही वस्तुस्थिती आता भविष्यभयाच्या रूपाने अधिक गडदही होऊ लागली आहे. माध्यमांवर समाजमाध्यमांचा पूर्ण पगडा प्रस्थापित झालाच, तर खरे काय व खोटे काय हे ठरविणेदेखील कालांतराने अशक्य होऊन खोट्या बाबीच खऱ्या म्हणून समाजाच्या माथी मारल्या गेल्यास त्यातून समाजात वैचारिक गोंधळ निर्माण होऊन ही स्थिती थेट अराजकापर्यंतही जाऊ शकेल अशी भीती आता डोके वर काढू लागली आहे. आजकाल ज्या वेगाने दळवणवळण व आभासी माध्यमविश्वाच्या विकासाची क्रांती सुरू झाली आहे, ते पाहता हा भविष्यकाळ आजच्या पिढ्यांपासून फार दूर नाही हे मान्य करावे लागेल. तसे पाहता, क्रांती ही एका रात्रीत घडणारी गोष्ट नाही. उत्क्रांती ही तर त्याहूनही अधिक संथपणे काळाच्या प्रवाहासोबत पुढे सरकणारी प्रक्रिया असते. या उत्क्रांतीच्या प्राथमिक टप्प्यांचा काळदेखील लाखो, हजारो वर्षांचा होता. पण आता तर, दिवसागणिक विकासाचे नवे टप्पे गाठण्याएवढा वेग वाढल्यामुळे, उत्क्रांतीच्या पुढच्या टप्प्यांचे भविष्यदेखील अगदी हाकेच्या अंतरावर आल्यासारखे भासू लागले आहे. येत्या काही वर्षांत येऊ घातलेल्या नव्या क्रांतीची चर्चा सुरू झाली आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता, म्हणजे, आर्टिफिशियल इन्टेलिजन्स हा मानवाच्या जीवनातील भविष्यातील बदलाचा क्रांतिकारी टप्पा ठरणार असल्याने, साहजिकच त्याच्या गुणदोषांची चर्चा आता गांभीर्याने सुरू झाली आहे. ही नवी क्रांती माणसाचे जीवन अधिक सुसह्य करणार की सामान्य जगण्यासमोर संकटांचे डोंगर उभे करणार याची चिंताही व्यक्त होऊ लागली आहे. सुमारे दोन वर्षांपूर्वीच्या जुलै महिन्यात संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेत कृत्रिम बुद्धिमत्तेचे धोके या विषयावर झालेल्या परिषदेत ही चिंता उमटली होती. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे माणसाच्या जीवनशैलीत आमूलाग्र बदल होणार असल्याने मानवी व्यवहारांत त्याचे मूलभूत परिणाम होत राहतील, असे मत या परिषदेत ब्रिटनने नोंदविले होते, तर कृत्रिम बुद्धिमत्ता हा उधळलेला बेफाम वारू ठरू नये, अशी अपेक्षा चीनने व्यक्त केली होती. एका बाजूला कृत्रिम बुद्धिमत्तेच्या अविवेकी वापराच्या भीतीमुळे संभवणाऱ्या परिणामांची चिंता व्यक्त होत असताना, भारताने मात्र, या नव्या क्रांतीच्या विवेकी वापराचा आराखडा निर्माण करण्यास सुरुवातही केली होती. मानवी मेंदूला पर्याय ठरणारी ही नवी क्रांती केवळ संकटच ठरेल असे नाही, पण त्याचा गैरवापर रोखण्यासाठी जागतिक स्तरावर तंत्रज्ञानाच्या नियमनाची सूत्रे निश्चित केली नाहीत तर मात्र ते संकट ठरू शकेल, यावर या परिषदेत एकमत झाले होते, तेव्हा भारताच्या विविध क्षेत्रांतील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराचे नीतिनियम निश्चित करण्याच्या प्रक्रियेसही सुरुवात झाली होती. तीन वर्षांपूर्वी, २०२२ मध्ये भारताच्या यजमानपदाखाली पार पडलेल्या, जगातील सर्वांत मोठ्या अर्थव्यवस्था असलेल्या राष्ट्रांच्या जी-२० या परिषदेत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या जागतिक चिंता आणि त्यासंदर्भातील भारताचे महत्त्व व भूमिका जागतिक स्तरावर अधोरेखित झाली. त्या वर्षीच्या जी-२० परिषदेपाठोपाठ कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्राशी संबंधित असलेल्या जागतिक भागीदारी संघटनेचे अध्यक्षपदही भारताकडे आले होते. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून जबाबदार आणि मानवकेंद्रित विकास साधण्यासाठी कार्यरत असलेल्या ग्लोबल पार्टनरशिप ऑफ आर्टिफिशियल इन्टेलिजन्स (जीपीएआय) या आंतरराष्ट्रीय उपक्रमातही या क्षेत्रातील भारताच्या भरीव कामगिरीला मान्यता मिळाली होती. सामान्यजनांचे जीवनमान सुधारण्यासाठी तंत्रज्ञानाचा नैतिक वापर करण्यावर भर देणाऱ्या भारताच्या प्रयत्नांना मिळालेली ही जागतिक मान्यतेची पावती ठरली होती.

आज तीन वर्षांनंतर पुन्हा, जोहान्सबर्ग येथे भरलेल्या जी-२० परिषदेच्या त्याच मंचावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या जागतिक वापरासंबंधीच्या नैतिकतेचा पुनरुच्चार करून व्यापक समाजहिताच्या भारताच्या बांधिलकीचे दर्शन घडविले आहे. तंत्रज्ञानाच्या विकासाबरोबतच त्यावर काही मोजक्यांकडून प्रस्थापित होणारी मक्तेदारी हा चिंतेचा मुद्दा असून त्यामुळे जागतिक स्तरावर वाढलेले संघर्ष ही चिंतेची बाब असल्याच्या मताचा पुनरुच्चार करून, वित्तकेंद्रित वाटचालीचा मार्ग सोडून मानवकेंद्रित वाटचालीच्या मार्गावर वाटचाल करण्याचा आग्रह मोदी यांनी पुन्हा एकदा या परिषदेत केला. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर जागतिक कल्याणाकरिता करावयाचा असेल तर सामूहिक सामंजस्यातून त्याचा गैरवापर टाळावाच लागेल, ही भूमिका याच परिषदेत पुन्हा एकदा अधोरेखित झाल्याने, भारतात समाजमाध्यमांच्या मंचास भेडसावणाऱ्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या गैरवापराचा मुद्दा गांभीर्याने हाताळण्यावर भर देणे महत्त्वाचे ठरणार आहे. गेल्या काही वर्षांत समाजमाध्यमांवर कृत्रिम बुद्धिमत्तेच्या तंत्रज्ञानाने पुरता कब्जा मिळविला आहे. याचा वापर करून प्रामुख्याने चारित्र्यहनन व असत्य कथनाचा फैलाव मोठ्या प्रमाणावर होत असल्याचेही उघड होऊ लागल्याने, तंत्रज्ञान क्षेत्रातील ब्रह्मास्त्र म्हणून जन्माला आलेले कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान बूमरँग ठरण्याची भीती या क्षेत्राला सर्वाधिक भेडसावू लागली आहे. डीप फेक आणि दहशतवादाकरिता कृत्रिम बुद्धिमत्तेचा होणारा वापर पाहता, या तंत्रज्ञानाच्या जन्मानंतर लगेचच सुरू झालेली भीती खरी ठरत असल्याची खात्रीदेखील पटू लागली आहे. त्यामुळेच या ब्रह्मास्त्राच्या गैरवापरास लगाम घालण्याकरिता जागतिक स्तरावर सहमती आणि सामूहिक प्रयत्नांकरिता पुढाकार घेण्यासाठी भारत सज्ज होत असल्याचे संकेत पंतप्रधानांनी या मंचावरून दिल्याने, पुन्हा एकदा भारताचे महत्त्व अधोरेखित होणार आहे. कोणत्याही विकसित तंत्रज्ञानाचा वापर हा संकुचित प्रादेशिक हितापेक्षा जागतिक हिताचा व्हावा ही भारताची विकासनीती यशस्वी होत असल्याचे अनेक दाखले आता समोर येऊ लागले आहेत. अंतरिक्ष संशोधन क्षेत्रात गेल्या काही वर्षांत भारताने केलेल्या प्रगतीच्या वाटचालीत जगातील अनेक देशांना सहभागी करून घेण्याची भारताची भूमिका हा त्याचा प्रत्यक्ष पुरावादेखील ठरला आहे यात शंका नाही. तीन वर्षांपूर्वीच्या दिल्ली येथील जी-२० शिखर परिषदेत भारताने मांडलेल्या भूमिकेस बळ देणारे नवे पाऊल टाकण्याची पुढची संधी या परिषदेच्या निमित्ताने भारतास मिळाली आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या नैतिक वापराच्या भारताच्या आग्रही भूमिकेचा जागतिक पुनरुच्चार अधिक प्रबळ करण्यासाठी येत्या वर्षांत फेब्रुवारी २०२६ मध्ये भारताच्या यजमानपदाखाली भरविल्या जाणाऱ्या कृत्रिम बुद्धिमत्ता परिणाम परिषदेचे सूत्र 'सर्वजन हिताय, सर्वजन सुखाय' हे असणार आहे. तीन वर्षांपूर्वीच्या जी-२० परिषदेच्या यजमानपदावरून भारताने 'वसुधैव कुटुम्बकम' हा भारतीय संस्कृतीच्या शिकवणीचा संदेश जगाला दिला होता आणि मानवकेंद्रित जागतिक विकासाची भारताची भूमिका जगाच्या गळी उतरविण्याच्या प्रक्रियेचे पाऊल टाकले होते. जागतिक स्तरावर मानसिकतेत बदल करून जगाला व्यक्तिकेंद्रित विकासनीतीची दिशा देण्याच्या भारताच्या या पुढाकारामुळे सहकार्य, शांतता, ऐक्य व मानवतेचा नवा संदेश देण्याकरिता जी-२० परिषदेचा मंच उपयुक्त ठरणार आहे. मानसिकतेतील बदलाची ही प्रक्रिया सोपी नाही. ते एक आव्हान आहे. सध्याच्या चौकटीत ते आव्हान पेलण्याची क्षमता नाही. त्यामुळेच, काही अपेक्षांचे ओझे संयुक्त राष्ट्रांच्या खांद्यावर देऊन पंतप्रधान मोदी यांनी नव्या बदलाच्या मानसिकतेची रुजवात केली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेतच सुधारणा होणे आवश्यक असल्याची ठाम भूमिका या परिषदेत मांडून पंतप्रधानांनी सुधारणांसाठी आवश्यक असलेल्या जागतिक मतैक्याच्या प्रक्रियेचीही पायाभरणी केली आहे. जी-२० परिषदेत अमेरिकेच्या उपस्थितीमुळे काही राजनैतिक वादाची चिन्हे उद्भवत असताना, भारताच्या ठाम भूमिकेला मिळणारा पाठिंबा आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची प्रतिष्ठा उंचावणारा ठरेल, अशी अपेक्षा करावयास हरकत नाही. तसे झाले, तर नवतंत्रज्ञानाची ब्रह्मास्त्रे हाताळण्याचा मंत्रदेखील भारताला गवसलेला असेल. ▮

## आंतरराष्ट्रीय

# भारताच्या भीतीने चीनचा शस्त्रपुरवठा

प्रा. जयसिंग यादव

दोन देशांमध्ये संघर्षाचे परिणाम जगाला भोगावे लागत असतात. अशा वेळी मध्यस्थी करून संघर्ष मिटवण्याची अपेक्षा असते. शेजारच्या देशांनी त्यासाठी पुढाकार घ्यायचा असतो; परंतु चीन नेमके याविरोधात वागत असतो. 'दोघांत भांडण, तिसऱ्याचा लाभ' असे म्हटले जाते. भारत आणि पाकिस्तानमधील तीव्र संघर्षाकडे चीनने सुवर्णसंधी म्हणून पाहिले. अमेरिकेच्या अलिकडच्या एका अहवालानुसार, चीनने पाकिस्तानच्या सहकार्याने या संघर्षाचे रूपांतर त्यांच्या शस्त्रांच्या युद्धभूमी चाचणीत केले. त्यानंतर त्यांनी मुस्लिम देशांना शस्त्रे विकण्यासाठी या चाचणी निकालांचे अतिरंजित वर्णन केले. अहवालात म्हटले आहे की चीनने केवळ जमिनीवरच आपल्या शस्त्रांची चाचणी केली नाही, तर पाश्चात्त्य देशांविरुद्ध शस्त्रास्त्रांचा बाजार मजबूत करण्यासाठी जगभरात आक्रमकपणे त्यांचा प्रचार केला. मे २०२५ च्या संघर्षादरम्यान, चीनच्या अनेक प्रगत शस्त्रांचा वापर प्रत्यक्ष युद्धात पहिल्यांदाच करण्यात आला. यामध्ये एचक्यू-९ हवाई संरक्षण प्रणाली, पीएल-१५ हवेतून हवेत मारा करणारे क्षेपणास्त्र आणि जे-१०सी लढाऊ विमान यांचा समावेश आहे. भारतासमोर चीनची अनेक शस्त्रे निष्प्रभ ठरली; परंतु त्याची जगभर चर्चा होऊ नये, म्हणून आपली शस्त्रास्त्रे किती परिणामकारक ठरली, याचा आक्रमक प्रचार करून चीनने शस्त्रास्त्रांची जागतिक बाजारपेठ मजबूत करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी पाकिस्तानचा उपयोग करून घेतला. पाकिस्तानने मुस्लिम राष्ट्रांचे मत परिवर्तन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

पाकिस्तान-भारत संघर्षावेळी चीनची आधुनिक शस्त्रे सक्रिय लढाईत तैनात करण्याची ही पहिलीच वेळ होती आणि चीनने संपूर्ण संघर्षाचा वापर एक प्रकारचा 'फील्ड एक्सपिरीमेंट' म्हणून केला. अहवालानुसार, चीनने पाश्चात्त्य शस्त्रांविरुद्ध आपल्या उत्पादनांची विक्री करण्यासाठी पाकिस्तानच्या लष्करी यशाचा फायदा घेतला. पाकिस्तानचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री इशाक दार यांनी संसदेत दावा केला की पाकिस्तानी जे-१० सी विमानांनी राफेलसह भारतीय हवाई दलाची अनेक विमाने पाडली. अहवालात म्हटले आहे की पाकिस्तानचे हे दावे अतिशयोक्तीपूर्ण आहेत; परंतु चिनी दूतावासांनी जगभरात शस्त्रास्त्र विक्री वाढवण्यासाठी हे दावे केले. चीनने 'सोशल मीडिया'वरील बनावट खात्यांद्वारे 'एआय' व्युत्पन्न प्रतिमा आणि व्हिडीओ-गेम ग्राफिक्स भारतीय विमानांचे अवशेष म्हणून प्रसारित केले. फ्रेंच राफेलची प्रतिमा खराब करण्यासाठी आणि स्वतःच्या जे-३५ लढाऊ विमानांचा प्रचार करण्यासाठी याचा वापर करण्यात आला होता. फ्रेंच गुप्तचर यंत्रणेचा हवाला देत, अहवालात दावा केला गेला की चीनच्या प्रचार मोहिमेनंतर इंडोनेशियाने राफेल खरेदी प्रक्रिया थांबवली. अहवालात म्हटले आहे की पाकिस्तान चिनी शस्त्रांवर खूप अवलंबून आहे. जूनमध्ये चीनने पाकिस्तानला ४० जे-३५ लढाऊ विमाने, केजे-५००



आणि बॅलिस्टिक क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली विकण्याची ऑफर दिली. 'स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूट' च्या मते, गेल्या पाच वर्षांमध्ये पाकिस्तानच्या शस्त्रास्त्र आयातीपैकी ८१ टक्के शस्त्रे चीनमधून आली आहेत.

मध्य पूर्वेला चीनची वाढती शस्त्रास्त्र निर्यात चीनच्या व्यापक ऊर्जा सुरक्षेच्या प्रयत्नात रुजली आहे आणि ही प्रवृत्ती उदयोन्मुख बहुध्रुवीय जागतिक संरचना दर्शवते. जागतिक शस्त्रास्त्र बाजारपेठेत एक प्रमुख खेळाडू म्हणून चीनचा उदय 'पीपल्स लिबरेशन आर्मी' (पीएलए)च्या क्षमता वाढवण्याच्या प्रेरणेने झाला. परिणामी, त्यांनी त्यांच्या संरक्षण उद्योगात सुधारणा केल्या आहेत आणि त्यांची संरक्षण उपकरणे सुधारण्यासाठी लष्करी खर्च सातत्याने वाढवला आहे. शस्त्रास्त्र बाजारपेठेतील चीनची भूमिकादेखील बदलत्या सुरक्षा वातावरणाची जाणीव करून देते. २०१२ ते २०१६ दरम्यान जागतिक शस्त्रास्त्र निर्यातीत चीनचा वाटा ३.८ टक्क्यांवरून ६.२ टक्क्यांपर्यंत वाढला. २०१६-२०२० या काळात तो ५.२ टक्क्यांपर्यंत घसरला असला, तरी चीन जगातील पाचव्या क्रमांकाचा शस्त्रास्त्र निर्यातदार राहिला आहे. अमेरिका आणि रशियाच्या तुलनेत त्याचा वाटा माफक असला, तरी नवीन तंत्रज्ञानासह नवीन बाजारपेठेत प्रवेश करण्यास सज्ज आहे. 'सेंटर फॉर नेव्हल ॲनालिसिस'च्या विश्लेषणानुसार चीनने शस्त्रास्त्रनिर्यातीत एक स्थान निर्माण केले आहे. २०२० च्या अमेरिकन संरक्षण विभागाच्या अहवालानुसार, टनेजच्या बाबतीत चीन जगातील अव्वल जहाज उत्पादक देश आहे. चीन आघाडीवर असणारे आणखी एक क्षेत्र म्हणजे सशस्त्र ड्रोन. (ज्याला मानवरहित हवाई वाहने, यूएव्ही असेही म्हणतात). २०१८ पर्यंत चीनने जगभरातील १० हून अधिक देशांना जड आणि सशस्त्र यूएव्हीज निर्यात केले होते. चीनने पाकिस्तानी हवाई दलासह संयुक्तपणे चिनी विंग लूंग २ ड्रोन तयार करण्यास सहमती दर्शविली आहे.

२०१३ च्या 'एसआयपीआरआय' अहवालानुसार चीन लहान शस्त्रे आणि हलक्या शस्त्रांचादेखील एक प्रमुख निर्यातदार आहे. चीन शस्त्रास्त्रे खरेदी करणाऱ्या देशांना लवचीक 'पेमेंट स्ट्रक्चर्स'देखील ऑफर करतो. ते विकसनशील देशांसाठी आकर्षक आहे. शिवाय लष्करी उपकरणांच्या स्रोतांमध्ये विविधता आणू इच्छिणाऱ्या देशांनाही चिनी शस्त्रे चांगली वाटतात. चिनी उपकरणांची गुणवत्ता आणि टिकाऊपणाबद्दल साशंकता असली, तरी पैसे, सवलती आणि संबंधित देशांमधील राज्यकर्त्यांना लाच देऊन खरेदी करणे भाग पाडले जाते. चीनला प्रामुख्याने शस्त्रास्त्रनिर्यातीच्या राजकीय नव्हे, तर व्यावसायिक फायद्यांमध्ये रस आहे; शिवाय हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे, की या व्यवहारातले आर्थिक फायदे खूप मोठे असून शस्त्रास्त्र निर्यातदार असण्याचा प्रभाव, विशेषतः कमकुवत देशांवर राहणारा वरचष्मा तितकाच शक्तिशाली आहे. चीनची व्यापक मध्य पूर्व रणनीती अशा उद्दिष्टांना समर्थन देते. २०१६ मध्ये त्यांनी अरब पॉलिसी पेपर जारी केला आणि मध्य पूर्वेला आपल्या 'बेल्ट ॲण्ड रोड इनिशिएटिव्ह'चा एक महत्त्वाचा भाग बनवले. मध्य पूर्वेतील अस्थिर प्रादेशिक परिस्थितीमुळे या प्रदेशातील देशांसोबत चीनच्या ऊर्जा सहकार्याला धोका वाढतो. हे अशा वेळी घडत आहे, जेव्हा अमेरिका मध्य पूर्वेवरील आपले लक्ष कमी करून इंडो-पॅसिफिक क्षेत्रावर पुन्हा लक्ष केंद्रित करत आहे.

मध्य पूर्वेमध्ये, चिनी ड्रोन्स विशेष लोकप्रिय आहेत. इजिप्त, इराक, जॉर्डन, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती या सर्वांना विंग लून आणि सीएच-४ ड्रोनसह सशस्त्र चिनी यूएव्ही मिळाले आहेत. अशा प्रकारे चीन मध्य पूर्वेतील यूएव्ही शस्त्रास्त्रांच्या शर्यतीला चालना देत आहे. शिवाय, अमेरिकेने मध्य पूर्वेतील अरब देशांना सशस्त्र ड्रोन विकण्यासाठी प्रतिबंधात्मक निर्यात धोरण लागू केले आहे. चीनने या संधीचा फायदा घेत या प्रदेशात आपली उपस्थिती वाढवली आहे. अमेरिकेने जॉर्डनला प्रीडेटर एक्सपी ड्रोन देण्यास नकार दिला. त्यानंतर हा देश सीएच-४ बी ड्रोन खरेदी करण्यासाठी चीनकडे वळला. इराकनेही अशीच भूमिका घेतली. अमेरिकेचा दृढ मित्र असलेला सौदी अरेबिया हा चिनी शस्त्रास्त्रांच्या सर्वोच्च आयातदारांपैकी एक आहे. सौदी अरेबियाने चिनी डीएफ-२१ बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि विंग लूंग ड्रोन खरेदी केले आहेत. तसेच चीनने सौदी अरेबियामध्ये संयुक्तपणे सीएच ड्रोन तयार करण्याचा करार केला आहे. सौदी अरेबिया सध्या चीनला होणाऱ्या तेलाचा सर्वोच्च पुरवठादार आहे. या वस्तुस्थितीवर आधारित हे संबंध आहेत. इराण हा चिनी शस्त्रास्त्रनिर्यातीचा पहिला खरेदीदार होता. आतापर्यंत चीनने इराणला सिल्कवर्म आणि सी-८०२ क्षेपणास्त्रे विकली आहेत. ही दोन्ही जहाजविरोधी क्षेपणास्त्रे आहेत. शिवाय, इराणी बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे चिनी डिझाईनवर आधारित विकसित केली गेली आहेत. चिनी तंत्रज्ञांनी या विकासात मदत केल्याचे वृत्त आहे. ▮

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

चंद्रकांत लोहाणा

# चिंता वाढविणारी अपघात-मालिका

रस्त्यावर होणाऱ्या अपघातांची स्थिती भारतामध्ये अतिशय चिंताजनक असून, दरवर्षी अपघातांमध्ये लाखो लोकांना आपले प्राण गमवावे लागतात. रस्ते अपघातांमध्ये जगात भारताचा ११ वा क्रमांक लागतो. रस्त्यावर होणारे अपघात हे ९० टक्के मानवी चुकांमुळे होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामध्ये वाहतूक नियमांचे पालन न करणे, निष्काळजीपणे वाहन चालविणे, वेगावर नियंत्रण नसणे, मोबाईल फोनचा अति वापर व मद्य प्राशन करून वाहन चालविणे ही प्रमुख कारणे आहेत. देशामध्ये व्यावसायिक वाहनांमध्ये भारमर्यादेचे पालन होत नसल्यानेही अपघाताचे प्रमाण अधिक वाढले आहे. देशामध्ये २०२० मध्ये १ लाख ५१ हजार ११३ अपघात झाले असून, त्यामध्ये १ लाख ३१ हजार ७१४ लोकांचा मृत्यू झाला आहे. त्यामध्ये राष्ट्रीय महामार्गावर ५३ हजार ८७२ अपघात तर मृत्यूची संख्या ४७ हजार ९८४ एवढी आहे. अपघातामध्ये राष्ट्रीय महामार्गाचा वाटा ३५.७ टक्के असून, मृत्यूची टक्केवारी ३६.४ आहे. राज्य महामार्गावर ३८ हजार ४७२ अपघात झाले असून, त्यामध्ये ३३ हजार १४८ लोकांचा मृत्यू झाला आहे. अपघातामध्ये राज्य महामार्गाचा वाटा हा २५.५ टक्के असून, मृत्यूची टक्केवारी २५.२ एवढी आहे. याचाच अर्थ भारतामध्ये दरवर्षी रस्ते अपघातामध्ये लाखो लोकांचा बळी जात असून, जखमी व कायमचे अपंगत्व येणाऱ्यांची संख्या तर त्यापेक्षाही अधिक आहे.

अपघात का होतात हे प्रत्येक वाहनचालकांना माहीत असते. तरीही रस्त्यावर अपघात घडतातच. आजकाल देशामध्ये हायस्पीड वाहनांची संख्या अतिशय वाढली आहे. त्यामुळे वेगावर कोणतेही नियंत्रण राहले नाही. प्रत्येकाला इच्छित स्थळी पोहोचण्याची घाई असते. आयुष्यामध्ये ही स्पर्धा कधीतरी जीवावर बेतते. अपघात होण्यासाठी काही सेकंदाचाच अवधी पुरेसा ठरतो आणि अघटित घटना घडते. अपघात हे कुटुंब, समाज आणि राष्ट्राची हानी करणारे असतात. तरीही देशामध्ये लोकांचा अपघाताकडे बघण्याचा दृष्टिकोन अजूनही बदललेला नाही. अपघात घडल्यावर काही तासांच्या चर्चेनंतर सर्व काही सुरळीत होऊन जाते. घडलेल्या घटनांचे विश्लेषण करून त्यापासून काहीतरी शिकावं हे आम्हा भारतीयांच्या रक्तातच नाही. त्यामुळे अपघाताच्या मालिका सतत सुरू राहतात. अपघातामध्ये घरामधील एखादा कर्ता पुरुष दगावला तर संपुर्ण कुटुंब उघड्यावर येतं. त्या कुटुंबाची पार वाताहत होते. खेळण्या-बागडण्याचे दिवस असणाऱ्या किंवा शिक्षण घेणाऱ्या दहावी, बारावीच्या मुलांवर घर सांभाळण्याची जबाबदारी येऊन पडते. ज्या कुटुंबाचा काहीएक दोष नसतो त्या कुटुंबास आयुष्यभर नरक यातना भोगून जीवन जगावे लागते. प्रत्येक चालकाने ही जाणीव ठेवल्यास अपघाताचे प्रमाण निश्चित कमी होऊ शकते. रस्ते अपघातामध्ये दुचाकीच्या अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढीस लागले आहे. रस्त्यावर बेधुंद गतीने धावणाऱ्या दुचाकी अपघातास सर्वाधिक कारणीभूत ठरत आहेत. कोवळ्या वयामध्ये हाती आलेली दुचाकी रस्त्यावर स्टंट करीत धावताना आजकाल सहज दिसून येते. कोवळ्या वयामध्ये वेगवान गतीची हौस असली तरी एखाद्या बिकट समयी मेंदूची कार्यक्षमता पूर्णपणे विकसित झालेली नसल्याने लहान मुलांची निर्णयक्षमता त्यावेळेस दगा देते आणि अपघातास आमंत्रण देणारी ठरते. किती पालक या बाबीचा अभ्यास करून आपल्या मुलांच्या हातामध्ये दुचाकी देत असतील ही शंकाच आहे. रस्ते अपघामाध्ये खराब रस्त्याचाही काही वाटा असला तरी सर्वाधिक मानवी चुकाच अपघातास कारणीभूत ठरत असल्याचे निदर्शनास आले आहे. मद्य प्राशन केल्यानंतर मनुष्याचा मेंदूवरील ताबा पूर्णपणे सुटतो. त्यामुळे अशी अनियंत्रित झालेली व्यक्ती जर वाहन चालवीत असेल तर रस्त्यावर पुढे काय घडणार हे सांगण्यासाठी कोण्या भविष्यवेत्त्याची गरज नाही. आपला जवळच्या व्यक्तीचा अचानक झालेला मृत्यू अतिशय धक्कादायक व दुःखद असतो. जाणारा आपल्या मागे बरेच काही सोडून जातो. नंतर ते सावरायला अख्खं आयुष्यही कमी पडतं. अपघातामध्ये दगावणारी व्यक्ती ही आपल्या कुटुंबासाठी आणि राष्ट्रासाठी कायम अमूल्य असते. ही जाणीव ठेवून नियमांचे पालन करून वाहन चालविल्यास अपघातरूपी लागलेला कलंक सहज पुसला जाऊ शकतो. ▮

९८८१७१७८५६

## इतस्ततः

# कंत्राटी पद्धत : पालन आणि निर्मूलन

दत्तात्रेय आंबुलकर

कंत्राटी कामगार पद्धत हा मुद्दा उद्योग-व्यवसायच नव्हे, तर न्यायालयीन-प्रशासन क्षेत्रापर्यंत नेहमीच विविध संदर्भांसह चर्चेत राहिला आहे. बरेचदा कामगार संघटनांनी कंत्राटी कामगार पद्धत आणि त्याची अंमलबजावणी हे मुद्दे संघटनात्मक पातळीपासून न्यायालयीन लढ्यापर्यंत लावून धरले आहेत. या साऱ्यामध्ये कामगारांची कंत्राटदारांकरवी विशिष्ट वा विशेष कामासाठी नेमणूक करणे, हा नेहमीच कळीचा वा काळजीचा मुद्दा राहिलेला दिसतो. कधी केवळ उत्पादनक्षेत्रापुरती वा विशिष्ट काम वा व्यावसायिक कालावधीसाठी वर्षानुवर्षे प्रचलित असणारी कंत्राटी कामगार पद्धत आता उद्योग-व्यवसायात कायमची स्थिर झाली आहे. या पृष्ठभूमीवर आणि विशेषतः नव्या कामगार कायद्यांतर्गत कंत्राटी कामगार पद्धतीशी संबंधित पद्धत आणि तरतुदींचा अभ्यास करून तिची अंमलबजावणी करणे, सर्वच संबंधित आस्थापना आणि व्यवस्थापनासाठी आता अनिवार्य ठरले आहे. नव्या तरतुदींनुसार कंत्राटी कामगार कायदा, १९७०मध्ये पालन आणि निर्मूलन या मोठ्या महत्त्वाच्या तरतुदी आहेत. या तरतुदींनुसार महाराष्ट्रासारख्या राज्यात ज्या कारखाने वा आस्थापनांमध्ये ५०वा त्याहून अधिक कंत्राटी कामगार असतील, अशा ठिकाणी कंत्राटी कामगार कायदा,१९७०च्या नव्या तरतुदी लागू होणार आहेत. याच कायद्याच्या कलम १०नुसार विशिष्ट उद्योगांतर्गत कंत्राटी कामगार पद्धत का आणि कशा प्रकारे व कशा पद्धतीने बंद करता येऊ शकते, याची तरतूद करण्यात आली असून, यासंबंधीचे सारे अधिकार संबंधित राज्य सरकारांना देण्यात आले आहेत.

काही विशिष्ट उद्योगांसाठी कंत्राटी कामगार कायदा व त्यातील नियमांसंबंधी निर्णय घेण्याचे अधिकार केंद्र सरकारला देण्यात आले आहेत. याशिवाय, अशा निवडक उद्योगांमधील कंत्राटी कामगारांनी संघटना स्थापन करून काही मुद्दे अथवा काही तक्रारी मांडण्यास त्याचे निराकरण करण्याचे अधिकार व जबाबदारी केंद्रीयस्तरावर केंद्रीय कामगार खाते व न्यायालयावर सुपूर्द करण्यात आले आहेत.

या पृष्ठभूमीवर कारखाना आस्थापनांसह विविध उद्योगांतर्गत प्रचलित कंत्राटी प्रथा, पद्धती व त्याच्याशी निगडित प्रमुख मुद्द्यांवर वेळोवेळी व्यवस्थापन, कामगार संघटना व कंत्राटी कामगारांतर्फे कामगार अधिकाऱ्यांपासून कामगार न्यायालये, उच्च-न्यायालय व थेट सर्वोच्च न्यायालयांपर्यंत उभय बाजूंनी लढा देण्यात आला व त्यातूनही कंत्राटी कामगार पद्धतीला वेगळे बदलते स्वरूप प्राप्त झाले, हे



पाहणे महत्त्वाचे ठरते. कंत्राटी कामगारांशी संबंधित विविध प्रश्न आणि मुद्दे व त्यावरील व्यवस्थापनाची भूमिका आणि त्यांच्याशी संबंधित न्यायविद्-न्यायाधीशांनी घेतलेली विविध महत्त्वपूर्ण प्रकरणे आणि मुद्द्यांचा समावेश करता येईल. गुजरात इलेक्ट्रिसिटी बोर्ड विरुद्ध हिंद मजदूर सभा (१९९५), परिमल चंद्र शहा विरुद्ध आयुर्विमा महामंडळ (२००३), दीनानाथ विरुद्ध नॅशनल फर्टिलायझर्स लि. (१९९२), स्टील ॲथॉरिटी ऑफ इंडिया विरुद्ध नॅशनल वॉटरफ्रंट वर्कर्स (२००१) या आणि अशा प्रकारचे कंत्राटी कामगार व त्याच्याशी निगडित न्यायालयीन निर्णयांमुळे कंत्राटी कामगार कायद्याला वेळोवेळी वेगळे स्वरूप मिळत गेले. यातूनच कामगार संघटना, कामगार विषयांशी संबंधित शासन-प्रशासन, कामगार नेते- कायदेतज्ज्ञ, न्यायाधीश, उद्योग-व्यवस्थापनाचे प्रतिनिधी आणि संघटना इत्यादींचे विविध कामगार कायदे आणि नियम-पद्धती यामध्ये नव्याने विचार करून सुधारणा करण्याचा विचार प्रसंगानुरूप प्रबळ होत गेला. यातूनच प्रदीर्घ काळ झालेल्या चर्चा-विवाद, संघटनात्मक मुद्दे व व्यवसायाशी संबंधित घटकांच्या विचारातून केंद्र सरकारतर्फे नव्याने कामगार कायद्यांमध्ये सुधारणा करण्यात आल्या.

या नव्या कामगार कायद्यांतर्गत कंत्राटी कामगार पद्धतीशी संबंधित नव्याने बदललेल्या पद्धती व तरतुदी पुढीलप्रमाणे सांगता येतील-

**कामगार सुरक्षा, आरोग्य व कामकाज पद्धती नियम २०२०** : या नव्या कामगार कायद्यांच्या ११व्या कलमांतर्गत पहिल्या प्रकरणात नमूद केल्यानुसार कंत्राटी कामगारांशी संबंधित तरतुदींचा प्रामुख्याने समावेश केला गेला.

या नव्या वैचारिक तरतुदींनुसार कामगारांची कंत्राटी पद्धतींनुसार नेमणूक व वापर संबंधित उद्योग व आस्थापनांच्या मूळ व मूलभूत व्यवसाय प्रक्रिया वा पद्धतीला सोडून अन्य व आनुषंगिक कामांसाठी केला जाईल. यामध्ये मुख्यत्वेकरून आस्थापनांतर्गत साफसफाई, सुरक्षाव्यवस्था, भोजनव्यवस्था, रूग्णालय, प्रशिक्षण विभाग, कार्यालयीन सेवा-स्वच्छता, आस्थापनांतर्गत वाहतूकव्यवस्था वा तत्सम पद्धतींचा समावेश केला गेला हे विशेष. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर उद्योगांमधील कंत्राटी कामगार पद्धतीशी संबंधित असणाऱ्या सर्वच घटकांना विषय स्पष्टता लाभली. याच अनुषंगाने कंत्राटी कामगार कायद्याच्या नव्या तरतुदींनुसार ज्या उद्योग-व्यवसायात एखादे काम करण्यासाठी परंपरागत स्वरूपात कंत्राटी कामगारांचा उपयोग मूळ अथवा आनुषंगिक कामांसाठी करण्यात येत असेल, विशिष्ट प्रकारच्या कामांसाठी नियमित वा पूर्णकालीन प्रकारच्या कामगारांची आवश्यकता वा गरज नसेल, मर्यादित तास किंवा कालावधींसाठी अधिक कामगारांची गरज भासत असेल अथवा अचानक कामकाज व व्यावसायिक गरजांपोटी अधिक कामगारांची गरज भासत असेल, तर अशा विशिष्ट स्थिती-परिस्थितीमध्ये कंत्राटी कामगारांची नेमणूक करण्याची मुभा देण्यात आली आहे.

ऐतिहासिक संदर्भात व अभ्यासाच्या पूर्व संदर्भासह सांगायचे म्हणजे, दुसऱ्या राष्ट्रीय श्रमिक आयोगाच्या प्रमुख व अभ्यासपूर्ण शिफारसींनुसार कंत्राटी कामगारांबद्दल प्रामुख्याने दोन मुद्द मांडले होते- उद्योग आस्थापनांच्या मूळ, मुख्य प्रक्रिया वा उत्पादन कामामध्ये कंत्राटी कामगारांचा वापर केला जाऊ नये.

सारख्याच प्रकारचे काम करणाऱ्या नियमित कामगार व कंत्राटांमार्फत वा कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या कामगारांना एकसारखे म्हणजेच समान वेतन देणे आवश्यक करावे. यापैकी पहिल्या शिफारसीचा नव्या कंत्राटी कामगार कायद्यांमध्ये समावेश करण्यात आला असून, नियमित वा मूलभूत कामकाजात कंत्राटी कामगारांच्या नेमणुकीवर नियंत्रणे घालण्यात आली आहेत. हीच बाब किमान वेतन, कामाचे तास, सुरक्षा, आयोग इत्यादीच्या बाबतीत पण दिसून येत असून, नव्या कामगार कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी पूर्वतयारी म्हणून या विषयाकडे विशेषतः व्यवस्थापक व व्यवस्थापनांनी लक्ष देणे आवश्यक ठरते. ▮

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### अंधश्रद्धा संपणार कधी?

महान समाजसुधारक आणि संतांची परंपरा असलेल्या पुरोगामी महाराष्ट्रातील अंधश्रद्धा संपणार कधी असा प्रश्न पडतो. महाराष्ट्र हे देशातील प्रगतिशील राज्य समजले जाते, पण याच राज्यात काही लोक अंधश्रद्धेच्या आहारी गेले आहेत. आजचे युग हे विज्ञानाचे आहे आणि या विज्ञान युगातही काही लोक भूतप्रेत, जादूटोणा, करणी, भानामती, चेटकीण, हडळ, गुप्तधन, पुनर्जन्म, पाप-पुण्य, स्वर्ग-नरक अशा भ्रामक कल्पनांना चिकटून बसलेले दिसतात. भोंदूबाबांनी तर आपल्या राज्यात उच्छाद मांडला आहे. अशिक्षितच नाही तर सुशिक्षित लोकही भोंदूबाबांच्या हातचलाखीला फसतात. भोंदूबाबांकडून फसवणूक झाल्याची एकतरी बातमी वर्तमानपत्रात वाचायला मिळतेच. अंनिससारख्या संघटना आपल्या परीने भोंदूबाबा आणि अंधश्रद्धेविरुद्ध जनजागृती करत असतात तरीही काही लोकांमध्ये अजूनही सुधारणा होताना दिसत नाही. ते अजूनही अंधश्रद्धेला कवटाळून बसले आहेत. २०१३ मध्ये महाराष्ट्रानेच सर्वप्रथम जादूटोणाविरोधी कायदा पारित केला. जादूटोणाविरोधी कायदा पारित करूनही समाजातील अंधश्रद्धा कमी होत नाही. जादूटोणाविरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व्हायला हवी.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

## वाचक पत्रे

### वाहन फिटनेस शुल्कवाढ : मूळ प्रश्नावर वरवरची मलमपट्टी

पंधरा वर्षांऐवजी आता दहा वर्षांनी फिटनेस बंधनकारक करताना फिटनेस फी देखील वाढवण्याचा निर्णय एमओआरटीएचने लागू केला असला, तरी प्रत्यक्षात या धोरणाचे परिणाम पूर्णपणे वेगळेच दिसून येण्याची शक्यता आहे. या नवीन नियमांमुळे वाहन उद्योगाची उलाढाल व कर महसूल दोन्हीची वाढ निश्चित होईल, पण रस्त्यांवरील वाहनसंख्या कमी होण्याची शक्यता कमी आहे.

जुन्या वाहनांच्या भंगार धोरणाला बळकटी देणे आणि जुन्या इंजिनमधून होणारे कार्बन उत्सर्जन रोखणे या उद्दिष्टांसाठी हे नवीन नियम लागू केल्याचे बोलले जाते; पण याच नियमांमुळे नवीन वाहनांच्या आयुर्मानावर परिणाम होऊ शकतो. आजचे नवीन वाहन १५ ते २० वर्षे सहज चालू शकते. पण दहा वर्षांनंतर अनिवार्य फिटनेस चाचणी आणि त्यासाठी वाढलेली फी लक्षात घेतली तर वाहन उत्पादक यापुढे जाणीवपूर्वक वाहनांचे आयुष्य कमी करू शकतील म्हणजेच वाहन दहा वर्षांच्या आसपासच बदलण्याजोगे बनेल आणि नागरिकांना नाईलाजाने नवी गाडी घ्यायची सवय/गरज लागेल. यामुळे वाहन उद्योगाची विक्री वाढेल आणि विविध करांच्या माध्यमातून सरकारचे महसूल उत्पन्न वाढेल, पण पर्यावरण, रहदारी आणि पार्किंग समस्या या मुद्द्यांवर सकारात्मक परिणाम होणार नाही. याशिवाय वाढत्या वाहन निर्मितीसाठी नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर आणि त्यामुळे होणारे कार्बन उत्सर्जन देखील वाढेल. खरे धोरणात्मक उपाय म्हणजे वाहनसंख्या नियंत्रण, प्रत्येक घरी वाहनसंख्येवर मर्यादा, सक्षम व किफायतशीर सार्वजनिक वाहतूक, पर्यावरणीय धोरणाचा कडक अंमल आणि लोकसंख्यावाढीवर नियंत्रण. फक्त फिटनेस फी वाढवून समस्या पूर्णपणे सुटणार नाही; उलट नागरिकांवर आणखी आर्थिक बोजा, वाढती वाहनसंख्या आणि पर्यावरणाचा ऱ्हास असा चक्रव्यूहच निर्माण होईल. ▮

**अनिकेत शेटे**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## आजचे संघगीत-९३

मंगळवार, २५ नोव्हेंबर २०२५

### हा अखंड नंदादीप जळणार सतत जळणार

हा अखंड नंदादीप जळणार सतत जळणार
हा असाच तेवत जगती, निज प्रकाश नित देणार ॥धृ.॥

जळत जळत जरि आत्मनाश हो जीवन सार्थकता
ही घोरनिराशातमविनाश हो ध्येय अंतरी राही
हा प्रदीप्त नंदादीप अवनीस प्रकाशविणार ॥१॥

चिरकाल जळत असणे इतरांसहि चेतविणे
हे कार्य सतत करणे दशदिशा प्रकाशविणे
आकांक्षा धरुनी चित्ती हा जळत जळत जळणार ॥२॥

प्रलय वादळी नंदादीप मुळिं न थरथरे असे ज्वलंत
ज्वालामुखिपरि वरुनि शांत हा दया क्षमा ठेवी थोर!
गंभीर मनी खंबीर प्रज्वलित राष्ट्र करणार ॥३॥

एक दीप दुसऱ्यास चेतवी ऐसे अगणित होती
जागृत हा राष्ट्रास जागवी देउनि जीवनस्फूर्ती
हा एकच नंदादीप पण दीपमाळ करणार ॥४॥

## महत्वाचे...



## सैनिक स्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचे हुतात्म्यांच्या स्मरणार्थ रक्तदान शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

सैनिक स्कूल सातारा शाळेचा माजी विद्यार्थी संघ, सोलापूर शाखेतर्फे आयोजित २६/११ च्या मुंबईवरील अतिरेकी हल्ल्यातील हुतात्म्यांच्या स्मरणार्थ मागील १७ वर्षांपासून सातत्याने आयोजित केले जाणारे १७ वे वार्षिक रक्तदान शिबिर अत्यंत यशस्वीपणे पार पडले. या शिबिरात ४५ हून अधिक जणांनी सहभाग नोंदवून रक्तदान केले आणि समाजाप्रती आपली बांधिलकी जपली. या वर्षी ९ वे व ३८ वे एनसीसी बटालियन तसेच संगमेश्वर कॉलेजच्या एनसीसी कॅडेट्सनी, विशेषतः महिला कॅडेट्सनी, मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून शिबिराला उत्साहाची जोड दिली. कार्यक्रमात ९ व्या बटालियनचे कमांडिंग ऑफिसर ले. कर्नल बाबर यांनी भेट देऊन कॅडेट्सचे कौतुक केले. सैनिक स्कूल सातारा माजी विद्यार्थी संघ सोलापूर शाखेच्या सदस्यांनी आपल्या कुटुंबियांसह उपस्थित राहून या उपक्रमात सक्रिय सहभागी नोंदविला. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी गंगाधर थळंगे, संजय बुरगुटे, नागेंद्र कोंडेकर, कर्नल सुमित मार्तेंडे, डॉ. रवीराज गायकवाड, दिगंबर, पोपट शिंदे, किरण कुलकर्णी, कबाडे, अनिल सगर, राजेंद्र पंडित तसेच सोलापूर शाखेतील सर्व माजी विद्यार्थी संघ सदस्यांनी मोलाचे प्रयत्न केले. तसेच ९ वे व ३८ वे एनसीसी बटालियनच्या अधिकारी व कर्मचारीवर्गाचे सहकार्यही उल्लेखनीय होते. विशेष म्हणजे, रक्तपेढीने शिबिराचे आणि सर्व स्वयंसेवकांच्या प्रयत्नांचे कौतुक करत हा उपक्रम अत्यंत सुव्यवस्थितपणे पार पडल्याचे सांगितले. सोलापूरकरांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हे रक्तदान शिबिर अत्यंत यशस्वी झाले, असे आयोजकांनी यावेळी नमूद केले.

# पाथरूट चौकात महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाची कारवाई

### सार्वजनिक शौचालयाच्या जागेवरील १५ अनधिकृत शेडवर फिरविला जेसीबी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

शहरातील पाथरूट चौक परिसरात महापालिकेच्या २४ आसनी सार्वजनिक शौचालयाचे बेकायदेशीररित्या पाडकाम करून त्या जागेवर उभारलेले १५ अनधिकृत पत्र्याचे शेड आज जेसीबीच्या साहाय्याने जमीनदोस्त करण्यात आले. महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाने आज ही कारवाई केली.

शहरातील पाथरूट चौक परिसरात महापालिकेच्या २४ आसनी सार्वजनिक शौचालयाचे बेकायदेशीररित्या पाडकाम करून त्या जागेवर अनधिकृत २५ पत्र्याचे शेड उभारण्यात आले होते. या अतिक्रमणामुळे येथील जागेचा गैरवापर होत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत होता. येथील नागरिकांकडून तक्रारीही आल्या होत्या.



दरम्यान, नागरिकांच्या तक्रारीची दखल घेऊन महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने या ठिकाणी आज सकाळी मोठी कारवाई केली. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार उपअभियंता तपन डंके यांच्या नियंत्रणाखाली अतिक्रमण प्रतिबंधक विभाग प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाकडून पोलिस बंदोबस्तात धडक कारवाई करण्यात आली. जेसीबीच्या साह्याने येथील अतिक्रमित पत्रा शेड हटविण्यात आले. सार्वजनिक जागा पुन्हा मोकळी करण्यात आली. या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

शहरातील नागरिकांनी, व्यवसायिकांनी कोणत्याही परिस्थितीत रस्त्यावर अडथळा येईल अशा याप्रकारे अतिक्रमण करू नये. सार्वजनिक, महापालिकेच्या जागेवर अतिक्रमण करण्यात आल्याचे आढळून आल्यास तत्काळ कारवाई करण्यात येईल, असे आवाहन महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांनी केले आहे.




**सोलापूर : हुतात्मा स्मृती मंदिरात सांस्कृतिक कार्य विभाग सांस्कृतिक कार्यालय संचनालय महाराष्ट्र राज्य मुंबई आयोजित ६४ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत रविवारी सायंकाळी मानेगांव (ता. माढा) येथील स्वप्नील सपना लोककला विकास मंडळाने दोन अंकी ''घुंगरु'' हे नाटक सादर केले.**


### रजिस्टर कुलमुखत्यारपत्र रद्द केल्याची जाहीर नोटीस

डि व सब डि सोलापूर पैकी शहर सोलापूर जिल्हा सोलापूर येथील तमाम लोकास कळविण्यात येते की,आमचे अशिल सौ. सरोजिनी शहाजी सलगर वय-४० वर्षे, धंदा-व्यापार रा.६७०, दक्षिण कसबा, सोलापूर यांनी दि.११/१०/२०१७ रोजी श्री. शहाजी यशवंत सलगर यांचे नावे रजि. कुलमुखत्यारपत्र नोंदवून दिलेला होता व आहे. सदर रजिस्टर्ड नं.४/३३२१/२०१७ असा असून सदर रजिस्टर्ड दस्ताचा गैरवापर श्री. शहाजी यशवंत सलगर यांनी घेत असल्याचे नुकतेच आमचे अशिलांचे निदर्शनास आले होते व आहे.

सदर कुलमुखत्यारपत्रामध्ये आमचे अशिलाच्या मालकीच्या मिळकतीचा उहापोह केलेला होता व आहे. सदर मिळकतीचे खरेदी-विक्री, हस्तांतर, मिळकतीसंबंधी कोर्टामध्ये दावा, अपील व इतर अनुषंगिक कामे करणेकरीता आमचे अशिलांनी स्वतःकरीता श्री. शहाजी यशवंत सलगर यांना रजिस्टर्ड कुलमुखत्यारपत्राने आमचे अशिल करीत असलेले सर्व कामे करणेसंबंधी दस्त करुन दिलेला होता व आहे. बऱ्याच मिळकती जे कुलमुखत्यारपत्रामध्ये नमूद केलेल्या आहेत त्याची विल्हेवाट श्री. शहाजी यशवंत सलगर आमचे अशिलास विश्वासात घेवून केलेले होते. यानंतर व यापुढील कोणतेही व्यवहार कुलमुखत्यारपत्राचा आधार घेवून श्री. शहाजी यशवंत सलगर यांनी जर केल्यास तो व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच कोणाचीही फसवणूक होवू नये म्हणून आजरोजी सदरची जाहीर नोटीसीव्दारे आमचे अशिल दि.११/०७/२०१७ रोजी केलेले कुलमुखत्यारपत्र रद्द करीत आहेत. यदाकदाचित श्री. शहाजी यशवंत सलगर सदर कुलमुखत्यारपत्राचा आधार घेवून खरेदी-विक्री, अथवा तत्सम व्यवहार केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी,

सही/-
श्री.पी.एस.रेशीमकर
बी. कॉम. एल.एल.बी. (स्पे.)
पत्ता-१०२-सी. ९२, भवानी पेठ, सोलापूर
मो.नं.८८८८२२१८३६
अशिलातर्फे ॲडव्होकेट

### जाहिर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज नं.११२/२०२५
नि. नं. ५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनियर डिव्हीजन साहेब यांचे कोर्टात**

१) श्रीमती मेघा मनोज साखरे,
वय ३३ वर्षे, धंदा- घरकाम, रा. मु.पो. दहिटणे,
ता. बार्शी, जि. सोलापूर
२) कु. मधूर मनोज साखरे,
वय-८ वर्षे, धंदा- शिक्षण, रा. सदर,
अज्ञान अपाक जन्म दाती आई अर्जदार नं. १ मेघा --अर्जदार
३) कु. श्रीशा मनोज साखरे, वय-५ वर्षे,
धंदा- शिक्षण, रा. सदर, अज्ञान अपाक जन्म दाती आई अर्जदार नं. १ मेघा
४) सौ. नंदा मुकूंद साखरे,
वय-६० वर्षे, धंदा- घरकाम, रा. सदर
विरुध्द
कोणी नाही --सामनेवाला

ज्या आर्थी मनोज मुकुंद साखरे हे दि. ०९/०७/२०२५ रोजी सोलापूर येथे मयत झालेले आहेत, त्यांचे कायदेशीर वारस म्हणून अर्जदार यांनी या मे. कोर्टात सदरहु मयत मनोज मुकुंद साखरे यांचे पश्चात देय कौटूंबिक निवृत्ती वेतन अनुकंपा तत्वाने नोकरी वर वारसा हक्क सांगण्यासाठी सक्सेशन सर्टफिकेट मिळावे यासाठी अर्ज केला आहे. त्याआर्थी सदरहु मयताचे अर्जदार वारस नाहीत अथवा अन्य कोणी वारस आहेत, असे कोणास सांगावयाचे असेल तर संबंधीतांनी या जाहिरप्रसिध्दीकरणाच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत अथवा नेमली ता. २१/०१/२०२६ रोजी या मे. कोर्टात हजर होऊन आपल्या लेखी हरकती दाखल कराव्यात. सदरहु मदतीत कोणाचे हरकती न आल्यास सदरहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेऊन त्यांना मयत मनोज मुकुंद साखरे यांचे पश्चात कायदेशीर वारस म्हणून सक्सेशन सर्टफिकेट देइल. हे जाहिरप्रसिध्दीकरण दिले. ता१०/११/ २०२५

कनिष्ट लिपीक | कोर्टाचा शिक्का | सही/- सहाय्यक अधीक्षक, दिवाणी न्यायालय क. स्तर. बार्शी


# नर्तिका पूजा गायकवाड हिला बार्शी सत्र न्यायालयाने जामीनवर केली मुक्तता

**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

राज्यभर गाजलेल्या गोविंद बर्गे आत्महत्या प्रकरणी नर्तिका पूजा गायकवाड (रा. सासुरे, ता. बार्शी) हिला बार्शी सत्र न्यायालयाने जामीनवर मुक्तता केली. ९ सप्टेंबर रोजी लुखा मसला, ता. गेवराई, बीडचे माजी उपसरपंच गोविंद जगन्नाथ बर्गे यांनी नर्तिका पूजा गायकवाड हिच्या सासुरे येथील घरासमोर स्वतःच्या गाडीत रिव्हॉलवारने स्वतःच्या डोक्यात गोळी झाडून घेऊन आत्महत्या केली.

याप्रकरणी अटकेनंतर नर्तिका पूजा गायकवाड हिने बार्शी सत्र न्यायालयात ड.धनंजय माने यांच्या मार्फत जामीन अर्ज दाखल केला होता.जामीन अर्जाची सुनावणी वेळी आरोपीचे वकील ड. धनंजय माने यांनी आपल्या युक्तिवादात पूजा गायकवाड हिला या प्रकरणात केवळ संशयावरून गुंतवलेले आहे, मयताने आत्महत्येपूर्वी कोणतीही सुसाईड नोट लिहिलेली नाही. केसचा तपास पूर्ण झालेला आहे, अशा परिस्थितीत महिला आरोपीला कारागृहात डांबून ठेवून काहीही साध्य होणार नाही याकडे न्यायालयाचे लक्ष वेधले.

न्यायालयाने आरोपी पूजा गायकवाड हिची जामिनावर मुक्तता करण्याचे आदेश दिले. याप्रकरणी आरोपी पूजा गायकवाड हिच्यातर्फे ॲड. धनंजय माने, ॲड. जयदीप माने, ॲड. शरद झालटे, ॲड. किरण गवळी यांनी काम पाहिले.


### SJSB सोलापूर जनता सहकारी बँक लि.

Multi-State Scheduled Coop.Bank
मल्टी-स्टेट शेड्युल्ड कोऑप.बँक

गगनभरारी, शिवस्मारक संकुल, गोल्डफिंच पेठ, सोलापूर ४१३००७
फोन क्र.: ०२१७-२७४ ११०१ ते ०५
ई-मेल: info@sjsbbank.com. वेबसाईट: www.sjsbbank.com

**जाहीर ताबा नोटीस**
**नियम ८(१)**
(दि सेक्युरिटायझेशन & रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस & इन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अन्वये)

तमाम लोकांस, कर्जदार, गहाणकार व जामीनदार यांना सदर जाहीर ताबा नोटीसीने कळविण्यात येते की, ज्या अर्थी सोलापूर जनता सहकारी बँक लि. मुख्य कार्यालय, सोलापूर या संस्थेचे अधिकारी यांना उक्त अध्यादेशाच्या कलम १३(१२) अन्वये प्राप्त झालेल्या प्राधिकृत अधिकारी या अधिकारानुसार मी उपरोक्त कायद्याचे कलम १३(२) अन्वये दि.१८/०९/२०२५ रोजी **कर्जदार- प्रमुखराज ट्रेडिंग कंपनी प्रोप्रा.सौ. विशाखादेवी राजेश माळी (कोल्हे), पत्ता- गाळा नं.२३१, फ्लटफॉर्म क्र.५ मार्केट यार्ड रोड, तुळजापूर रोड, बार्शी, जिल्हा सोलापूर.**

**जामीनदार १) श्री.रत्नाकर रघुनाथ कोल्हे २) श्री.आश्विन विनायक गाढवे ३) श्री.राजेश उत्तमराव माळी (कोल्हे) ४) श्रीमती. द्रौपदी उत्तमराव माळी ५) किरण उत्तमराव माळी ६) सौ. अंजना शंतनू यादव, यांना मागणी नोटीस पाठवून रक्कम रु.२०,५७,८५८=३८ (अक्षरी रुपये वीस लाख सत्तावन्न हजार आठशे अठ्ठावन्न रुपये, अडोतीस पैसे मात्र)** येणेबाकी दि.३१/०८/२०२५ अखेर, आणि दि.०१/०९/२०२५ पासूनचे देय असलेले पुढील व्याज व इतर खर्च अशी संपूर्ण रक्कम नोटीस मिळाल्या पासून ६० (साठ) दिवसाच्या आत भरणा करण्याचे कळविले होते. परंतु नोटीस मिळूनही सदर उपरोक्त कर्जदार / गहाणकार व जामीनदार यांनी उपरोक्त रक्कम आमच्याकडे भरण्यास कसूर केलेली आहे. त्या अर्थी सदर कर्जदार, गहाणकार व जामीनदार यांना कळविण्यात येते की, खालील सही करणार यांनी खालील परिशिष्ठात नमूद केलेल्या तारण स्थावर मिळकतीचा दिनांक-२०/११/२०२५ रोजी दि सेक्युरिटायझेशन & रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस & इन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ चे कलम १३(४) नियम ९ अन्वये **प्रतिकात्मक ताबा घेतलेला आहे.**

सबब उपरोक्त कर्जदार / गहाणकार / जामीनदार आणि तमाम लोकांना कळविण्यात येते की, खालील परिशिष्ठात नमूद केलेल्या मिळकती बाबत कोणीही कोणाशीही कोणत्याही प्रकारे हस्तांतर, विल्हेवाट, गहाण, विक्री, बोजा, तारण वाटणी, वहिवाट, बक्षिस अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतर करार करू नये. या उपरही तसा व्यवहार अथवा करार केल्यास तो बेकायदेशीर आहे, असे ठरवून आमच्या बँकेवर अथवा सदर मिळकतीवर सदर व्यवहार अथवा करार कायद्याने बंधनकारक राहणार नाही. याची नोंद उपरोक्त कर्जदार / गहाणकार / जामीनदार व तमाम लोकांनी घ्यावी.

**परिशिष्ट**

**तारण स्थावर मालमत्ता वर्णन**

जिल्हा सोलापूर ता. बार्शी पैकी मौजे काटेगांव येथील ग्रा.प.हद्दीतील गट नं.२९९/२ याचे एकूण क्षेत्र ० हे. २१ आर आहे यापैकी गहाणकार यांचे वडीलोपार्जित मालकीची मिळकत याचे एकूण क्षेत्र ० हे. १६ आर आहे. सदर मिळकती पैकी कर्जदार यांचे हिस्सेची खालील नमूद मिळकती तारण आहेत-

अ) श्री.राजेश उत्तमराव माळी (कोल्हे) व सौ. विशाखादेवी राजेश माळी (कोल्हे) यांचे नावावरील ग्राम पंचायत मिळकत नं.५१६/१ असून याची पूर्व-पश्चिम बाजू ६४ फु. तर उत्तर-दक्षिण बाजू ४४ फु. आहे यांचे ग्राम पंचायत उताऱ्याप्रमाणे क्षेत्रफळ २८१६ चौ. फुट आहे याची चतुःसीमा - पूर्वेस - खुली जागा, दक्षिणेस - ग्रा.प.रस्ता, पश्चिमेस - राज्य रस्ता, उत्तरेस - सटवाई मंदिराची मिळकत.

ब) श्री.राजेश उत्तमराव माळी (कोल्हे) यांचे नावावरील ग्राम पंचायत मिळकत नं.५१६/२ असून याची पूर्व-पश्चिम बाजू ७० फु. तर उत्तर-दक्षिण बाजू ४० फु. आहे यांचे ग्राम पंचायत उताऱ्याप्रमाणे क्षेत्रफळ २८०० चौ. फुट आहे याची चतुःसीमा - पूर्वेस - स्वतःची जागा, दक्षिणेस -रस्ता व स्वतःची जागा, पश्चिमेस - स्वतःची जागा, उत्तरेस - प्रभू माळी यांची जागा

क) श्री.राजेश उत्तमराव माळी (कोल्हे) यांचे नावावरील ग्राम पंचायत मिळकत नं.५१६/३ असून याची पूर्व-पश्चिम बाजू ३५ फु. तर उत्तर-दक्षिण बाजू ९६ फु. आहे यांचे ग्राम पंचायत उताऱ्याप्रमाणे क्षेत्रफळ ३३६० चौ. फुट आहे याची चतुःसीमा - पूर्वेस - सुरेखा कोल्हे यांची जागा, दक्षिणेस -तुषार माळी यांची जागा, पश्चिमेस - ढगे व स्वतःची जागा, उत्तरेस - स्वतःची जागा.

दिनांक : २५/११/२०२५
ठिकाण : बार्शी.

शिक्का

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**सोलापूर जनता सहकारी बँक लि.**
**(मल्टी स्टेट शेड्युल्ड को.ऑप. बँक)**

### IDFC FIRST Bank Limited

IDFC FIRST Bank
**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज कायद्याची अंमलबजावणी, २००% कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फिराट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि ते नंतर अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या नियमांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फिन्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित डेक्समधून लागू होणाऱ्या कराराच्या दराने आकारले जाईल.

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 147601339 | मालमत्तेवर कर्ज | १. नवनाथ उध्दव दुपडे<br>२. संगीता उध्दव दुपडे | 30/09/2025 | रुपये 9,26,514.10/- |

**मालमत्तेचा पत्ता:** ग्रामपंचायतीचा संपूर्ण तुकडा आणि पार्सल मिळकत क्रमांक १००७/१, एकूण ४०७९ चौ. फीत, स्थित गावः कोळेगाव, ग्रामपंचायतीच्या हद्दीत कोळेगाव, उपविभाग माळशिरस. विभाग सोलापूर, महारशिरा-४१३३०८, आणि पूर्वेकडील सीमा: महादेव नारायण दुपडे पश्चिमेकडील प्रताप बाबेन दुपॅकल उत्तर: खुले क्षेत्र दक्षिणेकडील रस्ता

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 150404538 | मालमत्तेवर कर्ज | १. परमेश्वर उत्तम शेळके<br>२. उत्तम बसप्पा शेळके | 11/10/2025 | रुपये 8,58,502.15/- |

**मालमत्तेचा पत्ता:** ग्रामपंचायत मिळकत क्र. ३२९ चा सर्व भाग आणि पार्सल. एकूण मोजमाप क्षेत्र ३३७८ चौ. फूट., ग्रामपंचायत उदानवाडी (करंडेवाड), उप-विभागाच्या हद्दीत वसलेले आहे. सांगोला, दि. सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०७, आणि सीमा: पूर्व: दगडू आप्पासा चौघुले पश्चिम: रस्ता उत्तर: सिद्धेश्वर बिराजदार दक्षिण प्रभुलिंग मंदिर

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 3 | 132523804 | मालमत्तेवर कर्ज | १. प्रशांत अभिनव रोंगे<br>२. साक्षी प्रशांत रोंगे | 31/07/2025 | रुपये 21,02,862.25/- |

**मालमत्तेचा पत्ता:** ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ९९८/१ येथे स्थित मालमत्तेचे सर्व भाग आणि पार्सल, एकूण जाहिरात-मापन क्षेत्र ३०८० चौरस फूट, विभाग सोलापूर, उपविभाग पंढरपूर, ग्रामपंचायत खांडी सोलापूर, महाराष्ट्र ४१३३१७ च्या हद्दीत, आणि अशी सीमा: उत्तर: राहुल साळुंखे क्षेत्र दक्षिण: उघडा मार्ग पूर्व: रस्ता पश्चिम: हक्कांसह रस्ता. स्वातंत्र्य आणि मान्यता संलग्न थेरालो. वर्तमान आणि भविष्य, इमारती संरचना, उभारणी आणि त्यावरील बांधकामांसाठी आणि त्यानंतरच्या विकासासाठी आणि पृथ्वीशी जोडलेले किंवा कायमचे कोणत्याही गोष्टीशी जोडलेले सर्व वनस्पती आणि यंत्रसामग्री. पृथ्वीशी जोडलेले, वर्तमान आणि भविष्य दोन्ही

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 153425297 | मालमत्तेवर कर्ज | १. पृथ्वीराज यशवंत बंडगर<br>२. यशवंत निवृत्ती बंडगर | 23/08/2025 | रुपये 9,80,376.45/- |

**मालमत्तेचा पत्ता:** सोलापूर येथील मालमत्तेचा सर्व भाग आणि पार्सल, उपविभाग : सांगोला, ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ३७२/१ च्या अंकाधळ बेअरिंगच्या हद्दीत, एकूण क्षेत्रफळ १०२३ इतके फूट आणि पूर्वेला लागून: शिवाजी सोपान बंडगरची मालमत्ता पश्चिम: किसन निवृत्ती बंडगरची मालमत्ता उत्तर: रस्ता दक्षिण: हरी बंडगरची मालमत्ता

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 5 | 150686323 | मालमत्तेवर कर्ज | १. शाहरुख शहाजान काझी<br>२. शहाजान अब्दुल काझी | 30/09/2025 | रुपये 8,62,792.72/- |

**मालमत्तेचा पत्ता :** योग्यरित्या बेअरिंग असलेल्या ग्रामपंचायत मिकळत क्रमांक ११२९ चा सर्व तुकडा आणि पार्सल, एकूण मालमत्ता पत्ता क्षेत्रफळ २६२० चौ. फूट. सोलापूर विभागात, उपविभाग सांगोला, ग्रामपंचायत नाझरे, सोलापूर, महाराष्ट्राच्या हद्दीत, आणि सदर मालमत्तेची सीमा अशी आहे. उत्तर: अन्सार तांबोळी दक्षिण: सुधाकर कुंभार पूर्व: नंदकुमार रायसुरे पश्चिम: रस्ता

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 6 | 160296754 | मालमत्तेवर कर्ज | १. सुधीर अंबादास रणदिवे<br>२. अंबादास रामा रणदिवे | 30/09/2025 | रुपये 7,78,433.55/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायती मिळकत क्रमांक १५०२, एकूण मोजमाप असलेले सर्व तुकडा आणि पार्सल क्षेत्रफळ ३०७८ सु फूट, विभाग सोलापूर, उपविभाग सांगोला, ग्रामपंचायत शिरठाण, महाराष्ट्राच्या हद्दीत. आणि सदर मालमत्तेची सीमा अशी आहे. उत्तर: रस्ता दक्षिण: दत्ता माने पूर्व: रस्ता पश्चिम:

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 7 | 155152999 | मालमत्तेवर कर्ज | १. तानाजी मुरलीधर हावळ<br>२. रतन तानाजी हावळ | 11/10/2025 | रुपये 8,64,662.39/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायतीचा संपूर्ण तुकडा आणि पारूल, मिकत क्रमांक १२३५, एकूण वस्ती १९००.५ सोळा मीटर, सिलुएटेड अल गाव. शिरभावी, शिभावीच्या हद्दीत. उप-डीआय, सांगोला, विभाग: सोलापूर, महाराष्ट्र-४१३३१७, आणि उडी मारणारा असा: पूर्व सोल्फ पश्चिम: रस्ता उत्तर बळीराम होवळ दक्षिण जिलेंद्र होवळ

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 151222742 | मालमत्तेवर कर्ज | १. विनायक तुकाराम सरगर<br>२. कमल तुकाराम सरगर | 30/09/2025 | रुपये 10,14,031.93/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिळकत क्रमांक १४३ चा सर्व तुकडा आणि पार्सल, एकूण मोजमाप क्षेत्र ४५६० चौ. फूट., वसलेले अर गाव: नाझरे, ग्रामपंचायतीच्या हद्दीत: नाझरे, उप-विभाग: सांगोला, दि: सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०८, आणि सीमावर्ती श:-पूर्व नाझरा ते उदमवाडी रोड पश्चिम: स्वत: उत्तर: सेफ मिलकट दक्षिण: श्रीपती सर्गर यांचा मिल्कट

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत, वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून करारबद्ध व्याजदरासह आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींसह भरण्याचे आवाहन तुम्हाला करण्यात येत आहे. असे झाल्यास, खाली स्वाक्षरी करणाऱ्यांना वर उल्लेख केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध SRFESI कायद्याच्या कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत कार्यवाही सुरू करण्यास भाग पाडले जाईल जेणेकरून आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसीसह आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) ची देय रक्कम वसूल करता येईल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री भाडेपट्ट्याने किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**दिनांक : २५/११/२०२५**
**ठिकाण : सोलापूर, महाराष्ट्र**

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड**
**(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)**

## अुत्तम सेवा — मंगळवार दि. २५ नोव्हेंबर २०२५ — नोकरीच्या शोधात

**उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| १) | **इंटेलिजन्स ब्युरो, IB** | | | |
| | बहुउद्देशीय कर्मचारी (३६२ पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | २५ पर्यंत | १४/१२/२५ |
| २) | **महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, MJP** | | | |
| | १) लिपीक (४६ पदे) | पदवी व इंग्रजी/मराठी टायपिंग उत्तीर्ण | ३८ पर्यंत | १९/१२/२५ |
| | २) क. अभियंता (१६० पदे) | डिप्लोमा (सिव्हिल/मेकॅ/ऑटो) | ३८ पर्यंत | |
| | ३) सहा. भांडारपाल (१३ पदे) | दहावी व इंग्रजी/मराठी टायपिंग उत्तीर्ण | ३८ पर्यंत | |
| ३) | **केंद्रीय विद्यालय व नवोदय विद्यालय समिती, KVS & NVS** | | | |
| | १) शिक्षक (९२११ पदे) | पदवी/पदव्युत्तर पदवी (५०%) गुणांसह व बी.एड् उत्तीर्ण असावे | ३५/४० पर्यंत | ०४/१२/२५ |
| | २) प्राथमिक शिक्षक (३३६५ पदे) | बारावी (५०%) व डी.एड् तसेच CTET पेपर-१ उत्तीर्ण असावे | ३० पर्यंत | |
| | ३) ग्रंथपाल (१४७ पदे) | पदवी (ग्रंथपाल) ५०% गुणांसह उत्तीर्ण | ३५ पर्यंत | |
| | ४) क. सचिवालय सहा. (८७८) | बारावी व इंग्रजी टायपिंग उत्तीर्ण | २७ पर्यंत | |
| | ५) स्टेनोग्राफर (५७ पदे) | पदवी व इंग्रजी टायपिंग-स्टेनो उत्तीर्ण | २७ पर्यंत | |
| | ६) लॅब अटेंडंट (१६५ पदे) | दहावी व DMLT कोर्स उत्तीर्ण असावे | ३० पर्यंत | |
| | ७) बहुउद्देशीय कर्मचारी (२४ पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरूष उमेदवार | ३० पर्यंत | |

**✻ मोफत सरकारी अपडेट ✻**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्ॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला ''जॉईन'' असा मेसेज व्हॉटस्ॲप करावा.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| ४) | **नाशिक महानगरपालिका, नाशिक** | | | |
| | फायरमन (१५० पदे) | दहावी उत्तीर्ण व अग्निशामक कोर्स | २८ पर्यंत | ०१/१२/२५ |
| ५) | **शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर (मुदत वाढ)** | | | |
| | शिपाई/माळी/अंधारखोली परिचर (२० पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरूष उमेदवार | ३८ पर्यंत | ०५/१२/२५ |
| ६) | **महाराष्ट्र राज्य पोलीस भरती,** | **२०२५** | | |
| | १) कॉन्स्टेबल (१२६२४ पदे) | बारावी उत्तीर्ण स्त्री/पुरूष उमेदवार | २८ पर्यंत | ३०/११/२५ |
| | २) वाहनचालक (५१५ पदे) | बारावी उत्तीर्ण स्त्री/पुरूष उमेदवार | २८ पर्यंत | |
| | ३) कॉन्स्टेबल SRPF(१५६६ पदे) | बारावी उत्तीर्ण स्त्री/पुरूष उमेदवार | २५ पर्यंत | |
| | ४) कॉन्स्टेबल कारागृह (५५४ पदे) | बारावी उत्तीर्ण स्त्री/पुरूष उमेदवार | २८ पर्यंत | |
| | ५) बॅन्डस्मन (११३ पदे) | दहावी उत्तीर्ण असावे | २८ पर्यंत | |
| ७) | **रेल्वे रिक्रुटमेंट बोर्ड, RRB** | **(पदवीपूर्व)** | | |
| | १) तिकीट क्लर्क (२४२४ पदे) | ५०% गुणांसह बारावी उत्तीर्ण असावे | ३० पर्यंत | २७/११/२५ |
| | २) टायपिस्ट (५५७ पदे) | ५०% गुणांसह बारावी व टायपिंग इंग्रजी उत्तीर्ण स्त्री/पुरूष उमेदवार | ३० पर्यंत | |
| | ३) ट्रेन क्लर्क (७७ पदे) | ५०% गुणांसह बारावी उत्तीर्ण असावे | ३० पर्यंत | |
| ८) | **रेल्वे रिक्रुटमेंट बोर्ड, RRB** | **(पदवीधर) (मुदत वाढ)** | | |
| | १) ट्रेन मॅनेजर (३४१६ पदे) | पदवीधर स्त्री/पुरूष उमेदवार असावे | ३३ पर्यंत | २७/११/२५ |
| | २) स्टेशन मास्तर (६१५ पदे) | पदवीधर स्त्री/पुरूष उमेदवार असावे | ३३ पर्यंत | |
| | ३) तिकीट सुपरवायजर (१६१ पदे) | पदवीधर स्त्री/पुरूष उमेदवार असावे | ३३ पर्यंत | |
| | ४) टायपिस्ट (१५५९ पदे) | पदवी व इंग्रजी टायपिंग उत्तीर्ण असणारे स्त्री/पुरूष उमेदवार | ३३ पर्यंत | |

**सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.**
**२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)**
**३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.**

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

**अुत्तम सेवा** १) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर. वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१. www.uttamseva.org

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### भारतीय महिला कबड्डी संघाला सलग दुसऱ्यांदा विश्वचषक



**ढाका :** भारतीय महिला कबड्डी संघाने ढाका येथे झालेल्या महिला कबड्डी विश्वचषक स्पर्धेत दमदार कामगिरी करत अंतिम फेरीत चीन तैपेईचा ३५-२८ असा पराभव केला. हे भारताचे सलग दुसरे विश्वचषक विजेतेपद आहे आणि या खेळातील त्यांची ताकद आणखी सिद्ध करते. संपूर्ण स्पर्धेत भारत उत्तम फॉर्ममध्ये होता. त्यांनी त्यांचे सर्व गट सामने जिंकून उपांत्य फेरी गाठली, जिथे त्यांनी इराणला ३३-२१ ने हरवून अंतिम फेरीत प्रवेश केला. चीन तैपेईनेही त्यांच्या गटात अपराजित कामगिरी केली आणि उपांत्य फेरीत यजमान बांगलादेशला २५-१८ ने हरवले. महिला संघाच्या कामगिरीमुळे संपूर्ण देशाला अभिमान वाटेल. त्यांचा विश्वास आणि टीमवर्क उत्कृष्ट होते, असे हरयाणा स्टीलर्सचे मुख्य प्रशिक्षक मनप्रीत सिंग म्हणाले. भारतासाठी खूप अभिमानाचा क्षण आहे, असे पुणेरी पलटनचे मुख्य प्रशिक्षक अजय ठाकूर म्हणाले. या स्पर्धेत एकूण ११ देशांनी भाग घेतला, ज्यामुळे जगभरात महिला कबड्डी किती वेगाने वाढत आहे हे दिसून आले.

### धर्मेंद्रच्या निधनाने क्रिकेट जगतात शोक

**नवी दिल्ली :** सोमवारी प्रसिद्ध अभिनेते धर्मेंद्र यांच्या निधनाबद्दल . माजी भारतीय क्रिकेट दिग्गज सचिन तेंडुलकर, विराट कोहली, गौतम गंभीर यांच्यासह क्रिकेट जगतातील अनेक मान्यवरांनी शोक व्यक्त केला आणि भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. इतर अनेकांप्रमाणे, मलाही धर्मेंद्रजी हे अभिनेते लगेच आवडले, त्यांनी आपल्या बहुमुखी प्रतिभेने आमचे मनोरंजन केले, असे सचिन तेंडुलकरने आपल्या संदेशात म्हटले आहे. आज, आपण भारतीय चित्रपटसृष्टीतील एक दिग्गज गमावला आहे, असे कोहलीने एक्सवर शोक संदेशात म्हटले आहे. ते माझ्या कुटुंबाचे आवडते होते, असे गौतम गंभीर यांनी लिहिले. भारतीय चित्रपटसृष्टीतील धर्मेंद्र यांचे योगदान कायमचे लक्षात राहील असे एक खरे दिग्गज, असे उमेश यादव म्हणाले. धर्मेंद्र यांचा वारसा, उबदारपणा आणि कालातीत कामगिरी कायम आपल्या हृदयात राहील. कुटुंबासाठी माझ्या प्रार्थना आणि संवेदना. ओम शांती, असे ईशांत शर्मा यांनी लिहिले. मोहम्मद कैफ, व्ही. व्ही. एस. लक्ष्मण व नवजोत सिंग सिद्धू यांनीही शोक व्यक्त केला.

### उमा महाविद्यालयाच्या दुपडे व बाळकृष्णला मैदानी स्पर्धेत सुवर्ण

**पंढरपूर, दि.२४ नोव्हेंबर-**
पु. अ. होळकर सोलापूर विद्यापीठाच्या महाविद्यालयीन मैदानी स्पर्धेत येथील उमा महाविद्यालयाच्या किरण दुपडे याने १५०० मीटर धावणे व बाळकृष्ण याने ११० मीटर अडथळा शर्यतीत सुवर्ण पटकाविले. त्यांना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद ढवण यांच्यासह एस. एस. लोंढे, जी. के. खताळ व पी. एस. शेख यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्था अध्यक्ष प्रशांत परिचारक, उपाध्यक्ष मुकुंद परिचारक, खजिनदार रमेश लाड, सचिव राजगोपाल भट्टड, माजी प्राचार्य डॉ. मिलिंद परिचारक, प्रणव परिचारक प्राचार्य डॉ. धिरजकुमार बाड यांनी अभिनंदन केले.

### 'आयएमएस'च्या उन्नती इंगोलेची राज्य लॉन टेनिस स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**



इंडियन मॉडेल स्कूल सीबीएसईच्या उन्नती इंगोले हिची लातूर येथे होणाऱ्या राज्य लॉन टेनिस स्पर्धेसाठी निवड झाली. बारामती येथे झालेल्या विभागीय स्पर्धेतून तिची निवड झाली. तिला क्रीडा शिक्षक राजकुमार माने, वैष्णवी गडदे यांचे मार्गदर्शन मिळाले. त्यांचे संस्थापक अध्यक्ष ए. डी.जोशी, सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका अपर्णा कुलकर्णी, ममता बसवंती, अचला राचर्ला यांनी अभिनंदन केले.

### पुरुष व महिला जिल्हा शुटिंग बॉल अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धा आज

**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**
शहर व जिल्हा शुटिंग बॉल असोसिएशनच्या वतीने मंगळवार २५ नोव्हेंबर रोजी दुपारी २ वाजता वरिष्ठ गटातील पुरुष व महिला अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धा इकबाल मैदानाच्या शेजारी सुभाष उद्यान येथे आयोजित केली आहे. यातून जिल्हा संघाची परभणी येथे होणाऱ्या ३९व्या राज्यस्तरीय शूटिंग बॉल स्पर्धेसाठी निवड करण्यात येणार आहे. इच्छुक संघ अथवा खेळाडूंनी असोसिएशनचे सचिव फैज अहमद बेगमपुरे किंवा फरहान लालकोट (मो.९२८४१२१५४१) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन असोसिएशनचे अध्यक्ष संजय सावंत यांनी केले आहे.

# दक्षिण आफ्रिकेची मजबूत पकड

## मार्को जॅन्सन ६ बळी, हार्मर ३ बळी ● यशस्वी जयस्वालचे अर्धशतक

**◆ गुवाहाटी, २४ नोव्हेंबर**
येथे सुरु असलेल्या दुसऱ्या व अंतिम कसोटी क्रिकेट सामन्यात तिसऱ्या दिवशी मार्को जॅन्सनचा वेगवान मारा व सायमन हार्मरच्या प्रभावी फिरकीच्या बळावर दक्षिण आफ्रिकेने यजमान भारतीय संघाला ८३.५ षटकांत २०१ धावांत गुंडाळले आणि पहिल्या डावात २८८ धावांची आघाडी घेतली. दिवस अखेर दक्षिण आफ्रिकेने दुसऱ्या डावांत ८ षटकांत बिनबाद २६ धावा केल्या. दक्षिण आफ्रिका सध्या ३१४ धावांनी आघाडीवर असून त्यांनी सामन्यावर आपली पकड मजबूत केली आहे.







भारताने बिनबाद ९ धावांवरून पुढे तिसऱ्या दिवसाच्या खेळाला सुरुवात केली आणि त्यांचा पहिला डाव २०१ धावांतच आटोपला. सलामीवीर यशस्वी जयस्वाल (५८) व वॉशिंग्टन सुंदरने (४८) तेवढी चमकदार खेळी केली, परंतु उर्वरित फलंदाज जॅन्सनच्या आखुड टप्प्याची गोलंदाजी रणनीती व हार्मरच्या फिरकीला बळी पडलेत. भारत १ बाद ९५ धावांवरून ७ बाद १२२ धावांवर कोसळला.

केएल राहुल (२२), साई सुदर्शन (१५), ध्रुव जुरेल (०), कर्णधार ऋषभ पंत (७), रवींद्र जडेजा (६) व नितीश कुमार रेड्डी (१०) हे भरवशाचे फलंदाज दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांसमोर खेळपट्टीवर फार वेळ टिकाव धरू शकले नाही. जॅन्सेनने ४८ धावांत ६ बळी, तर सायमन हार्मरने ६४ धावांत ३ बळी टिपलेत. केशव महाराजने एक बळी मिळविला. दोन दिवसांपेक्षा थोडा जास्त वेळ शिल्लक असताना दक्षिण आफ्रिकेने पहिल्या डावात २८८ धावांची आघाडी मिळवली. दिवस अखेर रियान रिकेल्टन व एडन मार्करामने अनुक्रमे नाबद १३ व नाबाद १२ धावांची खेळी करत दक्षिण आफ्रिकेला ८ षटकांत २६ धावा काढून दिल्या.

भारताने दक्षिण आफ्रिकेला ४८९ धावा देऊन मालिका बरोबरीत आणण्याच्या सर्व आशा गमावल्या. दक्षिण आफ्रिका दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत आधीच १-० ने आघाडीवर आहे. जागतिक कसोटी विजेता दक्षिण आफ्रिका सध्या भारतात दुर्मिळ मालिका विजय मिळविण्याचे स्वप्न बघत आहे. ◂(वृत्तसंस्था)

# पंतप्रधानांकडून टी-२० विश्वचषक विजेत्या भारतीय दिव्यांग महिला संघाचे कौतुक

**◆ नवी दिल्ली, २४ नोव्हेंबर**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी भारतीय दिव्यांग महिला क्रिकेट संघाचे पहिले टी-२० विश्वचषक जिंकल्याबद्दल अभिनंदन केले आणि म्हटले की, हा विजय सांघिक काम आणि दृढनिश्चयाचे एक तेजस्वी उदाहरण आहे.

रविवारी कोलंबो येथे खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात नेपाळला सात गड्यांनी हरवून भारताने पहिल्या आवृत्तीची विश्वचषक टी-२० क्रिकेट स्पर्धा जिंकली. गोलंदाजीचा निर्णय घेतल्यानंतर भारताने नेपाळला ५ बाद ११४ धावांवर रोखले आणि नंतर केवळ १२ षटकांत ३ बाद ११७ धावा करून विजेतेपद पटकावले.

पहिले दिव्यांग महिला टी-२० विश्वचषक जिंकून इतिहास रचल्याबद्दल भारतीय दिव्यांग महिला क्रिकेट संघाचे अभिनंदन! त्याहूनही कौतुकास्पद म्हणजे ते मालिकेत अपराजित राहिले, असे मोदींन आपल्या एक्स पेजवर पोस्ट केले.

ही खरोखरच एक ऐतिहासिक क्रीडा कामगिरी आहे, कठोर परिश्रम, सांघिक काम आणि दृढनिश्चयाचे एक ज्वलंत उदाहरण आहे. प्रत्येक खेळाडू एक विजेता आहे! संघाला त्यांच्या भविष्यातील प्रयत्नांसाठी माझ्या शुभेच्छा. ही कामगिरी येणाऱ्या पिढ्यांना प्रेरणा देईल, असे ते म्हणाले. भारताने साखळी फेरीत श्रीलंका, ऑस्ट्रेलिया, नेपाळ, अमेरिका आणि पाकिस्तानवर मात केली आणि नंतर उपांत्य फेरीत पुन्हा ऑस्ट्रेलियन संघाला हरवले. या स्पर्धेचे आयोजन भारत आणि श्रीलंकेने संयुक्तपणे केले होते आणि त्याचे सामने दिल्ली आणि बंगळुरू येथेही झाले होते.

अकरा खेळाडूंचा एक अंध क्रिकेट संघ असतो आणि तो एका पांढऱ्या प्लास्टिकच्या चेंडूने खेळला जातो , यात चेंडूमध्ये घुंगरु असतात, जे फिरताना आवाज करतात, त्यामुळे खेळाडूंना ते ऐकू येते.

**पदक विजेत्या मुष्टियोद्धयांचे कौतुक**

ग्रेटर नोएडा येथे अलीकडेच झालेल्या जागतिक मुष्टियुद्ध चषक स्पर्धेत चमकदार कामगिरी करणाऱ्या भारतीय मुष्टियोद्धयांचेही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौतुक केले. आमच्या उत्कृष्ट खेळाडूंनी २०२५ च्या जागतिक मुष्टियुद्ध चषक फायनलमध्ये असाधारण, विक्रमी कामगिरी केली! त्यांनी ९ सुवर्णांसह अभूतपूर्व २० पदके घरी आणली, असे मोदींनी लिहिले. हे आमच्या खेळाडूंच्या दृढनिश्चयामुळे शक्य झाले आहे. त्यांचे अभिनंदन. पुढील प्रयत्नांसाठी शुभेच्छा. ◂(वृत्तसंस्था)



श्रीलंकेत टी-२० विश्वचषक जिंकल्याचा आनंद साजरा करताना भारतीय दिव्यांग महिला क्रिकेट संघातील खेळाडू

# डेफलिम्पिकमध्ये प्रांजलीचा सुवर्णवेध

**◆ टोकियो, २४ नोव्हेंबर**
भारतीय नेमबाज प्रांजली प्रशांत धुमलने सुरुवातीपासून शेवटपर्यंत वर्चस्व गाजवत महिलांच्या २५ मीटर पिस्तूल स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले, सोमवारी येथे डेफलिम्पिकमध्ये तिचे हे तिसरे पदक आहे.



तिने यापूर्वी अभिनव देशवालसह मिश्र पिस्तूल स्पर्धेत सुवर्ण आणि महिलांच्या एअर पिस्तूलमध्ये रौप्यपदक जिंकले होते.

युक्रेनच्या मोसिना हॅलिनाने रौप्यपदक जिंकले आणि कोरियाच्या जिओन जिवोनने कांस्यपदक जिंकले.

महिलांच्या एअर पिस्तूल स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारी अनुया प्रसाद चौथ्या स्थानावर राहिली. प्रांजलीने नवीन पात्रता विश्वविक्रम आणि ६०० पैकी ५७३ गुणांसह डेफलिंपिक विक्रमासह अंतिम फेरीत प्रवेश केला होता.

प्रांजलीने अंतिम फेरीत ३४ गुणांसह अंतिम फेरीत स्थान मिळवले, जे मोसिनाने रौप्यपदक जिंकले त्यापेक्षा दोन गुणांनी जास्त आहे. भारताच्या अनुया प्रसादला शूटआउटमध्ये हरवून जिओनने ३० गुणांसह कांस्यपदक जिंकले. पात्रता फेरीत, भारतीय नेमबाजाने जागतिक कर्णबधिर पात्रता विक्रम आणि कर्णबधिर ऑलिंपिक विक्रम मोडत अव्वल दोन स्थान मिळवले. ◂(वृत्तसंस्था)

## यवतमाळात कुस्त्यांची दंगल आजपासून

**◆ यवतमाळ, २४ नोव्हेंबर**
महाराष्ट्राचे सांस्कृतिक व क्रीडा वैभव असणाऱ्या लाल मातीतील कुस्ती स्पर्धांची परंपरा कायम राखत यवतमाळ जिल्हा कुस्तीगीर संघाने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मंगळवार, २५ नोव्हेंबर रोजी लाखो रुपयांची जंगी लयलूट असलेल्या भव्य इनामी काटा कुस्त्यांची विराट दंगल आयोजित केली आहे.

ज्येष्ठ स्वातंत्र्यसंग्राम सेनानी तथा जवाहरलाल दर्डा उपाख्य बाबूजी यांच्या स्मृतीदिनानिमित्त हनुमान आखाड्याच्या प्रांगणात शिवकालीन वाद्यांच्या गजरात या स्पर्धेला प्रारंभ होणार आहे. माजी खासदार डॉ. विजय दर्डा, माजी शिक्षणमंत्री राजेंद्र दर्डा, आमदार बाळासाहेब मांगुळकर, माजी आमदार कीर्ती गांधी यांच्या मार्गदर्शनात ही दंगल होणार आहे. या दंगलीमध्ये प्रवेश विनाशुल्क आहे. या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन यवतमाळ जिल्हा कुस्तिगीर संघाचे कार्याध्यक्ष प्रभाकर गटलेवार, सचिव अनिल पांडे, उपाध्यक्ष कुलभूषण तिवारी, रामेश्वर यादव, संघटक प्रताप पारसकर, दीपक ठाकूर, कोषाध्यक्ष अनंत जोशी, सहसचिव सुरेश जयसिंगपुरे यांच्यासह संचालक मंडळाने केले आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

## कसोटी साठी न्यूझीलंडच्या केन विल्यमसनचे पुनरागमन

**◆ वेलिंग्टन, २४ नोव्हेंबर**
पुढील महिन्यात वेस्ट इंडीजविरुद्ध होणाऱ्या तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी केन विल्यमसनचा न्यूझीलंडच्या १४ सदस्यीय संघात समावेश करण्यात आला आहे.

पहिली कसोटी २ डिसेंबरपासून ख्राइस्टचर्च येथे सुरू होत आहे. विल्यमसनचा न्यूझीलंड क्रिकेटशी मर्यादित करार आहे, त्यामुळे तो उपलब्ध असताना न्यूझीलंडसाठी खेळताना परदेशी लीगमध्ये खेळू शकतो. वेगवान गोलंदाज झॅक फॉल्क्स, जेकब डफी आणि ब्लेअर टिकनर यांचीही संघात निवड झाली आहे. कंबरेच्या दुखापतीतून बरे झाल्यानंतर डॅरिल मिचेल संघात परतला आहे. ग्लेन फिलिप्स अजूनही दुखापतीतून बरे होत आहेत. विल ओरोर्क आणि बेन सीअर्स दुखापतींमुळे उपलब्ध नाहीत आणि काइल जेमीसन पाठीच्या दुखापतीतून पुनरागमन करत असल्याने त्याला विश्रांती देण्यात येत आहे. ◂(वृत्तसंस्था)

## राजराजेश्वरी प्राथमिक शाळेत क्रीडा सप्ताह

**सोलापूर दि.२४ नोव्हेंबर-**
विनायक नगर येथील राजराजेश्वरी बालक मंदिर प्राथमिक शाळेत क्रीडा सप्ताहास सुरवात झाली. शहर मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष विद्यानंद स्वामी, महात्मा विद्यामंदिर प्रशालेच्या सेवानिवृत्त मुख्याध्यापिका सविता गायकवाड, नेताजी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य रविशंकर कुंभार, सेवानिवृत्त प्राचार्य विजयकुमार हुल्ले, नेताजी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार आदींच्या हस्ते भारतीय हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद व संस्थेचे माजी सचिव बसवराज कुंभार यांच्या प्रतिमेचे पूजन करून याचे उदघाटन झाले.



क्रीडा सप्ताहात खो खो, लंगडी, संगीत खुर्ची, धावणे स्पर्धा, दोरीवरील उडी, लिंबू चमचा, स्लो सायकल, कॅरम व बुद्धिबळ आदी खेळ घेण्यात येणार असल्याचे प्रास्ताविकेत सांगितले. सूत्रसंचालन लक्ष्मण कांबळे यांनी केले. बजरंग शिरसट यांनी आभार मानले.

# वेळापूरच्या 'अर्धनारी नटेश्वर'ला दुहेरी मुकुट

## जिल्हा अजिंक्यपद कुमार व मुली खो-खो स्पर्धा : किरण स्पोर्टस् व वाडीकुरोली उपविजेते

**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**
वेळापूरच्या अर्धनारी नटेश्वर क्रीडा मंडळाने जिल्हा अजिंक्यपद कुमार व मुली गटातून विजेतपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला.

जुळे सोलापूर येथील स्वामी विवेकानंद प्रशालेच्या मैदानावर झालेल्या अंतिम सामन्यात वेळापूरच्या मुलींनी के. के. स्पोर्टस क्लब वाडीकुरोलीचा १२-११ असा एका गुण व १० सेंकद राखून पराभव केला. मध्यंतराच्या ४-६ ही पिछाडीच वाडीकुरोलीस महागात पडली. मुलांच्या संघाने येथील किरण स्पोर्टस क्लबला २२-१० असे १२ गुणांनी हरविले. मध्यंतरासच त्यांनी ११-६ अशी निर्णायक आघाडी घेतली होती. तृतीय स्थान शेवतेच्या आदर्श क्लब व मुलींच्या गटात समृद्धी स्पोर्टस् क्लबने संपादिले.

स्पर्धेचे उद्घाटन सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर, स्वामी विवेकानंद प्रशालेचे प्राचार्य अंबादास पांढरे, वसुंधरा महाविद्यालयाचे प्राचार्य तानाजी देशमुख, शारीरिक शिक्षण संचालक अशोक पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी सोलापूर म्युचर खो-खो असोसिएशनचे सचिव उमाकांत गायकवाड, खजिनदार श्रीरंग बनसोडे, उपाध्यक्ष सुनील चव्हाण, सहसचिव राजाराम शितोळे, पंच मंडळ सचिव गोकूळ कांबळे, तांत्रिक समितीचे सचिव शिवशंकर राठोड, निवड समिती सदस्य गुलाम मुजावर, मोहन रजपूत, सतीश कदम, प्राची बुह्राणपूर, असोसिएशनचे सदस्य सुरेश खुर्द भोसले, शरद व्हनकडे, सोनाली केत, संतोष कदम, अजित शिंदे, जावेद मुलानी, सोमनाथ बनसोडे, पुंडलिक कलखांबकर आदी उपस्थित होते.

पंच म्हणून नागेश माडीकर, यंकाप्पा शेंडगे, लखन कांबळे, नौशाद मुजावर, सुरज शेवाळे, रवींद्र चव्हाण, आनंद जगताप, अशोक कोळी, समर्थ कोळी, अनिकेत सावंत, शेखर जोडमोटे, जगन्नाथ जाधव, समीर शेख, अक्षय पवार, श्रीकांत चव्हाण यांनी काम पहिले.




# बुद्धिबळात मानांकित खेळाडूंची विजयी सलामी

## आर्किड महाविद्यालयात आंतर विभागीय स्पर्धा : बास्केटबॉलमध्ये सोलापूरची घोडदौड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**
नागेश करजगी ऑर्किड महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशिक्षण विद्यापीठांतर्गत राज्यस्तर आंतर विभागीय तंत्र शिक्षण व फार्मसी महाविद्यालयाच्या बुद्धिबळ स्पर्धेत येथील आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त दीक्षा कुलकर्णी, हिच्यासह रितेश कौतकर, विनीत बागुल, दर्शन जाधव या आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडूंनी विजयी सुरुवात केली. बास्केटबॉल मध्ये चुरशीने झालेल्या लढतीत पुरुष गटात सोलापूर आणि कोल्हापूर या संघांनी उपांत्य फेरीत तर महिला गटात सोलापूर व जळगाव या संघानी अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन विद्यापीठाचे क्रीडा समन्वयक डॉक्टर बालाजी फुलचवाढ व ऑब्झर्वर संजय वाईकर यांच्या हस्ते तसेच प्राचार्य डॉक्टर बीके सोनगे यांच्या अध्यक्षतेखाली



**सोलापूर : डॉ. आंबेडकर तंत्रशिक्षण विद्यापीठाच्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर तंत्रशिक्षण विद्यापीठांतर्गतआंतर विभाग बुद्धिबळ स्पर्धेचे उद्घाटन करताना सोलापूर विभागाचे निरीक्षक संजय वाईकर, क्रीडा समन्वयक डॉ. बालाजी फुलचवड, प्राचार्य डॉक्टर बी. के. सोनगे, सिनेट सदस्य प्रा. सचिन गायकवाड, मार्गदर्शक सुमुख गायकवाड. दुसऱ्या छायाचित्रात सोलापूर विरुद्ध कोल्हापूर या बास्केटबॉल सामन्यातील टिपलेला क्षण.**

सोलापूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य सचिन गायकवाड, आंतरराष्ट्रीय पंच व प्रशिक्षक सुमुख गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी स्पर्धा पंच म्हणून राष्ट्रीय वरिष्ठ पंच उदय वगरे, प्रज्वल कोरे हे उपस्थित होते.

या स्पर्धेसाठी विद्यापीठांतर्गत या स्पर्धेत यजमान सोलापूर विभागासह पुणे, जळगाव, कोल्हापूर, नागपूर, छत्रपती संभाजीनगर या विभागातील निवड झालेल्या खेळाडूंनी सहभाग नोंदविला आहे. या स्पर्धेसाठी पात्रता समिती सदस्य म्हणून गणेश वडवेराव, प्रा. एस एस जमादार, प्रा. ऋचा श्रीराम तर आयोजन समिती सदस्य म्हणून प्रा. शिवशरण कोरे उपस्थित होते. या स्पर्धा पार पाडण्यासाठी महाविद्यालयातील लॅब असिस्टंट, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी व्हॉलेंटियर्स यांचे सहकार्य लाभत आहे. बास्केटबॉल पंच राजेंद्र नारायणकर, अभिषेक, डॉ गुडनाल आदी काम पाहत आहे.



## वैरागच्या श्री साई औद्योगिक कॉलेजमध्ये क्रीडा सप्ताह उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि २४ नोव्हेंबर-**
श्री साई औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वैराग (सासुरे) येथे क्रीडा सप्ताहाची उत्साहात सांगता करण्यात आली. संस्थेच्या अध्यक्षा डॉ मीरा सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत याची सांगता झाली. विद्यार्थी जीवनातील खेळाचे महत्त्व अधोरेखित करताना उद्घाटन समारंभात ''आरोग्यम् धनसंपदा'' या म्हणीचे महत्त्व सांगितले गेले. खेळामुळे शिस्त, परिश्रम, संघभावना आणि नेतृत्व गुणांचा विकास होतो, असे डॉ सूर्यवंशी म्हणाल्या. सप्ताहात क्रिकेट, कबड्डी, गोळा फेक, रनिंग, बुद्धिबळ या स्पर्धांचे आयोजन केले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य श्याम गोवर्धन, सर्व शिक्षक,कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# वाखरी-पंढरपूर रस्त्याचे काम रखडले

## नागरिक धुळीने हैराण; पुलाच्या ठिकाणी होतेय वाहतूक कोंडी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २४ नोव्हेंबर-**

वाखरी ते पंढरपूर पालखी मार्गाचे काम अतिशय संथ गतीने सुरू आहे. वाखरी गावालगतच्या पुलाच्या ठिकाणी धुळ आणि खड्डे यामुळे नागरिकांसाठी प्रवास करणे धोकादायक बनले आहे. याठिकाणचे काम वेळेत पूर्ण करण्यात येऊन, गावालगतच्या भागात गतिरोधक बसविण्यात यावे अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

एमआयटी कॉलेज वाखरी ते पंढरपूर रस्त्याचे काम राष्ट्रीय रस्ते विकास प्राधिकरण यांच्यामार्फत करण्यात येत आहे. सदरचे काम हे अतिशय धिम्या गतीने सुरू आहे. इसबावी, वाखरी भागात काम पूर्ण होण्याआधीच रस्ता खराब झालेला आहे. त्यातच या मार्गावर वाखरी व इसबावी येथे असणाऱ्या पुलाचे काम गेल्या काही आठवड्यांपासून ठप्प आहे. यामुळे धुळ मोठ्या प्रमाणात निर्माण होत आहे. वाखरी येथे पूर्वीच्या रस्त्याचा वापर करण्यात येत असताना जुना पुल खराब झालेला आहे. गावालगतच्या पुलाजवळ रस्ता उखडल्याने धुळ निर्माण होत आहे. सदरचे काम पूर्ण कधी होणार अशी विचारणा स्थानिकांकडून होत आहे. वाखरी गावालगत सर्व्हिस रोड तयार करण्यात आलेला नाही. काही ठिकाणी पूर्वीचा रस्ता हा सर्व्हिस रोड म्हणून वापरता येणार आहे. मात्र, त्याठिकाणची लेव्हल करून आवश्यक डागडुजी करणे आवश्यक आहे. मलपे ओढा, इसबावी येथील ओढ्याचे काम ठप्प आहे. याठिकाणहून वाहतुक मोठ्या प्रमाणात असते. रस्ता खराब असल्याने अनेकदा याठिकाणची वाहतुक विस्कळीत झालेली असते. तीच परिस्थिती सरगम चौक परिसरातील आहे.



**काम गेळेत पूर्ण करण्याच्या ठेकेदाराला सूचना**

वाखरी ते पंढरपूर रस्त्याचे काम वेळेत पूर्ण व्हावे यासाठी संबंधित ठेकेदाराला सुचना दिल्या आहेत. खराब रस्त्याच्या ठिकाणी आवश्यक ती दुरूस्ती करण्यात येत आहे. कामगार हे सुट्टी तसेच इतर कारणांमुळे बाहेरगावी गेलेले होते. त्यामुळे काम थांबले होते. कामाला गती देण्याबाबत ठेकेदाराला सक्त सूचना देण्यात आल्या आहेत अशी माहिती प्रकल्प संचालक केशव घोडके यांनी दिली.

# सध्याच्या ढगाळ वातावरणाचा ज्वारी पिकाला होणार फायदा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

यंदा दमदार पावसामुळे जमिनीचा वापसा लवकर झाला नाही आणि यामुळे उशिराने जरी पेरणी झाली तरीही ज्वारीचे पीक बऱ्याच ठिकाणी सध्या जोमात आले आहे. गेल्या २ दिवसांपासून ढगाळ वातावरण निर्माण झाल्याने त्याचा फायदा ज्वारी पिकाला मोठ्या प्रमाणात होणार असल्याची माहिती काही जाणकार शेतकऱ्यांनी दिली.

मध्यंतरी थंडीमुळे ज्वारी पिकावर चिकटा रोग पडला होता; मात्र आता या आभाळी वातावरणामुळे ज्वारी पिकात सुधारणा होणार आहे. आता अजून जरी मध्यम स्वरूपाचा पाऊस पडला तरी या पिकासाठी फायदेशीरच असल्याची माहिती काही शेतकऱ्यांनी दिली. सध्या जिल्ह्याच्या काही भागात आणि विशेषत: मराठवाड्यात ज्वारीचे पीक जोरात बहरले आहे. गुडघ्या-मांड्याला ज्वारी आली आहे. सततच्या दुष्काळी स्थितीनंतर यंदा पावसाने नुकसान झाले असले तरी रब्बीत पेरलेल्या ज्वारीचे पीक बहरल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.



पावसाळ्यात पाऊस चांगला झाल्याने नदी, ओढे, नाले, धरणे, तलाव ओसंडून भरले आहेत. रब्बी हंगामातील ज्वारीचे सरासरी क्षेत्र यंदा थोडे कमी असले तरी ज्वारी पिकाला चांगला उतार पडेल, अशी आशा शेतकऱ्यांना वाटत आहे. यंदा मुबलक पाणीसाठा झाल्याने या ज्वारी पिकाला भरपूर पाणी मिळणार आहे. या पिकाबरोबर हरभरा आणि गहू पीकही जोमात आले असून, यंदा रब्बी हंगाम साधेल, अशी आशा शेतकरी बांधवांना वाटत आहे. पिकांच्या वाढीसाठी यंदा हवामान अनुकूल असल्याने सध्या रब्बी ज्वारीची वाढ जोमात होताना दिसत आहे. परंतु मजुरीचे दर गगनाला भिडल्यामुळे शिवाय शेतमालाला बाजारपेठेत अपेक्षित दर मिळत नसल्याने शेतकरी चिंतेत आहेत. यामुळे ज्वारीसह सर्वच पिकाला हमीभाव मिळावा, अशी त्यांची अपेक्षा आहे.

## महत्वाचे...



### रिजनल सायन्स एक्झिबिशनमध्ये 'सिंहगड' ने पटकावला प्रथम क्रमांक

**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने पुणे येथे आयोजित केलेल्या रिजनल सायन्स एक्झिबिशनमध्ये सोलापुरातील केगांव येथील सिंहगड पब्लिक स्कूल अँन्ड ज्युनिअर कॉलेजने प्रथम क्रमांक पटकावला. यामध्ये देशभरातील १४८ शाळांनी सहभाग नोंदवला होता. वेस्ट मॅनेजमेंट अँन्ड अल्टरनेटिव टू प्लास्टिक या संकल्पनेवर आधारित ही स्पर्धा घेण्यात आली. सिंहगड पब्लिक स्कूलच्या इयत्ता ९ वी ते ११ वीच्या विद्यार्थ्यांनी इकोब्रिक : अ सस्टेनेबल सोल्यूशन फॉर प्लास्टिक वेस्ट हा पर्यावरणपूरक प्रकल्प सादर केला होता. त्यास प्रथम क्रमांक मिळाले. या प्रकल्पासाठी अभयसिंह यादव व समर्थ जगताप या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. विज्ञान शिक्षिका जुबैरिया शेख यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. संस्थेचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी सादर केलेला हा प्रकल्प पर्यावरणीय संकटांवर प्रभावी उत्तर देणारी संशोधनात्मक निर्मिती आहे. अशा उपक्रमांतून विद्यार्थी देशाच्या शाश्वत विकासात मोलाचे योगदान देतील, असे सांगितले. मुख्याध्यापिका शाहिन शेख, उपमुख्याध्यापक प्रकाश नवले आदींनी अभिनंदन केले.

### ओंकार साखर ग्रूपकडून कर्मचाऱ्यांसाठी २० टक्के पगारवाढ; १६ हजार ५०० कर्मचाऱ्यांना मिळणार लाभ

**अक्कलकोट, दि.२४ नोव्हेंबर-**



ओंकार साखर समूहातील सर्व कर्मचाऱ्यांना २० टक्के पगारवाढ लागू करण्याचा निर्णय ओंकार ग्रुपचे चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील यांनी जाहीर केल्याने कर्मचारी वर्गात जल्लोष साजरा करण्यात आला. सुमारे १६ हजार ५०० हून अधिक कर्मचारी वर्गाला लाभ मिळणार आहे.

ओंकार ग्रुपचे चेअरमन बोत्रे-पाटील म्हणाले की, कर्मचारी हेच आमच्या समूहाची खरी ताकद आहे. त्यांच्या परिश्रमामुळेच ओंकार ग्रुपने अल्पावधीत राज्यातील १८ साखर कारखान्यांचे पुनरुज्जीवन करून उत्पादन क्षमतेत मोठी वाढ केली आहे. ही वेतनवाढ कर्मचारीवर्गाप्रती त्यांच्या परिश्रमाचे व त्यागाचे मोल आहे. समूहात सध्या १६ हजार ५०० हून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत. समूहाच्या सर्व युनिटमध्ये वेळेवर वेतन, शेतकरी हिताचे उपक्रम, समाजकल्याण कार्यक्रम आणि उत्कृष्ट व्यवस्थापन यांसाठी ओंकार ग्रुप राज्यात सर्वात पुढे आहे. पगारवाढीने आर्थिक स्थैर्य येऊन आगामी गाळप हंगामासाठी प्रोत्साहन मिळेल, असा विश्वास संचालक मंडळाने व्यक्त केला.

## निधन वृत्त...

### इंदुबाई गायकवाड



**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील इंदुबाई बाळासाहेब गायकवाड (वय ६२) यांचे आज (दि. २४) अल्पशा आजाराने निधन झाले. दुपारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, दीर, भावजय, पुतणे असा परिवार आहे.

### श्रीरंग बनसुडे



**अकलूज, दि. २४ नोव्हेंबर-**

येथील श्रीरंग गेनबा बनसुडे (वय-८४) यांचे अल्प आजाराने रविवारी (दि.२३) निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सूना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे मुळ गाव सुरवड (ता. इंदापूर) आहे. सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना अकलूज येथे ते होते. सूर्यकांत व चंद्रकांत बनसुडे यांचे ते वडील होत. सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील कारखान्याचे माजी उपाध्यक्ष व इंदापूर पं.स. माजी सदस्य सुरेश मेहेर यांचे ते सासरे तर सुरवड ग्रा. पं.च्या माजी सरपंच नंदिनी मेहेर यांचे वडील होत.

# आर्या महाविद्यालयाची दापोली व महाबळेश्वर कृषी संशोधन केंद्राला भेट




**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि.२४ नोव्हेंबर-**

मानेगाव ता. माढा येथील आर्या कृषी महाविद्यालयाच्या द्वितीय वर्षातील २९ विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल कोकण व महाबळेश्वर परिसरातील विविध संशोधन केंद्रांना भेट देऊन दि १८ ते २१ नोव्हेंबर दरम्यान यशस्वीपणे पार पडली.

या सहलीमुळे विद्यार्थ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञान, संशोधन प्रक्रिया आणि कृषी-आधारित उद्योग यांचा अनुभव मिळाला. सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी महाबळेश्वर येथील गहू संशोधन केंद्रास भेट देऊन गव्हाचे विविध वाण, सुधारित तंत्रज्ञान, बियाणे उत्पादन प्रक्रिया तसेच हवामानाशी जुळवून घेतलेले संशोधन याबद्दल मार्गदर्शन घेतले. त्यानंतर मधुमक्षिका पालन संशोधन केंद्रात मधमाश्यांचे प्रकार, मध संकलन, परागीभवनाचे कृषीतील महत्त्व आणि उद्योगातील संधी याची माहिती मिळाली. दापोली येथे डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठात विद्यार्थ्यांनी विविध विभागांचा अभ्यास करून सेंद्रिय शेती, फळबाग व्यवस्थापन, आधुनिक कृषी तंत्रज्ञान आणि उपलब्ध संशोधन संधींचा परिचय घेतला. लाखी बाग प्रकल्पाविषयीही विस्तृत माहिती देण्यात आली. रत्नागिरी येथील प्रादेशिक नारळ संशोधन केंद्रात विद्यार्थ्यांना नारळ उत्पादन, जाती सुधारणा, रोप निर्मिती, खत व्यवस्थापन आणि कोकणातील हवामानानुसार योग्य कृषी पद्धती याबद्दल शास्त्रज्ञांनी मार्गदर्शन केले. सहलीमध्ये प्रा. तुषार नामदे, प्रा. साठे आणि कुमार शिंदे सहभागी झाले होते. सहलीच्या आयोजनासाठी महाविद्यालय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा प्रणिता शिंदे व प्राचार्य डॉ. नितीन उबाळे यांचे सहकार्य लाभले.

### किल्ला स्पर्धेचे आज पारितोषिक वितरण

**पंढरपूर, दि. २४ नोव्हेंबर-**

येथील कलासाधना सांस्कृतिक मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या किल्ला स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ २५ नोव्हेंबर रोजी विजापूर गल्ली मधील पांडुरंग भवन येथे मंगळवारी (ता.२५ नोव्हेंबर) सायंकाळी सहा वाजता कार्यक्रम आयोजिण्यात आल्याची माहिती कलासाधना सांस्कृतिक मंडळाचे सर्वेसर्वा श्रीकांत बडवे यांनी दिली.

स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ कलासाधना सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष तथा येथील सिंहगड इंजिनिअरिग कॉलेजचे प्राचार्य डॉ.कैलाश करांडे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. कार्यक्रमास येथील पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचे सचिव सुधीर पटवर्धन या बरोबरच येथील के.बी.पी. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब बलवंत तसेच येथील पांडुरंग अन्नछत्र मंडळाचे अध्यक्ष अनिरुध्द बडवे-पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभलेली आहे.



### सांगोला नगरपरिषद निवडणूक; मतदान केंद्राध्यक्ष, अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण

**सांगोला, दि. २४ नोव्हेंबर-**

सांगोला नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक करिता दि.२ डिसेंबर रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत एकूण ४० मतदान केंद्रावर मतदान होणार आहे.

मतदान व्यवस्थितपणे पार पडण्यासाठी सोमवार दि.२४ नोव्हेंबर रोजी मतदान केंद्राध्यक्ष, मतदान केंद्र अधिकारी असे एकूण ३०० अधिकारी यांना निवडणूक निर्णय अधिकारी सैपन नदाफ यांनी प्रशिक्षण दिले. तसेच त्यांना इव्हीएम मशिन्स हाताळण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. वैधरित्या नामनिर्दिष्ट झालेल्या व निवडणुकीतून माघार न घेतलेल्या उमेदवारांना दि.२६ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता पू.अहिल्यादेवी होळकर सभागृह, सांगोला येथे चिन्हांचे वाटप करण्यात येणार आहे. तरी सदर चिन्ह वाटप करतेवेळी उमेदवार व त्यांचा एक प्रतिनिधी उपस्थित राहण्याचे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी सैपन नदाफ यांनी केले आहे. तसेच सर्व उमेदवारांनी आपले दैनंदिन खर्चाचे अहवाल खर्च संनियंत्रण समितीकडे सादर करण्याचे आवाहन सहा.निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.सुधीर गवळी यांनी केले आहे.

# माजी उपसभापती गायकवाड उबाठा शिवसेनेतून भाजपात

## मोहोळकरांनी भाजपाच्या पाठीशी राहण्याचे केले आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.२४ नोव्हेंबर-**

भाजपाने नगराध्यक्षपदासाठी दिलेल्या उमेदवार शीतल क्षीरसागर तसेच नगरसेवकपदाचे सर्व उमेदवार मोहोळ शहराला विकासाचे मॉडेल बनवतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात पालकमंत्री जयकुमार गोरे हे निधीची कमतरता भासू देणार नाहीत. त्यामुळे मोहोळ हे विकासाचे मॉडेल होणार हा ठाम विश्वास असल्यानेच मी शिवसेना (उबाठा) सोडून भाजपात प्रवेश केल्याचे सांगत मोहोळ शहराच्या सर्वांगीण विकासासाठी मोहोळकरांनी भाजपाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे असे आवाहन माजी उपसभापती बाळासाहेब गायकवाड यांनी केले.

पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी आमदार राजन पाटील, जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण तसेच भाजपा ज्येष्ठ नेते नागनाथ क्षीरसागर यांच्या प्रमुख उपस्थितीत माजी उपसभापती गायकवाड यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातून भाजपात प्रवेश केला. त्यानंतर होम टू होम प्रचार करताना त्यांनी हे मत व्यक्त केले. मोहोळ शहराला विकासाचे मॉडेल बनवण्याची क्षमता फक्त भाजपात आहे .'सबका साथ सबका विकास' या धोरणानुसार भाजपाने देशात व राज्यात विकासाची मोठी क्रांती केली आहे. गायकवाड यांनी सांगितले. या होम टू होम प्रचाराप्रसंगी लोकनियुक्त नगराध्यक्षपदाच्या उमेदवार शीतल क्षीरसागर, प्रभाग ९ चे भाजपा उमेदवार नीलावती डोके, संतोष वायचळ, वैभव गुंड, प्रभाकर डोके, नाना डोके, कबीर कोरबु, विष्णुपंत गायकवाड, अनुसूचित जाती मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष संजव खिलारे, राज्य परिषद सदस्या विजया वडेपल्ली, संगीता खंदारे, माजी नगरसेविका अर्चना संतोष वायचळ, मुजीब मुजावर, नवनाथ गाढवे, छगन आष्टूळ आदी उपस्थित होते.

# 'स्वेरी' त जागरूक नागरिक, डिजिटल सुरक्षा, रस्ता सुरक्षा व महिला सुरक्षा उपक्रम

▶▶ विद्यार्थ्यांनी सादर केल्या पाच लघुनाटिका

▶▶ मुलींची छेडछाड, बालविवाह, डिजीटल फसवणूक, खोटा व्यवहार याबाबत केले भाष्य




**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २४ नोव्हेंबर-**

स्वेरीच्या विद्यार्थ्यांनी लघुनाटिकेच्या माध्यमातून समाजातील गुन्हेगारीबाबत जनजागृती केली. ही लघुनाटिका पाहण्यासाठी पंढरपूर येथील पोलिसांनी विशेष उपस्थिती लावली. विद्यार्थ्यांच्या अभिनयाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

स्वेरीतील राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी हा कार्यक्रम घेतला. पंढरपूर पोलीस विभाग व स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागरूक नागरिक-डिजिटल सुरक्षा, रस्ता सुरक्षा व महिला सुरक्षा' हा जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आला. स्वेरीतील विद्यार्थ्यांनी लघुनाटिका अधिक प्रभावीपणे मांडली. या नाट्यातून समाजातील मोबाईल वापराचे दुष्परिणाम, वाढती गुन्हेगारी यावर भाष्य केले.समाजामध्ये गुन्हेगारी, मोबाईल वापराचा अतिरेक, अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नये यासाठी स्वेरीच्या विद्यार्थ्यांनी उत्तमरित्या जनजागृतीचा संदेश दिला.

मुलींच्या छेडछाडीबाबत 'उद्याची निर्भया आजच जागृत होऊ द्या', खोटा व्यवहार करणाऱ्या ठगासाठी 'आजची मदत उद्याचे आश्वासन', 'बालविवाह थांबवा भविष्य घडवा', 'विश्वास जपा, फसवणूक टाळा','डिजीटल फसवणुकीचे जाळे आयुष्य उध्वस्त करते सगळे.' ही पाच लघुनाटके विद्यार्थ्यांनी सादर केली.

या लघुनाटिकेत पियुष चोपडे-पाटील, आर्यन हंगरगेकर, सुशांत शेटे, धैर्यशील पवार, प्रताप काकडे, अमरजित रणखांब, विवेक मांजरे, रोहन तिडके, राहुल मदने, सौंदर्या जाधवर, प्रितम बढे, वैष्णवी मेटकरी, भावना चौधरी, सारा धुमाळ, गौरी महाजन व सिद्धी चव्हाण यांनी सहभाग घेतला. प्रत्येकांनी उत्तम अभिनयाची चुणूक दाखवली.

तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक टी.वाय. मुजावर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेली पोलीस निरीक्षक वडणे उपस्थित होते. या लघुनाट्याची पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे अधिकारी, कर्मचारी अभिमन्यू गरड, महेश निकम, मोनिका वाघे, सुवर्ण कदम, ज्ञानेश्वर गायकवाड, विकास हजारे यांनी विद्यार्थ्यांची ही लघुनाटीका भविष्यात गुन्हेगारी कमी करण्यास मदत करेल.' अशी आशा व्यक्त केली.

संस्थेचे संस्थापक व प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज एम. एम.पवार यांच्या सहकार्याने उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती, डॉ. यशपाल खेडकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.अमोल चौंडे व इतर प्राध्यापकांचे या लघुनाटिकेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

# पंढरपुरात हमीभाव खरेदीसाठी नांव नोंदणी सुरू

## सभापती हरिष गायकवाड यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२४ नोव्हेंबर-**

शासनाने हमीभाव खरेदी योजने अंतर्गत दि. ३० नोव्हेंबर २०२५ अखेर मका उत्पादक शेतकरी बांधवांनी शासकीय हमीभाव खरेदी केंद्रावरती ७/१२ उतारा, मका पिकाची नोंदीसह, आधारकार्ड बँक पासबुक झेरॉक्स इत्यादी कागदपत्रे जमा करून ऑनलाईन नांव नोंदणी करणेसाठी वरील कालावधी निश्चित केला आहे. मका या शेतीमालासाठी शासकीय हमीभाव रु.२४००/- प्रति क्विंटल निश्चित केल्याची माहिती येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरिष गायकवाड यांनी दिली.

या संदर्भात माहिती देताना सभापती गायकवाड यांनी सांगितले की, शासनाने हमीभाव खरेदी योजने अंतर्गत दि.३१ डिसेंबर २०२५ अखेर सोयाबीन, उडीद, मुग ऊत्पादक शेतकरी बांधवांनी शासकीय हमीभाव खरेदी केंद्रावरती ७/१२ उतारा, सोयाबीन, उडीद, मुग पिकाची नोंदीसह, आधारकार्ड व बँक पासबुक झेरॉक्स इत्यादी कागदपत्रे जमा करून ऑनलाईन नाव नोंदणी करणेसाठी वरील कालावधी निश्चित केला आहे. सोयाबीन या शेतीमालासाठी हमीभाव रू.५३२८/- प्रति क्विंटल व हेक्टरी उत्पादकता १५ क्विंटल, उडीद या शेतीमालासाठी हमीभाव रु ७८००/- प्रति क्विंटल व हेक्टरी उत्पादकता ८.५६ क्विंटल व मुग या शेतीमालासाठी हमीभाव रु.८७६८/- प्रति क्विंटल व हेक्टरी उत्पादकता ८.८६ क्विंटल इतकी निश्चित केलेली आहे. तरी शासकीय हमीभाव खरेदी केंद्रावरती हमीभावाने मका, सोयाबीन, उडीद, मुग विक्री करण्यासाठी तालुक्यातील शेतकरी बाधवांनी दिलेल्या मुदतीत आपल्या मका, सोयाबीन, उडीद, मूग या शेतीमालाची ऑनलाईन नाव नोंदणी पंढरपूर तालुका सह खरेदी विक्री संघ लि., नवी पेठ, पंढरपूर येथे वरील नमूद कागदपत्रासह करावी, ऑनलाईन नाव नोंदणी शिवाय शासकीय हमीभाव खरेदी केंद्रावरती मका, सोयाबीन, उडीद, मुग विक्री करता येणार नाही, तरी जास्तीत जास्त शेतकरी बंधुनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन बाजार समितीचे सभापती हरिष गायकवाड व उपसभापती राजूबापू गावडे यांनी केले आहे.

## महत्वाचे...

### महापालिका निवडणूक प्रारूप मतदार यादीवर सोमवारी ५३ हरकती प्राप्त

**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी जाहीर करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादीवर महापालिका निवडणूक कार्यालयाकडे आज दिवसभरात एकूण ५३ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. पहिल्या दिवशी गुरुवार दि. २० नोव्हेंबर रोजी एकही हरकत आली नव्हती. शुक्रवार दि. २१ नोव्हेंबर रोजी एकूण ६ तक्रारी महापालिका निवडणूक कार्यालयात प्राप्त झाल्या होत्या. दरम्यान, आज सोमवार दि. २४ नोव्हेंबर रोजी एकूण ५३ तक्रारी महापालिका निवडणूक कार्यालयाकडे प्राप्त झाल्या आहेत. यामध्ये दुसऱ्या प्रभागातील म तदार चुकून अंतर्भूत झाले असतील तर त्यांची नावे त्या प्रभागातून वगळण्यात यावीत आणि संबंधित प्रभागात समाविष्ट करण्याबाबतचे ४३ अर्ज तर इतर १० अर्ज दाखल झाले आहेत. आज एकाच दिवशी एकूण ५३ हरकती व सूचनांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. दि. २० ते २४ नोव्हेंबर दरम्यान एकूण ५९ हरकती व सूचना आल्या आहेत. प्रसिध्द प्रारूप मतदार यादीवर नागरिकांना राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार दि.२० ते २७ नोव्हेंबर २०२५ अखेरच्या कालावधीत नमूद कारणाकरीता हरकती / सूचना महापालिका निवडणूक मुख्य कार्यालय डॉ. कोटणीस हॉल, आय.सी.आय.सी.आय. बँकेच्यावर या ठिकाणी कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत स्वीकारण्यात येतील. दुस-या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झालेले, संबधित प्रभागातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नांवे असूनही, महानगरपालिकेच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नांवे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे या संदर्भात सूचना करावे, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.



### रोटरी सॅटेलाइट ई-क्लब ऑफ सोलापूर नॉर्थच्या विद्यार्थ्यांचा गौरव

**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

झेक प्रजासत्ताकातील शहराच्या ८०० व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित आंतरराष्ट्रीय चित्रकला स्पर्धेत येथील रोटरी सॅटेलाइट ई-क्लब ऑफ सोलापूर नॉर्थ यांच्या अँनिट्सनी विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत जागतिक पातळीवर आपली छाप उमटवली. ही स्पर्धा अनास्टेशिया आणि त्यांच्या टीमने आयोजित केली होती. या उपक्रमासाठी संजीवकुमार मेंते, आसावरी साराफ आणि रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थ टीम यांचे योगदान लाभले. क्लबचे अध्यक्ष संतोष सपकाळ आणि सचिव युगंधर जिंदे यांनी आभार व्यक्त केले.

**पुरस्कारप्राप्त सहभागी:** निवा निहार बुरटे, मानवी निहार बुरटे, युवांश युगंधर जिंदे, अजिंक्य पोरे.

# ग्रामसेवक युनियनचे असहकार आंदोलन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

बार्शी शहरातील गाडेगाव रोड म्हाडा कॉलनीत राहणाऱ्या ग्रामसेवक प्रकाश बावीस्कर यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियनच्या वतीने असहकार आंदोलन करण्यात आले. दरम्यान, संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई करण्यात यावी अशा आशयाचे निवेदन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्याकडे देण्यात आले.

यावेळी डी.बी. भुजबळ, एन.व्ही. ढवळे, डी.एम. पाटील आदी उपस्थित होते. ग्रामसेवक युनियनचे जिल्हाध्यक्ष भुजबळ म्हणाले, ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, कुर्डूवाडी पंचायत समितीचे विस्तार अधिकाऱ्याने दिलेल्या त्रासाला कंटाळून ग्रामसेवक बावीस्कर यांनी आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे. सध्या ते हॉस्पीटलमध्ये असून, त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करुन दोषीवर निलंबनाची कारवाई करावी, या मागणीसाठी सर्व ग्रामसेवकांनी अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराविरोधात असहकार आंदोलन सुरु केले आहे.

#### ग्रामसेवकांचे ऑडिट होते अपूर्ण

ग्रामसेवक प्रकाश बावीस्कर यांनी काम करत असलेल्या ग्रामपंचायतीचे ऑडीट गेल्या काही महिन्यांपासून प्रलंबित होते. त्यामुळे ग्रामपंचायतीस पंधराव्या वित्त आयोगाचा निधी मिळण्यास अडचण होत होती. त्यामुळे ते ऑडिट पूर्ण करावे, असे आदेश ग्रामपंचायत विभागाचे डेप्युटी सीईओ, विस्तार अधिकाऱ्यांनी दिले होते.

#### कुणावरही दबाव आणला नाही

शासन आणि मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या आदेशानुसार मी माझे काम करत आहे. ग्रामसेवक आत्महत्या करेल, असा कुणावरही दबाव आणला नाही. यापुढेही वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायत विभागाने कामकाज करेल, असे ग्रामपंचायत विभागाचे डेप्युटी सीईओ सुर्यकांत भुजबळ यांनी सांगितले.

# शिक्षक बदल्यांचा निर्णय आता सीईओंकडेच राहणार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

जिल्हा परिषद शिक्षक बदल्यांच्या अधिकाराच्या प्रश्न अनेक वर्षापासून शिक्षक संघटनांसाठी तसेच प्रशासकीय यंत्रणासाठी डोकेदुखी ठरला होता. ग्रामविकास विभागाने ६ नोव्हेंबर रोजी जारी केलेल्या पत्राद्वारे यासंदर्भात निर्णय घेत शिक्षक बदल्या आता जिल्हा परिषद सीईओ यांच्या अधिकारातच राहतील हे स्पष्ट केले आहे.

या निर्णयामुळे जिल्हा पातळीवरील अधिकार पुर्नस्थापित होऊन बदलांची प्रक्रिया अधिक पारदर्शकता सुलभता आणि वेळेवर पूर्ण होण्याची अपेक्षा अनेक शिक्षकांनी व्यक्त केली आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे बदल्यांचे अधिकार होते. मात्र, काही वर्षांपूर्वी बदल्यांची प्रक्रिया पूर्णतः राज्यस्तरावर केंद्रीय पद्धतीने करण्यात आली होते. ग्राम मंत्रालयाकडून थेट प्राथमिक शिक्षकांच्या बदल्या करण्यात येत होत्या. ही प्रक्रिया तांत्रिकदृष्ट्या गुंतागुंतीची ठरल्याने मोठ्या प्रमाणावर केंद्र सोय गैरसोय निम र्ण झाली होती. वन्स आयटी कंपनीच्या सॉफ्टवेअरमुळे अनेक अडचणी आल्या. अर्ज सादरीकरण प्राधान्यक्रम तपासणी आणि याद्या परिषदेमध्ये त्रुटी निर्माण झाल्या होत्या. त्यामुळे शिक्षकांमध्ये असंतोष वाढला आहे. अनेकांनी न्यायालय दाद मागितली होती. बदल्यामुळे पारदर्शकतेचा अभाव तांत्रिक चुका आणि अन्यायकारक याद्यांमुळे ग्रामविकास विभागाला वारंवार प्रतिज्ञापत्र सादर करावे लागत होते. अखेर या सर्व तक्रारींची दखल घेत ग्रामविकास विभागाने शिक्षकाबद्दलच्या परिपत्रिकेतील स्वतःचा हस्तक्षेप मागे घेतला आहे. या निर्णयामुळे येथे शैक्षणिक वर्षासाठी म्हणजेच २०२५-२६ साठी बदली प्रक्रिया ३१ मे पूर्वी होऊन १५ जूनपूर्वी शिक्षकांना त्यांच्या नवीन ठिकाणी रूजू होता येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# मेलडी डेझ कार्यक्रमाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ नोव्हेंबर-**

छत्रपती रंगभवनात रविवारी झालेला मेलडी डेझ हा संगीतमय आणि दृश्यात्मक कार्यक्रम प्रेक्षकांसाठी अविस्मरणीय ठरला. कार्यक्रमात सादर केलेले आठवणीतले किस्से आणि जीवनातील छोट्या-छोट्या क्षणांनी अनेकांना स्वतःच्या भूतकाळात पुन्हा घेऊन गेले.

किस्से, कार्टून्स व्हिज्युअल्स, आणि पेंटिंग्जचा अनोखा संगम प्रेक्षकांनी पहिल्यांदाच अनुभवला. ही नावीन्यपूर्ण संकल्पना असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. गाणी, कथा आणि दृश्य यांची गुंफण इतकी प्रभावी होती की सभागृहात अनेकदा भावना दाटून आल्या. अपूर्वा शहाणे, विश्वास शाईवाले अथर्व शहाणे यांनी गायन केले. उन्मेष शहाणे, डॉ. जतीन बोस-काजळे यांनी संवादाची जबाबदारी पार पाडली. निर्मिती संकल्पना



सुवर्णा शहाणे यांची होती. चित्रकार दर्शना धुमाळ, सिन्थेसायजेवर अविनाश इनामदार, तबला सन्मित रणदिवे यांनी आपापली बाजू सांभाळली. याप्रसंगी उद्योगपती दत्ता सुरवसे, प्रिसिजन फाउंडेशनच्या सुहासिनी शहा, एमआयटी स्कूल ऑफ डिझाईनच्या डीन रुपाली धामणे, एमआयटी युनिव्हर्सिटीचे रजिस्ट्रार प्राणेश मुर्णाल, नरेंद्र गंभीरे, अण्णासाहेब कोतली, डॉ.गिरीश काळे, गुंडाळे यांच्यासह रसिक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### तरुणाला मारून दुचाकी पळवली

**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

टेपू ऊर्फ अशरूफअली मन्नान बागवान याला २०२४ मध्ये तडीपार करण्यात आले आहे. हा टेपू विनापरवाना शहरात येऊन विजापूर वेसेतील तरुणाला मारहाण केली. एवढ्यावरच न थांबता त्याची दुचाकी चोरली.

या प्रकरणी सोहेल मुनाफ पिरजादे (वय ३०, रा. सेंट्रल अपार्टमेंट, पाथरूट चौक) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून टेपूवर फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. त्याला पोलिसांनी अटक करून न्यायालयासमोर हजर केले असता, त्याला कोर्टाने न्यायालयीन कोठडी सुनावली. ही घटना सोमवारी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास घडली. तडीपार टेपू हा विनापरवाना शहरात आला.तो घरी जात असताना विजापूर वेस येथे सोहेल याच्याशी वाद झाला.

# मृत जनावरांवर भोगाव येथील दाहिनीमध्ये होणार अंत्यसंस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

शहरात कुठेही जनावर मृतावस्थेत आढळल्यास, त्या संबंधित प्रभागाचे आरोग्य निरीक्षक तात्काळ घटनास्थळी जाऊन प्राथमिक तपासणी करतील. त्यानंतर भोगाव येथील दाहिनीपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी संबंधित आरोग्य निरीक्षक आणि स्वच्छता विभागाकडे राहणार आहे. दाहिनी येथे उपलब्ध असलेल्या यांत्रिक सुविधांच्या साहाय्याने मृत जनावरांचे वैज्ञानिक पध्दतीने अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत सोलापूर शहरातील स्वच्छता व्यवस्थेत अधिक सुधारणा करण्याच्या दृष्टीने सोलापूर महानगरपालिकेने हा उपक्रम हाती घेतला आहे. मृत जनावरांचे वैज्ञानिक पध्दतीने अंत्यसंस्कार करण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांच्या मार्गदर्शनाखाली भोगाव येथे अत्याधुनिक दाहिनी उभारण्यात आली आहे. ही दाहिनी आता नियमित कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

शहर हद्दीत कुठेही जनावर मृतावस्थेत आढळल्यास, त्या संबंधित प्रभागाचे आरोग्य निरीक्षक तात्काळ घटनास्थळी जाऊन प्राथमिक तपासणी करतील. त्यानंतर स्वच्छतेच्या सर्व निकषांचे पालन करून भोगाव येथील दाहिनीपर्यंत पोहोचविणार आहेत. त्याठिकाणच्या यांत्रिक सुविधांच्या साहाय्याने मृत जनावरावर अंत्यसंस्कार केले जाणार असल्याचे सांगण्यात आले. मृत जनावर आढळल्यास नागरिकांनी त्वरित संबंधित प्रभाग आरोग्य निरीक्षकांशी संपर्क साधावा. माहिती देताना स्थानाची अचूक माहिती, फोटो (शक्य असल्यास) किंवा इतर तपशील द्यावेत, ज्यामुळे संबंधित पथक तातडीने कार्यवाही करण्यात येईल. या उपक्रमात नागरिकांच्या सहकार्याची महत्त्वपूर्ण भूमिका राहणार आहे, असे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सांगितले.

# शंकरशेठ साबळे नेत्र रुग्णालयाचे आज उद्घाटन

**सोलापूर, दि.२४ नोव्हेंबर-**

'पीबीएमए'चे एच.व्ही.देसाई आय हॉस्पिटल पुणे आणि संकरा आय फाऊंडेशन, युएसए च्या सहयोगाने सोलापुरात शंकरशेठ साबळे आय हॉस्पिटल हे अद्ययावत नेत्रचिकित्सा रुग्णालय सुरु करण्यात येत आहे. या रुग्णालयाचे औपचारिक उद्घाटन मंगळवार २५ नोव्हेंबरला होईल, अशी माहिती चेअरमन नितीन देसाई आणि व्हाईस चेअरमन सुधीर साबळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

खेड, बार्शी रोड येथे दोन एकर प्लॉट मध्ये ५४ हजार चौरस फुट अशा प्रशस्त जागेत हे रुग्णालय विस्तारलेले आहे. सोलापूर व आसपासच्या भागांसाठी आधुनिक व उच्च-गुणवत्तेच्या नेत्रचिकित्सा सेवा प्रदान करणे आहे, हा याचा उद्देश आहे. याचे उद्घाटन संकरा आय फाऊंडेशन, युएसएचे विश्वस्त दिव्योगी पटेल, कल्पतरू फाउंडेशन, यूएसएचे संचालक अमोल कुलकर्णी आणि प्रतिभा बाचल आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तसेच संकरा आय फाऊंडेशन, युएसएच्या विश्वस्त मंडळाचे सदस्य वेंकट मद्दीपति, पीबीएमएच्या एच.व्ही. देसाई आय हॉस्पिटलच्या विश्वस्त मंडळाचे सदस्य आणि एच.व्ही. देसाई आय हॉस्पिटलचे चेअरमन नितीन देसाई, अध्यक्ष राजेश शहा, उपाध्यक्ष सुधीर साबळे, उपाध्यक्ष मनीष जैन, सचिव राहुल राठी, खजिनदार मयुर व्होरा आणि चंद्रकिशोर व्होरा व धनराज पाटील,तसेच एच.व्ही. देसाई आय हॉस्पिटलच्या संचालक मंडळाचे सदस्य व एच.व्ही देसाई आय हॉस्पिटलचे कार्यकारी संचालक परवेझ बिलीमोरिया, मुख्य वैद्यकीय संचालक डॉ.राहुल देशपांडे आणि वैद्यकीय संचालक डॉ.कुलदीप डोळे आदी मान्यवर याप्रसंगी उपस्थित राहणार आहेत. सुरुवातीला व्यापक नेत्र तपासणी, निदान सेवा आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया या सेवा दिल्या जाणार आहेत. ही सुविधा सोलापूरसह धाराशिव, बीड, लातूर, परभणी आणि कर्नाटकातील जवळपासच्या जिल्ह्यांमधील रुग्णांना देखील देण्यात देईल. या पत्रकार परिषदेस कार्यकारी संचालक परवेझ बिलिमोरिया, मुख्य वैद्यकीय संचालक डॉ.राहुल देशपांडे, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ.रेश्मा मेहता, सुधीर सुधाळ, अरुण साबळे आदी उपस्थित होते.

#### डॉ. कुमार करजगी यांनी केली जागा दान

रुग्णालयासाठी २५ कोटी किमतीची दोन एकर जागा कामगार नेते डॉ. कुमार करजगी यांनी दान केली. येथील शस्त्रक्रिया विभागाला दिवंगत नागेश करजगी शस्त्रक्रिया विभाग असे नाव देण्यात आले आहे. प्रमुख दात्यांमध्ये सुधीर साबळे आणि त्यांच्या कुटुंबीयांचा समावेश आहे. या पुढाकाराला संकरा आय फाऊंडेशन, युएसएचे प्रमुख सहकार्य लाभले आहे, असे चेअरमन देसाई यांनी सांगितले.



डॉ.आंबेडकर यांच्या ऐतिहासिक महार वतनदार परिषदेच्या वर्धापन दिनानिमित्त

# अस्थिविहार प्रेरणाभुमी येथे दुरुस्तीसह रंगरंगोटी करावी

### राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांचे आयुक्तांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ नोव्हेंबर-**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक महार वतनदार परिषदेच्या ९८ व्या वर्धापन दिनानिमित्ताने मिलिंद नगर येथील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्थिविहार प्रेरणाभुमी या ठिकाणी दुरुस्ती व रंगरंगोटी करण्यात यावी, अशी मागणीचे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष चंदनशिवे यांनी पालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांना दिले आहे.

सोलापूर शहरातील बुधवार पेठ परिसरातील थोरला राजवाडा, मिलिंद नगर येथील पंचाची चावडी या ठिकाणी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये २६ व २७ नोव्हेंबर १९२७ रोजी दोन दिवसीय महार वतनदार परिषद घेतली होती. त्या महार वतनदार परिषदेला यंदा ९८ वर्षे पूर्ण होत आहेत. डॉ. आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या नगरीम ध्ये या निमित्ताने महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष आण्णा बनसोडे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये गुरुवार दि २७ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ४ वाजता, विश्वरत्न डॉ. आंबेडकर अस्थिविहार प्रेरणाभुमी येथे अभिवादन कार्यक्रम आयोजित



करण्यात आला आहे. दरम्यान, या परिषदेच्या वर्धापन दिनानिमित्ताने येथील दुरुस्ती व रंगरंगोटीची कामे करण्यात यावीत. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्थिविहार प्रेरणाभुमी येथील भारतीय संविधान फलक दुरुस्त करावा. अस्थिकलशाजवळील दरवाजा, एसी व खिडकी काच दुरुस्त करावे. पंचाची चावडी येथे मोडकळीस आलेले फरशीकरण, लाईट व आतील बाजुस रंगरंगोटी करावी.

येथील सांस्कृतिक भवन येथे आतील बाजुस रंगरंगोटी व कंपाऊंड वॉल परिसरातील फरशीकरण तसेच पायऱ्या, शटर, प्रवेशद्वार याची दुरुस्ती करण्यात यावी. विविध ठिकाणचे नामनिर्देशक (ग्रेनाईट स्तंभ) फलक दुरुस्त करावा, असे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी या निवेदनात म्हटले आहे. या निवेदनासंदर्भात तत्काळ कार्यवाही करावी असे आदेश महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिले आहेत.



# स्व.अशोक कामटेंसह शहीदांच्या स्मृत्यर्थ उद्या एमआयडीसी येथे रक्तदान शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ नोव्हेंबर-**

मुंबई येथील २६/११ या घटनेत शहीद झालेले सोलापूरचे माजी पोलीस आयुक्त अशोक कामटे यांच्यासह इतर शहिदांच्या स्मृत्यर्थ बुधवार, २६ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ यावेळेत अक्कलकोट रोड एमआयडीसी पोलिस ठाणेसमोरील श्रृती इंजिनिअरिंग येथे रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती परशुराम रापेल्ली यांनी दिली.

रोटरी क्लब ऑफ सोलापूर एमआयडीसी, तेजज्ञान फाउंडेशन, सोलापूर हॅपी थॉटस्, एम आयडीसी पोलिस ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने सन २००९ पासून या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. पहिल्या वर्षीच्या शिबीरात ६५ जणांनी सहभाग नोंदविला होता. त्यानंतर दरवर्षी यात वाढ होत कधी २०० तर कधी ४५० जणांनी रक्तदान केले, असेही त्यांनी सांगितले. दरवर्षी शिबीराच्या माध्यमातून रक्तदान चळवळीला प्रोत्साहन दिले जाते. यंदाचे १७ वे वर्ष आहे. बुधवारी सकाळी ९ वाजता पोलिस आयुक्त एम.राजकुमार, श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालयचे प्रेसिडेंट सत्यनारायण बोल्ली, चेअरमन डॉ.माणिक गुर्रम, रोटरी डिव्हिजनचे गव्हर्नर जे.एच. पटेल आदींच्या प्रमुख उपस्थितीत या शिबीराचे उद्घाटन करण्यात येणार आहे. तरी सोलापुरकरांनी या शिबीरात सहभाग नोंदवावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

# कांद्याच्या दरात घसरण कायम; साठवलेल्या कांद्याला मिळेना भाव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ नोव्हेंबर-**

राज्यातील प्रमुख बाजार समित्यांत कांदा दरात मोठी घसरण कायम आहे. साठवलेल्या कांद्याला भाव मिळेनासे झाल्याने कांदा उत्पादक शेतकरी गंभीर आर्थिक संकटात सापडले आहेत. सोलापूर सिध्देश्वर बाजार समितीत कांद्याला सरासरी १,००० रुपये, तर नवीन कांद्याला सरासरी १,३५० रुपये घाऊक दर मिळत आहे.

सर्वाधिक २,५०० रुपये असा आहे. सर्वात कमी १०० रुपये घाऊक दर मिळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये असमाधानाचे वातावरण आहे. उन्हाळी कांद्याला चांगला भाव मिळेल या



आशेने एप्रिल महिन्यापासून मोठ्या प्रमाणात कांदा साठवून ठेवला होता. अतिवृष्टी, अवकाळी पाऊस आणि कमी बाजारभाव अशा तिहेरी माऱ्यामुळे आमच्या सर्व आशा मातीमोल ठरल्या. साठवणीतील ३० ते ४० टक्के कांदा खराब झाला असून, वजनातही मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. साठवणूक खर्च आणि नुकसान वजा गेल्यानंतर मिळणाऱ्या दरात उत्पादन खर्चही निघेनासे झाले असल्याचे सांगण्यात आले.

बांगलादेशातील घाऊक बाजारात कांदा दर १०० रुपये किलोच्या घरात पोहोचल्याने तेथील ग्राहकांना महागात कांदा घ्यावा लागत आहे, तरीही भारताकडून कांदा निर्यातबंदी उठवण्याबाबत कोणतीही सकारात्मक हालचाल झालेली नाही. केंद्र सरकारने बांगलादेशाशी तातडीने चर्चा करुन निर्यातबंदी हटवावी. निर्यात पुर्ववत सुरु झाल्यास भारतीय कांद्याला किमान २ ते ५ रुपये प्रतिकिलो दर मिळू शकते, असेही सांगण्यात आले.

#### बाजारपेठेवर परिणाम

अतिवृष्टीने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना जेरीस आणले आहे. कांद्याला चांगला भाव मिळेल. या आशेतून कांदा साठवलेला होता. मात्र साठवणुकीचा कांदा पाण्यामुळे खराब झाला. त्याचा परिणाम बाजारपेठेवर जाणवत आहेत. दर वाढेल अशी शक्यता होती. परंतु ती आता मावळत चालली आहे, अशी प्रतिक्रिया शेतकऱ्यांमधून व्यक्त केली जात आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




सोलापूर : जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने सोमवारी नियोजन भावना पासून युनिटी मार्च पदयात्रा काढण्यात आली होती. यात विविध शाळेचे विद्यार्थिनी तसेच एनसीसी कॅडेट्स यांनी भाग घेतला.



# नेत्यांचा भरभरून विकास, अक्कलकोट मात्र भकास

## ●राज्यातील महत्वाचे तीर्थक्षेत्र : अरुंद व खड्डेमय रस्ते, वाहतूक अन् पार्किंगचा बोजवारा, अस्वच्छतेमुळे भाविकही त्रस्त

**तभा वृत्तसेवा । सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

**स्वामी भक्तांची बारमाही गर्दी असलेले महाराष्ट्रातील महत्वाचे तीर्थक्षेत्र म्हणून गणल्या जाणाऱ्या अक्कलकोट नगरीच्या विकासाकडे लोकप्रतिनिधींसह प्रशासनाचेही अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचे विदारक चित्र आहे. अरुंद व खड्डेमय रस्ते, स्वच्छतेचा अभाव, मंदिर परिसरासह अक्कलकोट शहरातील प्रमुख रस्ते आणि बाजारपेठांमधील वाहतूक व पार्किंगची समस्या, कचऱ्याचे ढीग, अस्वच्छता, बंदी असलेल्या प्लॅस्टिकचा होणारा सर्रास वापर यांसारखे गंभीर प्रकार दृष्टीस पडताहेत. अस्ताव्यस्तपणे भररस्त्यावर ठाण मांडणारे फेरीवाले आणि अतिक्रमणे यामुळे अक्कलकोटवासीयांसह स्वामी भक्तांना प्रचंड त्रास होत असल्याचे दिसून येत आहे. दर्जाहिन रस्त्यांची कामे म्हणजे विकास म्हणता येणार नाही. याकडे लक्ष वेधताना अक्कलकोटच्या सर्वच लोकप्रतिनिधींनी स्वतःच्या विकासाबरोबरच अक्कलकोट शहर आणि तालुक्याच्या विकासाकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे, असे यानिमित्ताने सांगावेसे वाटते.**



दक्षिणेची काशी म्हणून ओळखला जाणारा सोलापूर शहर व जिल्हा हा प्रामुख्याने सोलापूरचे श्री सिध्देश्वर मंदिर, पंढरपूरचे श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ मंदिर यांसह लगतच महाराष्ट्राचे आराध्य तुळजापूरची श्री आई तुळजाभवानी आणि गाणगापूरचे श्री दत्त मंदिर यांसह जिल्ह्यातील जवळपास सर्वच तालुक्यात असणारी जागृत देवस्थाने यामुळे भक्तांच्या वर्दळीचा जिल्हा बनलेला आहे. पंढरपूर आणि अक्कलकोटमध्ये तर भक्तांची बारमाही गर्दी असते. नागरिकांचा विरोध सकारात्मतेने निपटून पंढरपूर कॉरिडॉर करण्यासाठी शासन आणि प्रशासन सज्ज झाले आहे. वास्तविक पाहता कॉरिडॉर झाल्यानंतर पंढरपूरचा होणारा विकास हा न भूतो न भविष्यतो असणार आहे. कारण श्री काशिविश्वेश्वर आणि अयोध्येचे श्री राम मंदिर कॉरिडॉर झाल्यानंतर तेथील भक्तांचा वाढलेला ओघ आणि धार्मिक पर्यटनासह इतरही वाढलेली मोठी उलाढाल तेथील लोकांचे जीवनमान बदलून टाकणारी आहे. याच धर्तीवर पंढरपूर, अक्कलकोटचा विकास झाल्यास संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातील आर्थिक उलाढालीला गती मिळणार आहे. परंतु यासाठी गरज आहे ती राजकीय आणि प्रशासकीय इच्छाशक्तीची.

अक्कलकोट हे कर्नाटक राज्याच्या सीमेवरील दक्षिण भारताला जोडणारा प्रमुख तालुका आहे. अक्कलकोटमार्गे महाराष्ट्रात येणाऱ्या पाहुण्यांसाठी सोलापूरची प्रतिमा निर्माण करणारा तालुका अक्कलकोट आहे. अशा या अक्कलकोट शहराचा विकास नियोजनबध्द होणे गरजेचे आहे. यासाठी अक्कलकोटच्या लोकप्रतिनिधींनी व्हिजन ब्रॉड करुन






प्रशासनाला कामाला लावून अक्कलकोटचा चोहोबाजूंनी विकास केला पाहिजे. सत्ताधारी आमदार आणि तेदेखील सोलापूर जिल्ह्याच्या सत्तेची सूत्रे हाती असलेले नेतृत्व असल्याने अक्कलकोटचा विकास झपाट्याने व्हावा, अशी लोकांची इच्छा आहे. राजकीय लोकांबरोबरच तालुक्याचा विकास झाला पाहिजे.

भारताच्या लोकशाहीत सर्वांचाच विकास अपेक्षित आहे. परंतु व्यक्तींबरोबरच अक्कलकोट शहर व तालुक्याचा विकास झाल्यास पर्यायाने संपूर्ण जनतेचाच विकास शक्य होणार आहे. अक्कलकोट हे मोठे तीर्थक्षेत्र असल्याने प्राधान्याने येथे मोठे व दर्जेदार रस्ते, स्वच्छता आणि स्वच्छतागृहे मोठ्या प्रमाणात आवश्यक आहेत. वटवृक्ष स्वामी महाराज मंदिर परिसरातील पार्किंगची दुरवस्था पाहता येथे बहुमजली पार्किंग होणे गरजेचे आहे. पुण्यातील दगडूशेठ गणपती मंदिर परिसरात मंडईमध्ये एक नव्हे दोन मोठी बहुमजली पार्किंगची सुविधा आहे. अक्कलकोटमध्ये बारमाही भक्तांची गर्दी असते. वाहने लावण्यासाठी जागा नसल्यास लोकांना पार्किंगसाठी खासगी लोकांना पैसे मोजावे लागतात. मंदिर परिसरातील भिक्षेकऱ्यांचा बंदोबस्त गरजेचा आहे. भाविकांशी सौजन्याने वागणे अपेक्षित आहे, कारण भक्त दर्शनासाठी येतात म्हणून ते इतर सर्व प्रकार सहन करतात.

स्वामी मंदिर, समाधी मंदिर, प्रमुख मार्ग याठिकाणी तरी किमान दिवसभर स्वच्छता कर्मचारी कार्यरत असणे आवश्यक आहे. पंढपूरच्या श्री विठ्ठल मंदिरात खासगी संस्थेकडून स्वच्छता मोहिम २४ तास राबविली जाते. किमान शहराचा गावठाण भाग आणि मंदिर परिसर तरी स्वच्छ राहील, मोकाट जनावरांचा वावर असणार नाही, यासाठी संबंधित प्रशासनाने दक्षता घेणे अपेक्षित आहे.

अक्कलकोटमधून मैंदर्गी, दुधनी, गाणगापूरकडे जाणाऱ्या मार्गावर तसेच बेडर कन्नप्पा चौकात नेहमीच वाहतूक कोंडी होत असते. हा मार्ग अरुंद असल्याने वाहनांच्या लांबच्या लांब रांगा लागलेल्या असतात. किमान या मंदिर परिसरात तरी वाहनांसाठी मोठ्या पार्किंगची सुविधा अत्यावश्यक आहे. सध्या कुठेही वाहन लावले तरी नगरपालिका नाही तर खासगी जागावाले पार्किंगची आकारणी करतात. बेशिस्त रिक्षाचालकांसाठी आणि फेरीवाल्यांसाठी किमान नियम लावणे बंधनकारक आहे. मोकाट जनावरांमुळे देखील वाहतुकीची कोंडी दिसून येते. अक्कलकोट शहराच्या विविध भागात कचऱ्याचे ढीग दिसून येतात. त्यामुळे दुर्गंधी पसरते आणि आरोग्याच्या समस्या उद्‌भवतात. सोलापूर ते अक्कलकोट मार्ग चांगला झाला आहे, परंतु वळसंगच्या टोलनाक्यावरील होणारी उध्दट वर्तन भाविकांना त्रासदायी ठरत आहे.

अक्कलकोटचे बसस्थानक प्रशस्त आणि सुंदर झालेले आहे. या बसस्थानकात प्रवाशांसाठी आरामाची सुविधा असल्याने समाधान व्यक्त होत आहे. अशाच प्रकारे अक्कलकोट शहराचाही विकास अपेक्षित असल्याचे जाणकार नागरिक सांगत आहेत. आता नगरपालिकांच्या निवडणुकांचे वातावरण आहे. अनेकजण निवडणुकीच्या रिंगणात आहेत,. मतदारांनी देखील उमेदवारांना विकासाबाबत विचारणा केल्या तरच भविष्यात अक्कलकोटचा विकास होणार आहे.

### तीर्थक्षेत्र विकास आराखडा मंजूर झाला की सर्व समस्या सुटतील : सीईओ डाके

कार्यालयास सादर करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून काही सुधारणा सुचविण्यात आल्या असल्याने आराखडा बदलासाठी नवीन ऑर्किटेक्ट नियुक्त करुन लवकरच सुधारित तीर्थक्षेत्र विकास आराखडा सादर केला जाईल. शहर विकासासाठी भूसंपादन गरजेचे आहे. पण शासनाकडून त्यासाठी निधी उपलब्ध होणे आवश्यक आहे. तीर्थक्षेत्र अक्कलकोटला पंढरपूरप्रमाणे प्राधान्य देणे गरजेचे आहे. अक्कलकोट शहरात अनेक समस्या असून तीर्थक्षेत्र विकास आराखडा मंजूर झाला की, अक्कलकोटचा परिपूर्ण विकास होईल. नगरपालिकेच्या उत्पन्नाला मर्यादा आहेत. आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली तीर्थक्षेत्र आराखडा मंजूर होवून अक्कलकोट शहराचा निश्चित विकास होईल, अशी प्रतिक्रिया अक्कलकोट नगरपालिकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमाकांत डाके यांनी दिली



# राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून निवडणूक रणनीतीला वेग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ नोव्हेंबर-**

नगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि महिला प्रदेशाध्यक्ष अध्यक्षा रुपाली चाकणकर कुर्डुवाडीत प्रचारसभेसाठी दाखल झाले. यानिमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या निवडणूक रणनीतीला वेग आल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांनी दोन्ही मान्यवरांचे स्वागत केले.

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने प्रदेशाध्यक्ष तटकरे यांनी माहिती दिली की, सोलापूर जिल्ह्याचे सहसंपर्क मंत्री व विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांचा २७ ते २९ नोव्हेंबर दरम्यान सोलापूर शहर दौरा निश्चित करण्यात आला आहे. या कालावधीत शहर जिल्हाध्यक्ष, शहर कार्यकारिणी, प्रदेश पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसोबत बैठका घेऊन निवडणुकीची अंतिम रणनीती स्पष्ट केली जाणार आहे.

याप्रसंगी करमाळ्याचे माजी आमदार संजय शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील, सोलापूर शहर राष्ट्रवादी सरचिटणीस संतोष ऋतिक गायकवाड, राष्ट्रवादीचे कुर्डुवाडी तालुकाध्यक्ष दत्ता काकडे, पवन बेरे आदींची उपस्थिती होती.



# बोरामणीच्या सरपंचपदी अरुणा साळुंखेच कायम

### जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्णयाला निवडणूक आयोगाची स्थगिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ नोव्हेंबर-**



निवडणुकीचा खर्च सादर केला नसल्याचे कारण देत बोरामणी ग्रामपंचायतीच्या सरपंच अरुणा साळुंखे यांच्यासह सात सदस्यांना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी अपात्र केले होते. जिल्हाधिकार्यांच्या या निर्णयाविरोधात सरपंच साळुंखे यांच्यासह अपात्र सदस्यांनी राज्य निवडणूक आयोगाकडे धाव घेऊन त्यास स्थगिती मिळविली आहे. त्यामुळे बोरामणीच्या सरपंचपदी तूर्तास तरी अरुणा साळुंखे याच कायम राहिल्या आहेत.

सरपंच साळुंखे यांच्यासह स्वप्निल पटणे, ज्योती देशमुख, वैभव हलसगे, आकाश मशाळे, स्वाती रोकडे, सुभाष भोसले अशी स्थगिती मिळालेल्या ग्रामपंचायत सदस्यांची नावे आहेत.

सरपंच साळुंखे यांच्यासह सर्वच सात सदस्यांनी निवडणुकीत केलेला खर्चाचा हिशेब दिला नसल्याची तक्रार माजी सरपंच पुष्पावती आवटे यांनी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्याकडे केली होती. या तक्रारीवर सुनावणी घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी सर्वच सातही सदस्यांचे सदस्यत्व रद्द केले होते. जिल्हाधिकाऱ्यांच्या या निर्णयाविरोधात अपात्र ठरलेल्या सर्वच सदस्यांनी राज्य निवडणूक आयोगाकडे धाव घेतली.

निवडणूक आयोगाकडे सुनावणीदरम्यान अपात्र सदस्यांच्या वकिलांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या कारवाईला स्थगिती देण्याची मागणी केली. निवडणूक आयोगाने स्थगिती देत अपात्र सदस्यांना दिलासा दिला. यात सरपंच साळुंखे यांच्यासह अन्य सदस्यांतर्फे ॲड.दत्तात्रय घोडके हे काम पाहत आहेत.

# जिल्ह्यातील अकरा नगरपालिकांवर भाजपाचा झेंडा फडकवणार

**▸▸ नूतन जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांची माहिती**

**▸▸ जिल्हा परिषदेचीही तयारी केली पूर्ण**

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

ट्रेलर म्हणून अनगरच्या नगरपालिकेवर भारतीय जनता पार्टीने बिनविरोध विजय मिळविला आहे; त्याच धर्तीवर जिल्ह्यातील जनतेच्या सहकार्याने राहिलेल्या ११ नगरपालिकांवरही भारतीय जनता पार्टीचा झेंडा फडकवणार असल्याचा आत्मविश्वास भाजपा जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांनी दैनिक तरुण भारतशी संवाद साधताना व्यक्त केला. दरम्यान, जिल्हा परिषदेच्या आगामी निवडणूकसंदर्भात आमची तयारी पूर्ण झाली असल्याचा निर्वाळा त्यांनी दिला.

### जिल्ह्यात येणार स्टार प्रचारक

सोलापूर जिल्ह्यातील ११ नगरपालिकांच्या निवडणुकीत भाजपाने तगडे उमेदवार दिले आहेत. या सर्व उमेदवारांच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, ना.आशिष शेलार, ना.चंद्रशेखर बावनकुळे, आ.गोपीचंद पडळकर, ना.जयकुमार गोरे यांच्यासह अन्य स्टार प्रचारक येणार आहेत, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपात नवीन झालेले प्रवेश आणि जुने निष्ठावंत पदाधिकाऱ्यांची कशी सांगड घालणार? नाराज पदाधिकाऱ्यांमुळे पक्षाला फटका बसणार का? या प्रश्नांवर बोलताना ते म्हणाले, पक्षाचे संघटन वाढविण्यासाठी मेगा भरती करणे गरजेचे आहे. आपल्या राज्याचे स्टार प्रचारक तथा पालकमंत्री जयकुमार गोरे, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूरसह राज्यभरात नवीन प्रवेश दिले जात आहेत. यामुळे पक्षही मोठा होत आहे. जुन्या-नव्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करुन, योग्य त्या समन्वयातून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत योग्य अशा कार्यकर्त्यांना उमेदवारी देत आहोत; त्यांचे राजकारणातील आजतागायत केलेल्या कामाची चाचपणी करूनच उमेदवारी फायनल केली आहेत.

आमचे स्टार प्रचारक जयाभाऊही फार परिश्रम घेत आहेत. निवडणुकीच्या आखाड्यात उतरलेल्या सर्वच उमेदवारांना निवडून आणण्याची जबाबदारी आमची आहे. यासाठी रात्रीचा दिवस आम्ही करणार आहोत. सध्या आमच्यापुढे सर्वच नगरपालिका ताब्यात घेण्याचे ध्येय आहे. त्या ध्येयापर्यंत आम्ही जनतेच्या माध्यमातून जाणार आहोत. रोज एका नगरपालिका कार्यक्षेत्रात मी स्वत: जात असून, त्या ठिकाणच्या स्थानिक उमेदवाराचा प्रचारही करीत आहे.

बार्शी नगराध्यक्षपदासाठी ६ तर नगरसेवक पदासाठी १२० उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत. पंढरपूर नगराध्यक्षपदासाठी ५ तर नगरसेवक पदासाठी १३३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. अक्कलकोट नगराध्यक्षपदासाठी ६ तर नगरसेवक पदासाठी ७६ उमेदवार निवडणूक लढवित आहेत. अकलूज नगराध्यक्षपदासाठी ५ तर नगरसेवक पदासाठी ९१ उमेदवार निवडणूक लढवित आहेत.

सांगोला नगराध्यक्षपदासाठी ११ तर नगरसेवक पदासाठी १०३ उमेदवार निवडणूक लढवित आहेत. करमाळा नगराध्यक्षपदासाठी ५ तर नगरसेवक पदासाठी ७१ उमेदवार निवडणूक लढवित आहेत. कुर्डुवाडी नगराध्यक्षपदासाठी ६ तर नगरसेवकपदासाठी १०३ उमेदवार निवडणूक लढवित आहेत. मंगळवेढा नगराध्यक्षपदासाठी ३ तर नगरसेवक पदासाठी ५८ उमेदवार निवडणूक लढवित आहेत.

मोहोळ नगराध्यक्षपदासाठी ११ तर नगरसेवक पदासाठी ७९ उमेदवार निवडणूक लढवित आहेत. दुधनी नगराध्यक्षपदासाठी ५ तर नगरसेवक पदासाठी ५३ उमेदवार निवडणूक लढवित आहेत. मैंदर्गी नगराध्यक्षपदासाठी २ तर नगरसेवक पदासाठी ४७ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. या सर्व नगरपालिकेत आमचे सर्वच उमेदवार गुलाल उधळतील, असाही आशावादही त्यांनी व्यक्त केला.

सोलापूर तरुण भारत Solapur Tarun Bharat
Digital NEWS
बातमी नव्हे विचार
सोलापूर तरुण भारत डिजिटल न्यूज
आता प्रत्येक क्षेत्राची खबर थेट आपल्या पर्यंत...
#बातमी नव्हे विचार

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी १२७७

**पाहा पां अनुरागें भजे । जे प्रियोत्तमें मानिजे ।**
**ते पतिहीहून काय न वर्णिजे । प्रतिव्रता ? ।।**

सेवा, प्रेम, आपुलकी, विश्वास असे विषय स्पष्ट करुन दाखविण्याचा प्रसंग आला की, माऊली लागलीच स्त्रीकडे वळतात. स्त्री ही मम त्वाची, प्रेमाची, विश्वासाची, नि:स्वार्थसेवेची मूर्ती असल्याने माऊली स्त्रीच्या माध्यमातून आपला अवघड विषय अत्यंत सुलभतेने श्रोत्यांच्या गळी उतरवतात. माऊली प्रमाणे आपण सर्वांनी स्त्रीला एवढे महत्वाचे स्थान दिले तर, समाजात बलात्कार, खूण, हूंडाबळी, बालविवाह असे अनिष्ट प्रकार होणार नाहीत. निर्गुण असणारा परमात्मा अर्जुनाच्या प्रेमापोटी सगुण झाला आहे. अर्जुनाच्या प्रेमापोटी श्रीकृष्ण स्वत:ला विसरुन गेले आहेत. त्याच्या शंका-कुशंकाचे समाधान ते करीत आहेत. म्हातारपणी एखादया मुल नसलेल्या स्त्रीला जर मुल झाले तर ती पुत्रमोहाची मुर्तिमंत पुतळी जणू नाचू लागते. तशीच स्थिती श्रीकृष्णांची अर्जुनाच्या बाबतीत प्रेमापोटी झाल्याचे माऊली म्हणतात. येथे प्रेमाचे किती नवल आहे. **पहा केवढा आत्मज्ञानाचा उपदेश । केवढी युध्दभुमीवरील झुंज ।** अशा अवस्थेत युध्दभूमीवर अर्जुनापुढे श्रीकृष्णप्रेमाचे बाहुले नाचत आहे. आवड आणि लाज, व्यसन आणि तिटकारा, भ्रांत आणि शुध्दी या जोडया एकत्र असणे संभवत नाही. आवड म्हटले की लाज संपते, व्यसन म्हटले की तिटकारा संपतो आणि भ्रांत म्हटले की, शुध्दी सरते. अर्जुनाच्या प्रेमापोटी श्रीकृष्णाने हे सर्व प्रत्यक्षात उतरवून दाखविले आहे. श्रीकृष्णाचे अर्जुनावरील प्रेम पाहिल्यानंतर माऊलींना श्रीकृष्णापेक्षा अर्जुनाचेच जास्त गुण गाण करावे वाटत आहे. माऊली हे पटवून देतांना म्हणतात, **पाहा पां अनुरागें भजे । जे प्रियोत्तमें मानिजे । ते पतिहीहूनि काय न वर्णिजे । प्रतिव्रता ? ।।** अर्थात, जी पत्नी पतीची एकनिष्ठपणे सेवा करते आणि तिचा पती तिचा बहुमान ठेवतो. अशा पतिव्रतेची पतीपेक्षाही अधिक स्तुती केली जाते. अशी पत्नी त्या स्तुतीस पात्र असते. अर्जुनाच्या बाबतीत या प्रेमाचे स्पष्टीकरण करतांना माऊली म्हणतात, **तैसा अर्जुनुचि विशेषे स्तवावा । ऐसें आवडलें मज जीवा । जे तो त्रिभुवनींचिया दैवां । एकायतनु जाहला ।।** याप्रमाणे देवाला स्वत:पेक्षाही जास्त प्रिय असणा-या अर्जुनाचेच विशेष गुणवर्णन करावे, असे माझ्या मनाला आवडते. कारण त्रैलोक्यातील सर्व पुण्याई त्याच्या वाटयाला आली आहे. असे माऊली म्हणतात.



एखादा महान व्यक्ति, नेता, महात्मा एखादयाच्या घरी आला तर आपण ज्याच्या घरी अशी महान व्यक्ति आली त्या व्यक्तिचे गुणगान करतो. कारण हे महान नेतृत्व त्या व्यक्तिच्या प्रेमापोटी त्याच्या घरी आलेले असते. अगदी तसेच निर्गुण परमात्मा अर्जुनासाठी साकार होऊन त्याच्यासाठीच आले आणि स्वत:चे सर्वस्व विसरुन त्याच्या समोर कटपुतली प्रमाणे त्याच्या ईशारावर त्याला पाहिजे ते करीत आहेत. म्हणून माऊली अर्जुनाचे स्तवन करण्यात आनंद मानत आहेत. अर्जुनाला मार्गदर्शन करण्यासाठी श्रीकृष्ण परमात्मा लाभले आहेत. त्याप्रमाणे आपणाला संसाराच्या मोहातून व मीपणाच्या जाळयातून बाहेर काढण्यासाठी ज्ञानेश्वर माऊली ज्ञानेश्वरीच्या रुपाने आले आहेत. म्हणून आपण अर्जुनाच्या पंक्तीला बसण्यास पात्र झालो आहोत, असे आम्हास वाटते. खरे म्हणजे हे फार भाग्याचे लक्षण आहे. कारण अर्जुनाची पंगत म्हणजे काही सामान्यांची पंगत नाही. साक्षात भगवंतांच्या मुखातून ज्ञान ऐकायचे म्हणजे अत्यंत भाग्य होय. जय जय राम कृष्ण हरी.

- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड
मो. ९४२२२१६४४८

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : मंगळवार
दि. २५ नोव्हेंबर २०२५
विक्रम संवत् २०८२
शके - १९४७
संवत्सर - विश्वावसु
मास - कार्तिक
शु. पंचमी (२२.५६)
ऋतु - हेमंत
नक्षत्र- उत्तराषाढा (२३.५६)
योग - गड (१२.४८)
करण - बव (१०.१२)
....राहू काल...
मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०

दिनविशेष - १९८१: अहमदाबाद येथील सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियमवर पहिला आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना खेळला गेला.
१९९१: कमल नारायण सिंग यांनी भारताचे २२ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९९९: ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आमटे यांना इंदिरा गांधी शांतता पुरस्कार जाहीर.



## सोशल महाविद्यालयात एनसीसी दिवस साजरा

**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

एस.एस.ए. आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेज येथे एनसीसी विभाग ९ महाराष्ट्र बटालियन यांनी एन.सी.सी. दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कॅप्टन डॉ. गौस अहमद यांनी कार्यक्रमांचे स्वरूप आणि उद्दिष्टे यावर प्रकाश टाकला आणि म्हणाले की एनसीसी ही केवळ एक संस्था नाही तर ती चारित्र्य निर्माण आणि राष्ट्रसेवेचे साधन आहे. एनसीसी आपल्या कॅडेट्सची शक्ती आणि ऊर्जा, शिस्त आणि सेवेची भावना वाढवते. एनसीसी भारतातील तरुणांमध्ये, विशेषतः सध्याच्या युगात, कठोर परिश्रम आणि समर्पण, सतत संघर्ष, कर्तव्य आणि नेतृत्वाची भावना निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. आपला देश समृद्ध भारत साध्य करण्याच्या दृढनिश्चयाने वेगाने पुढे जात आहे. या प्रवासात एनसीसी कॅडेट्स त्यांची जबाबदारी पार पाडत आहेत. एनसीसी अंमली पदार्थांच्या गैरवापराबद्दल जागरूकता आणि जागरूकता निर्माण करण्यासाठी स्वच्छता मोहीम, रक्तदान शिबिरे आणि असे वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करते.

बैठकीनंतर लगेचच एनसीसी कॅडेट्सनी विविध राष्ट्रीय आणि देशभक्तीपर विषयांवर लेख लिहिले. कार्यक्रमांचा समारोप एनसीसी गीताने झाला. एनसीसी दिनानिमित्त ९ महाराष्ट्र बटालियन एनसीसीचे कमाडिंग ऑफिसर कर्नल रणधीर सतीश साहेब, लेफ्टनंट कर्नल शरभ बाबर यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# 'आयटी पार्क'ला मंजुरी मिळताच १८ महिन्यांत होणार बांधकाम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ नोव्हेंबर-**



नियोजित आयटी पार्क ही होटगी येथील जलसंपदा जागेवरच होणार असून, त्यासाठी सुमारे ४० कोटी रुपये खर्च येणार आहे. त्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव राज्य शासनाच्या उच्चस्तरीय समितीकडे पाठविण्यात आला आहे, प्रस्तावास मंजुरी मिळाल्यानंतर १८ महिन्यांत बांधकाम पूर्ण होऊन आयटी पार्क सुरु होईल, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज (दि. २४) माध्यमांशी बोलताना दिली. दरम्यान, आता येत्या काही दिवसात उच्चस्तरीय समितीची बैठक होवून हा विषय लवकरच मार्गी लागणार असल्याचेही जिल्हाधिकारी म्हणले.

गेल्या काही वर्षांपासून सोलापुरात आयटी पार्क सुरु करण्याची वारंवार मागणी होत होती. मागील तीन महिन्यांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आयटी पार्कसाठी जागेचा शोध घेऊन प्रस्ताव पाठविण्याचा आदेश जिल्हा प्रशासनाला दिला होता. त्यानुसार हिरज, कुंभारी, जुनी मिल, होटगी येथील जागेची पाहणी करण्यात आली. यात होटगी येथील जागा निश्चित करण्यात आली आहे.

होटगी येथे जलसंपदा विभागाच्या मालकीची ५० एकर जागा ही लॉजिस्टिक पार्कसाठी देण्यात आली असून, आता तीच जागा आयटी पार्कसाठी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाकडे सुपूर्द करण्यात आली आहे. जागेसाठी सुमारे साडेतीन कोटी रुपये जलसंपदा विभागाला एमआयडीसी विभागाकडून दिले जाणार आहे.

अतंर्गत रस्ते, दिवाबत्ती, पाणी आदी मुलभूत सुविधांसाठी सुमारे ३७ ते ३८ कोटी रुपये लागणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

### इमारत बांधकामाला नाही येणार अडथळा

होटगी रोडवरील विमानतळावरुन उडणाऱ्या विमानसेवेच्या फनेलमध्ये प्रस्तावित आयटी पार्क इमारतीचा समावेश होत नाही. ५० मीटर उंचीपर्यंत बांधकाम करता येते. याबाबत होटगी रोडवरील विमानतळ प्रशासनाचा अभिप्राय घेण्यात आला आहे. तसेच होटगी येथील प्रस्तावित आयटी पार्क जागेच्या ५० एकरावर सुमारे ४० ते ४५ हजार जण बसून काम करतील इतकी क्षमता असल्याचेही आशीर्वाद यांनी सांगितले. तसेच पुण्याच्या हिंजवडीपेक्षा अर्ध्या किंमतीने स्वस्तात होटगी येथे जागा उपलब्ध होणार आहे.

### सिध्देश्वर कारखान्याच्या झेडएलडीमुळे शून्य वास

होटगी रोडवरील सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याचा सध्या २० केपीएलडी क्षमतेचा डिस्टीलरी प्रकल्प असून, त्यांचा हा प्रकल्प येत्या वर्षभरात १०० केपीएलडी क्षमतेचा होणार आहे. यात झीरो लिक्वीड डिस्चार्ज (झेएलडी) तंत्राचा वापर केल्याने मळीचा वास हा शुन्यावर येणार आहे. याबाबत कारखान्याचे चेअरमन धर्मराज काडादी यांनी याबाबतची माहिती भेटून सादर केली असल्याचेही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले.

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार त्रिभाषेत समन्वय असावा : वाघमारे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ नोव्हेंबर-**



सोलापूरमधील नियोजन भवन येथे डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखालील त्रिभाषा धोरण निश्चिती समितीच्या जनसंवाद कार्यक्रमात या धोरणाविषयी मुद्देसूद विश्लेषण मांडताना जनार्दन वाघमारे यांनी मराठी भाषा ही आपली संस्कृती टिकवून ठेवणारी भाषा असून त्याची अभिजात दर्जा टिकवून ठेवण्यासाठी ती सक्तीची असावी असे सांगितले.

त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या अध्ययन - अध्यापन प्रक्रियेत मुलांच्या शारीरिक, मानसिक व बौद्धिक क्षमतेचा विचार करून इतर भाषा वृद्धिंगत करावे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०20 नुसार निश्चित केलेल्या अभ्यासक्रम आराखड्यात त्रिभाषेचा समन्वय साधता आले पाहिजे त्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मार्ग सुखकर होईल.

## रविकांत खमितकर यांना पीएच.डी.पदवी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**



वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी विभागातील सहायक प्राध्यापक डॉ. रविकांत सुभाष खमितकर यांना डिझाईन अँड परफॉर्मन्स इव्हॅल्यूएशन ऑफ मशीन लर्निंग बेस्ड अॅप्रोचेस फॉर हार्डवेअर ट्रोजन डिटेक्शन इन FPG बेस्ड सिस्टम ऑन चिप या विषयावर केलेल्या संशोधनासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ येथून पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. या यशाबद्दल वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी यांच्यासह समस्त विश्वस्तांनी आणि पीएच.डी. मार्गदर्शक डॉ. आर.आर. दुबे, इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख डॉ. एस. आर. गेंगजे, प्राचार्य डॉ. व्ही. ए. आठवले यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## सोलापुरात १५ व १६ डिसेंबरला विज्ञान प्रदर्शन

### 'आत्मनिर्भर भारत आणि विकास' संकल्पनेवर आधारित प्रकल्पांचे सादरीकरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

विगु.शिवदारे जन्मशताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने, मराठी विज्ञान परिषद, सोलापूर विभाग आणि युनिक इंग्लिश मिडियम स्कूल जुळे सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने उच्च प्राथमिक ते महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसीय भव्य विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. हे प्रदर्शन १५ व १६ डिसेंबर रोजी युनिक इंग्लिश मिडियम स्कूल, शिवदारे कॉलेज प्रांगण, जुळे सोलापूर येथे सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत सर्वांसाठी खुले राहील.

हे प्रदर्शन केवळ शालेय विद्यार्थ्यांसाठीच नव्हे, तर महाविद्यालयीन, अभियांत्रिकी, कृषी आणि वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तसेच सर्वसामान्य विज्ञानप्रेमी नागरिकांसाठीही 'खुला गट' या स्वरूपात उपलब्ध आहे. प्रदर्शनात प्रकल्पांचे मूल्यमापन गटानुसार केले जाईल आणि विजेत्यांना रोख रक्कम व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात येईल. गट क्रमांक इयत्ता/स्तर प्रथम पारितोषिक (रोख) पहिला गट इयत्ता ५ वी ते ७ वी १०००/-दुसरा गट इयत्ता ८ वी ते १० वी १०००/-तिसरा गट इयत्ता ११ वी ते १२ वी १०००/- चौथा गट महाविद्यालयीन/अभियांत्रिकी/कृषी/फार्मसी अधिक रक्कमेचे अधिक माहितीसाठी संपर्क साधावा, पाचवा गट विज्ञानप्रेमींसाठी खुला गट अधिक रक्कमेचे अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.

प्रत्येक गटासाठी द्वितीय पारितोषिक ८००/- आणि तृतीय पारितोषिक ५००/- तसेच सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल. याशिवाय, सर्वोत्कृष्ट नवकल्पना यासाठी एका विशेष प्रकल्पाची निवड करण्यात येणार आहे.



## संविधान बचाव मोर्चात समता सैनिक दल सहभागी होणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

संविधान संविधान बचाव समिती सोलापूर आयोजित २६ नोव्हेंबर रोजीच्या महामोर्चात समता सैनिक दल शहर जिल्हा सोलापूर सक्रिय सहभागी होणार असल्याची माहिती समता सैनिक दलाचे जेष्ठ सल्लागार अण्णासाहेब भालशंकर यांनी समता सैनिक दलाच्या सभेत दिली.

सोलापूर महानगरपालिकेच्या हिरवळीवर संपन्न झालेल्या या सभेच्या अध्यक्षस्थानी समता सैनिक दलाच्या जीओसी सुमित्रा केरू जाधव या होत्या. या सभेत समता सैनिक दलाचे सैनिक पांढऱ्या शुभ्र गणवेशांमध्ये उपस्थित राहणार असल्याचे जिओसी सुमित्रा जाधव म्हणाल्या.

या सभेला संविधान बचाव समिती महामोर्चाचे निमंत्रक ज्येष्ठ कामगार नेते अशोक जानराव, यशवंत फडतरे आदींनी संबोधित केले.

यावेळी दलाचे महासचिव अनिल जागझाप, मुकुंद चंदनशिवे, महामोर्चाचे निमंत्रक राजा सोनकांबळे, सिद्धार्थ जाधव, फारुक शेख, वास्तुविशारद राजरत्न फडतरे, विठ्ठल थोरे, सुचित्रा थोरे, रणदिवे, अरुण गायकवाड, सुनीता गायकवाड, कुमार चंनोपागोलो, विनोद जाधव, प्रीपोवेल जाधव, कुणाल जानराव, माजी स्थायी सभापती मधुकर आठवले, भारतीय बौद्ध महासभेचे दीपक आठवले, भीमशक्ती संघटनेचे राजा रणदिवे उपस्थित होते.

प्रास्ताविक महासचिव अनिल जगझाप यांनी केले तर विनोद जाधव यांनी आभार मानले.

## मुरूमच्या कृष्णवेणी लिमये यांची एसबीआयमध्ये अधिकारी म्हणून निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**



येथील भीम नगर मधील कृष्णवेणी विश्वभूषण लिमये यांची स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये सर्कल बेस ऑफिसर वर्ग १ अधिकारीपदी निवड झाली आहे. कृष्णवेणी विश्वभूषण लिमये यांनी हे यश विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांना अर्पण केले आहे.

कृष्णवेणी लिमये यांचे प्राथमिक, माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षण हे कर्नाटक राज्यातील कलबुर्गी या ठिकाणी झाले आहे. एम. कॉमचे शिक्षण त्यांनी गुलबर्गा विद्यापीठ,कलबुर्गी मधून प्राप्त केले आहे. सध्या त्या अक्कलकोट येथील आयसीआयसीआय बँकेत डिप्युटी मॅनेजर या पदावर कार्यरत आहेत. आयबीपीएस मार्फत घेण्यात आलेल्या मुख्य परीक्षा आणि मुलाखत यशस्वीरित्या दिल्या नंतर कृष्णवेली निवड यांची निवड झाली आहे. एक महिन्याच्या ट्रेनिंगनंतर त्यांना पोस्टिंग दिली जाणार आहे. पत्रकार विश्वभूषण लिमये यांच्या त्या पत्नी आहेत.

## तिरुपतीच्या श्री पद्मावती देवी ब्रह्मोत्सवात रंगला सोलापूरचा वारकरी दिंडी सोहळा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

तिरुपती श्री पद्मावती देवी ब्रह्मोत्सवात प्रथमच सोलापुरातील श्री संत ज्ञानेश्वर महाराज वारकरी सांप्रदायिक मृदंग वादन शिक्षण संस्था व श्री सिद्धारूढ सांस्कृतिक सेवा भजनी मंडळ यांचा रथासमोर वारकरी दिंडी सोहळा रंगला होता.

अखिल भाविक वारकरी मंडळ प्रदेश अध्यक्ष व उत्कृष्ट मृदंग वादक हभप ज्योतीराम महाराज चांगभले व सोलापुरातील सुप्रसिद्ध गायक हभप लक्ष्मण महाराज देविदास यांच्या मार्गदर्शनाखाली या दिंडी सोहळ्याचे नियोजन केले होते. महाराष्ट्र ही संताची भूमी आहे व सोलापूर जिल्ह्यात भगवान श्री पांडुरंग परमात्म्याचे मंदिर आहे म्हणून सोलापुरातील या मंडळाला मान मिळाला. यामध्ये वारकरी दिंडीमध्ये वारकरी पाऊल फुगडी काटवट असे विविध वारकरी खेळ सादर करून सांस्कृतिक व पारंपारिक वारकरी खेळ ची परंपरा जोपासली हभप लक्ष्मण महाराज देविदास यांनी तेलगू गीत गाऊन आपली सेवा केली. कार्यक्रमासाठी माजी महापौर जनार्दन कारमपुरी यांचे सहकार्य लाभले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनुराधा देविदास धीरज देविदास, राकेश देविदास, प्रणिती चांगभले, कौस्तुभ चांगभले, वर्षाराणी चांगभले, अजय मोरे, कुमार गायकवाड, सोमनाथ कोरे, धनाजी लोहार, शरयू जगताप, ओम माशाळ, वैष्णवी माशाळ, शहाबाई जगताप, यशांक सुरवसे, दक्ष वारे, गणेश शेटे, श्रेयस सुरवसे, कृष्णा वाघमोडे, आदित्य इंगळे, वेदांत ठाकर, समर्थ जगताप हे दिंडी सोहळ्यासाठी उपस्थित होते.

## माजी विद्यार्थी संघ आजची गरज



**जिल्हा परिषदेतून**
**अमोगसिध्द मुंजे**
मो. 9423535294

शाळा ही केवळ शिक्षणाची जागा नसून व्यक्तीमत्व विकासाचे केंद्र असते. शाळेतून मिळालेल्या ज्ञान, संस्कार व मूल्यांवरच पुढील जीवनप्रवास उभा राहतो. शाळेतूनच शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी प्रशासन, समाजकारण, राजकारण, संशोधन, व्यापार, शेती, उद्योग क्षेत्रात नेत्रदिपक प्रगती करताना दिसतात. या शाळेचे अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रात नामवंत झालेले आहेत. सध्या विविध पदावर कार्यरत आहेत. त्यांच्या यशात त्यांच्या दिवंगत व सध्या असणाऱ्या गुरुजनांचा महत्वाचा व मोलाचा वाटा आहे. शाळेकडून झालेल्या घडणीची जाणीव ठेऊन माजी विद्यार्थी शाळेबद्दल ऋण व्यक्त करण्यासाठी शाळेच्या विकासात मोलाचे योगदान देतात. माजी विद्यार्थी संघाकडून शाळेसाठी भौतिक सुविधा व पूरक सुविधा, शैक्षणिक मार्गदर्शन, सामाजिक व भावनिक बांधिलकी, शाळेचे ऋणानुबंध विकसित करणे, सध्या शाळेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना प्रेरणा, सुविधा देणे अभिप्रेत आहे.

माणसावर अनेक प्रकारचे ऋण असतात. समाजऋण हे त्यापैकी एक आहे. समाजासाठी काहीतरी देणे लागतो. ही भावना जपूया. तन-मन-धनाने मदत करून समाजऋणातून मुक्त होऊ या. ही अपेक्षा एकमेकांच्या सहकार्याने, समुदायाने सहज शक्य आहे. आपल्याजवळ मुठभर असेल तर इतरांना चिमुटभर द्यायला काय हरकत आहे? गरजवंतांचे अश्रू पुसण्याचे काम दिलासा देणारे आणि आधार देणारे आहे. मदत करणारे अनेकजण इच्छुक असतात. अनेकांचे मदतीचे हात पुढे यावे हे सार्वजनिक काम आहे. आपण कधीकधी आपल्याला नको असलेल्या वस्तू बाहेर फेकून देतो, जाळून नष्ट करतो. त्यातील काही चांगल्या वस्तू इतरांना उपयोगी असतात. ग्रामस्थ, पदाधिकारी, माजी विद्यार्थी, अधिकारी, सामाजिक संस्था, उद्योग समुहाचे सामाजिक दायित्व, दानशूर व्यक्ती, माता-पालक, महिला बचत गट, विविध युवक मंडळे अशा अनेक घटकांचे स्वयंस्फुर्त असा प्रतिसाद तन-मन-धनाने मिळाला तर या ज्ञान मंदिराचा कायापालट होऊ शकतो.

बालपणीच सगळं सुख डोळ्यातून पाण्यासारखं ओघळतं चार भिंती हक्काच्या तरी परका झालो मी खिडकीच्या बाहेर आनंद शोधत बसलो, तोवर शेवटचा पेपर आला. मी गेलो शाळा सोडून, माझ्या वर्गातली जागा तिथेच राहिली बाहेर जाताना कळत नव्हतं आता येथे परत येणे नाही, आयुष्याच्या पानांवर मित्रांनो शाळेसारखं सुख नाही.

शाळेतून बाहेर पडल्यावर मिटला सारा गर्व. एक हाती लॅपटॉप अन् टॅब बॉस कामाचे मेल पाठवतो दंग झालेल्या या जीवनात मग, शाळेची जागा पुन्हा आठवते. पण जेव्हा कळायला पाहिजे होते, अफाट रस्त्यावर गाडी सुसाट असते भली मोठी गाडी पण, सोबत त्यात कोणीच नसते. चार चाकीच्या गाडीला मात्र, मित्रासोबत डबल सीट फिरणाऱ्या सायकलीची सर येणार नाही अन् आयुष्याच्या पानांवर मित्रांनो शाळेसारखं सुख नाही.

आता दिवसाला आणतो मी, खूप सारे पैसे कमवून. पैसा-पैसा म्हणत म्हणत, जातो साऱ्या गर्दीत हरवून. त्या भल्या-मोठ्या रकमेला, आईच्या एक रुपयाची सर नाही. आयुष्याच्या पानावर मित्रांनो, शाळेसारखं सुख नाही. कैक हॉटेल आहे आता दुपारचे जेवण करण्यासाठी वेगवेगळ्या डिश अन वेगवेगळे पदार्थ खाण्यासाठी, त्या सगळ्या जेवणाला मात्र, मित्रांसोबत शाळेत खाल्लेल्या, डब्यातील जेवणाची चव नाही अन आयुष्याच्या पानावर मित्रांनो, शाळेसारखं सुख नाही. शाळेसारखं सुख नाही.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


## महत्वाचे...



### सोलापूर ते गुड्डापूर पदयात्रा मार्गस्थ; वीरशैव व्हिजनतर्फे मोफत औषधोपचार

**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

सोलापूर ते गुड्डापूर पदयात्रेतील पदयात्रेकरुंना सलग ६ व्या वर्षीही वीरशैव व्हिजनतर्फे मोफत औषधे व प्रथमोपचार साहित्य देण्यात आले. संस्थापक श्री वेदमूर्ती राजशेखर स्वामी (आहेरवाडी) यांच्या नेतृत्वाखाली मागील ५० वर्षापासून सोलापूर ते गुड्डापूर पदयात्रा निघते. त्याचे उत्तराधिकारी श्री श्रीशैल स्वामी यांच्या सानिध्यात ही पदयात्रा गुड्डापूरकडे मार्गस्थ झाली. या पदयात्रेत सुमारे २०० भाविक सहभागी होतात. टाकळी येथे मल्लिनाथ बिराजदार यांच्या घरी गेल्या २० वर्षापासून पदयात्रेकरुंना स्नान, अल्पोपहार व चहापान करण्यात येते. पायी चालून चालून पदयात्रेकरुंना पायदुखी, अंगदुखी, जखमा आणि विविध आजार उद्भवतात. वाटेवर वैद्यकीय सुविधा मिळतीलच याची शाश्वती नसते. त्यामुळे त्यांना वीरशैव व्हिजनतर्फे उत्सव समिती अध्यक्ष विजयकुमार बिराजदार यांच्या हस्ते मोफत औषधे, वेदनाशामक गोळ्या व प्रथमोपचार साहित्य सुपूर्द करण्यात आले. यासाठी डॉ. संजय कळके यांचे सहकार्य लाभले. या पदयात्रेत यात्राप्रमुख श्रीशैल स्वामी, मल्लिनाथ बिराजदार (टाकळी), विजयकुमार बिराजदार, सुभाष इंडी, श्रीशैल आळगी, यशवंत बिराजदार, सोमनाथ परशेट्टी, गौरीशंकर तांडुरे, राजकुमार गाढवे, शिवानंद गुब्याड, आप्पासाहेब लिगाडे, महेश स्वामी, सोमनाथ बिराजदार, गंगाधर झुरळे यांचा सहभाग आहे.

### सोलापुरात उद्या संविधान वाचन कार्यक्रम

**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

संविधान दिनानिमित्त संविधान वाचन कार्यक्रम बुधवार २६ नोव्हेंबर रोजी रोजी सकाळी ११ वाजता भारतरत्न महामानव बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर सामुदायिक संविधान वाचनाचे कार्यक्रम जनविकास क्रांती सेनेच्या वतीने केले आहे. या सामुदायिक संविधान कार्यक्रम जनविकास क्रांती सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष अंगद जाधव यांच्या नेतृत्वाखाली होणार आहे. तरी सर्व नागरिक बंधू-भगिनी, महामानव भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी आणि संविधान प्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन जनविकास क्रांतिसेनेचे प्रदेश उपाध्यक्ष अंगद जाधव व कोषाध्यक्ष विठ्ठल कुराडकर यांनी केले आहे.

# जुने नेते देखील कुर्डुवाडी जंक्शनवरुनच मुंबईचा प्रवास करायचे

## राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. २४ नोव्हेंबर-**

कुर्डुवाडी सारखं शहर हे जिल्ह्यातील महत्वाचे शहर म्हणून गणले जाते. रेल्वेचे उत्पादन करणारे कारखाने आहेत. जुने नेते देखील कुर्डुवाडीच्या जंक्शनवरुनच मुंबईचा प्रवास करायचे. उपमुख्यमंत्री अजित पवार हे जलसंपदा मंत्री असताना येथील सिंचनाच्या कामांना भरघोस निधी दिला, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे यांनी केले.

कुर्डुवाडी नगरपालिका निवडणुकीतील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते. व्यासपिठावर महिला आयोगाच्या राज्य अध्यक्षा रुपाली चाकणकर, माजी आमदार संजयमामा शिंदे, नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सुरेखा गोरे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्व उमेदवार, नेते, पदाधिकारी व माजी नगरसेवक उपस्थित होते.



देशातील सर्वाधिक साखर कारखाने सोलापूर जिल्ह्यात आहेत. डाळिंब, केळी यांसारख्या फळबागाचे उत्पादनही या परिसरात मोठ्या प्रमाणात घेतले जाते. एका विचाराच्या लोकांकडे येथील सत्ता दीर्घकाळ राहिली. त्यांचा दूरगामी विकासाचा संबंध नाही. भावनिक आवाहन करुन सत्तेवर बसलेली माणसं विकास करू शकत नाहीत, असेही ते म्हणाले.

उपमुख्यमंत्री अजित पवार सत्तेत असल्याने माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्या नेतृत्वाखाली काही हजार कोटी रुपयांचा विकासनिधी या भागासाठी आणला गेला. येथील अर्धवट राहिलेली भुयारी गटारीची कामे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून पूर्ण करण्याची जबाबदारी ही माझी आहे, असे सांगायलाही ते विसरले नाहीत.

### शाहू-फुले-आंबेडकर-शिव या सामाजिक चौकटीवर राजकारण

महायुतीच्या माध्यमातूनच संविधान दिन साजरा करण्यास सुरुवात झाली. बहुजनांच्या विकासासाठी एनडीएचा घटक पक्ष म्हणून केंद्र व राज्यातील सत्तेमध्ये सामील झालेलो आहोत. शाहू-फुले-आंबेडकर-शिव या सामाजिक चौकटीवर आधारित आमचे राजकारण सुरु आहे, असेही खा.सुनील तटकरे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

# तुर्कपिंपरीच्या शिंदे कारखान्याची ७६ लाख रुपयांची फसवणूक

## पाच जणांच्या विरोधात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि नोव्हेंबर**

तुर्कपिंपरी (ता.बार्शी) येथील बबनराव शिंदे शुगर ॲन्ड अलाईड इंडस्ट्रीज कारखान्याची २ हजार ३० पोते साखर घेऊन ७६ लाख ६०० रुपयांची फसवणूक करण्यात आली. ही घटना १७ डिसेंबर २०२४ ते २३ नोव्हेंबर २०२५ यादरम्यान घडली. कारखान्याचे रोखपाल अमोल मोहिते यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार बार्शी तालुका पोलिस ठाण्यात पाच जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आली.

रफिक बाबा शेख (रा. कुंभारगाव, ता.करमाळा), मिनोज बाबा शेख (रा.गणपती विसर्जन घाट, बालेवाडी, बाणेर, पुणे), गजाला रफिक शेख (रा.ग्रॅन्डुअर पार्क, फ्लॅट बी १६०३, बालेवाडी, पुणे), राजीव नेताजी मोरे (रा.बिरणवाडी, ता.तासगाव, जि.सांगली), ओंकार पवार (रा. तासगाव, जि.सांगली) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. दरम्यान, अद्याप यापैकी कोणालाही अटक करण्यात आली नाही.

नाथबाबा ग्रो ट्रेड हब प्रा.लि.चे चालक रफिक शेख, मिनोज शेख, गजाला शेख व फर्मचे काम काज पाहणारे राजीव मोरे, ओंकार पवार यांनी संगनमत करुन बबनराव शिंदे शुगर ॲन्ड अलाईड इंडस्ट्रीज या कारखान्याचा विश्वास संपादन केला. कारखान्याशी संबंधित असलेल्या कृष्णा एंटरप्राइजेसची कारखान्याकडे ४० लाख ६० हजार रुपये व लक्ष्य ट्रेड लिंक या फर्मच्या नावे जमा असलेली ३५ लाख ४० हजार रुपये रक्कम नाथबाबा ग्रो ट्रेड हब प्रा.लि.च्या खात्यावर जमा करण्यासाठी बनावट मेल आयडी तयार केला. आयडीचा वापर करुन कारखान्यास ७६ लाख ६०० रुपये रक्कम नाथबाबा ग्रो ट्रेड हब प्रा.लि.फर्मच्या खात्यावर वर्ग करण्यास पत्र पाठवून त्याद्वारे २ हजार ३० पोते साखर घेऊन कारखान्याची फसवणूक केली, असे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस उपअधीक्षक अशोक सायकर यांच्या आदेशानुसार वैराग ठाण्याचे पोलिस निरीक्षक कुंदन गावडे हे तपास करीत आहेत.

# पंढरपूर येथील श्री रामचंद्र भगवान संस्थानची जागा विकू नये

## श्री रामबाग पंढरपूर बचाव समितीची आज सोलापुरात सभा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ नोव्हेंबर-**

पंढरपूर येथील श्री रामबाग मंदिर तथा श्री रामचंद्रजी भगवान संस्थानच्या विद्यमान संचालकांनी मंदिर विकास करण्याच्या नावाखाली करोडो रुपयांच्या जमिनी विक्रीस काढल्या आहेत. धर्मासाठी लाखो रुपये देण्यासाठी दानशूर व्यक्ती तयार असताना अशा पद्धतीने जमीन विक्री करणे चुकीचे आहे. जमीन विक्री करू नये या विषयासंदर्भात श्री रामबाग पंढरपूर बचाव समितीची मंगळवार दि. २५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता सोलापुरातील श्री रामानुज कोट येथे जाहीर सभा होणार आहे, अशी माहिती सतीश मालू यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या सभेस जगद्गुरु श्री विद्या भास्कर आणि जगद्गुरु श्री राघवाचार्य अयोध्या यांची मंगल उपस्थिती राहणार आहे. या सभेमध्ये श्री रामचंद्रजी भगवान संस्थानची जागा विकू नये. संस्थांच्या घटनेमध्ये दुरुस्ती करू नये. महंतांचा आदर करावा यासह इतर विषयांवर चर्चा होणार आहे. ४४ वर्षे रिक्त असलेल्या पीठाधीश पदावर श्रीमद जगद्गुरु डॉ. श्री राघवाचार्य स्वामीजी (आयोध्या) हे विराजमान झाले आहेत. दरम्यान विद्यमान संचालकांनी मंदिर विकासासाठी करोडो रुपयांच्या जमिनी विक्रीस काढले आहेत. या जमिनीतून अनेक प्रकारचे उत्पन्न घेणे शक्य आहे. तरीही ही जमीन विकण्याचा निर्णय घेतला आहे. तो चुकीचा आहे. या जमीन विक्रीसाठी लिलाव परवानगी कशी मिळवली ? हे मोठे गौडबंगाल आहे, असा आरोप सतीश मालू यांनी केला आहे.

मंदिर व ट्रस्ट हे कुणाच्या खासगी मालकीचे नाही तर ती प्रभू श्रीरामचंद्राची संपत्ती आहे, अशी समाजाची भूमिका आहे. या ट्रस्ट व्यवस्थापनात पारदर्शकता, मंदिराचे संरक्षण आणि श्रीराम बागचे पुनर्वैभव साध्य करणे हेच समाजाचे उद्दिष्ट आहे, असेही यावेळी सतीश मालू यांनी स्पष्ट केले. या पत्रकार परिषदेस जुगल करवा, प्रवीण भुतडा, सुरज मणियार आदी उपस्थित होते.




# तणाव व्यवस्थापन हे एक आवश्यक कौशल्य

## ए. जी. पाटील अभियांत्रिकीमध्ये तणाव व्यवस्थापनावर कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ नोव्हेंबर-**

सध्याच्या डिजिटल आणि स्पर्धेच्या युगात विद्यार्थी दशा ही इतकं सोपी राहिलेली नाही. त्यातून इंजीनियरिंगचा अभ्यासक्रम हा कमी वेळात जास्तीत जास्त उपक्रम असणारा अभ्यासक्रम आहे. त्यामुळे बहुतांश विद्यार्थी हे तणावाखाली वावरतात व त्याचा परिणाम त्यांच्या अभ्यासावर, कार्यक्षमतेवर व आरोग्यावर दिसून येतो. त्यामुळे तणाव व्यवस्थापन हे सद्य परिस्थितीत एक आवश्यक कौशल्य बनले आहे, असे प्रतिपादन आर्ट ऑफ लिविंगचे रघुराज चव्हाण यानी केले.

काही श्वसनाचे तंत्र अभ्यासपूर्वक आत्मसात केले तर तणावाचे व्यवस्थापन करणे सोपे जाते. हाच विचार घेऊन ए.जी. पाटील अभियांत्रिकीच्या संगिनी वुमन्स फोरमने सर्व विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळेत मार्गदर्शन करताना श्री. चव्हाण बोलत होते. दोन तासांच्या या कार्यशाळेत श्री चव्हाण यांनी अतिशय सोपे असे विविध श्वसनाचे तंत्र विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकाद्वारे शिकविले व विद्यार्थ्यांकडून करून घेतले. तसेच फोकस किंवा एकाग्रता वाढविण्यासाठी काही कृती करून घेतल्या. या कार्यशाळेत २२० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यावेळी व्यासपीठावर कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार हे उपस्थित होते. सर्वांगीण विकासासाठी संस्था व अध्यक्ष एस. ए. पाटील व संस्था सचिव शिवानंद पाटील नेहमीच अशा कार्यक्रमांना प्रोत्साहन देत असल्याचे डॉ. चौगुले यांनी सांगितले.

हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी संगिनीच्या प्रा.डी. ए.जव्हेरी, प्रा. एस. के. कोनापुरे प्रा. आर.एस. कटनळळी, प्रा.ए.जी. घाळीमठ यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. एस.एन. कांबळे यांनी केले.

# सद्गुरूंकडून मिळते भगवंतप्राप्तीची ज्ञानदृष्टी

## रत्नप्रभा सहस्रबुद्धे; श्री संत साहित्य सेवा संघातर्फे कै.बाबुराव कामतकर स्मृती प्रवचन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

जन्मोजन्मीची पुण्याई म्हणून आपण सद्गुरूंच्या चरणी येतो. सद् गुरूंकडून मनुष्याला भगवंतप्राप्तीची ज्ञानदृष्टी मिळते, असे प्रतिपादन रत्नप्रभा सहस्रबुद्धे यांनी केले.

श्री संत साहित्य सेवा संघातर्फे कै. बाबुराव कामतकर स्मृती प्रवचन रविवारी सायंकाळी ज्ञानप्रबोधिनीच्या चैतन्य सभागृहात झाले. यावेळी रत्नप्रभा सहस्रबुद्धे यांनी 'सद्गुरूसारिखा असता पाठीराखा' या विषयावर विवेचन केले. प्रारंभी श्री संत साहित्य सेवा संघाच्या विश्वस्त डॉ. माधवी रायते यांनी गुरुस्तवन सादर केले.



रत्नप्रभा सहस्रबुद्धे म्हणाल्या, सद्गुरू प्राप्त होण्यासाठी श्रद्धा असणे आवश्यक आहे. सर्व प्रकारचे संशय दूर करून गुरु आणि आपण एक झाले पाहिजे. सद् गुरूंच्या आज्ञा पालनाने जीवनाचे सोने होते. शिष्याच्या जीवनातील नकारात्मकता घालून गुरु त्याच्यात सकारात्मकता पेरतात. मनुष्याच्या जीवनातील अज्ञान, अहंकार देखील गुरु नाहीसा करतात. आत्मविश्वास वाढवून मनुष्याची ध्येयपूर्ती करवून घेतात. संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वरांनीही आपले सर्व कर्तृत्व गुरु श्री निवृत्तीनाथांच्या चरणी अर्पण केले.

याप्रसंगी रत्नमाला सहस्रबुद्धे यांनी 'विठू माझा लेकुरवाळा', 'देणाऱ्याचे हात हजारो दुबळी माझी झोळी', 'पतीत पावना जानकी जीवना' आदी गीते आणि अभंगही सादर केले. डॉ. अपर्णा कल्याणकर यांनी सूत्रसंचालन केले. सचिव डॉ. गणेश सांगलीकर यांनी परिचय तर विश्वस्त प्रमोद कामतकर यांनी आभार मानले. याप्रसंगी श्री संत साहित्य सेवा संघाचे अध्यक्ष सु.स. देशमुख, कोषाध्यक्ष रमेश विश्वरूपे, सचिव डॉ. गणेश सांगलीकर, सहसचिव विश्वास जतकर, विश्वस्त डॉ. अपर्णा कल्याणकर आदी उपस्थित होते.

### भजनात होतो नादब्रम्ह आणि नामब्रह्माचा संयोग

भजन करणे म्हणजे केवळ टाळ वाजवणे नव्हे. तर भजनामध्ये भगवंताच्या नामस्मरणासह आनंद, योग, प्राणायाम, सकारात्मकता आणि आध्यात्मिक समाधान मिळते. भजनात नादब्रह्म आणि नामब्रह्म यांचा संयोग होतो. या दोन्हीच्या संयोगामुळे परब्रम्ह येतात, असेही रत्नप्रभा सहस्रबुद्धे यांनी याप्रसंगी सांगितले.

# जिल्ह्यातील पाच लाख शेतकऱ्यांच्या खात्यावर ५८४ कोटी जमा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ नोव्हेंबर-**




अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे जिल्ह्यातील बाधित ७ लाख ६४ हजार १७३ शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी ८६७ कोटी ३७ लाख ६३ हजार ८५५ रुपयांची मागणी करण्यात आली. यातील ५ लाख ९२ हजार ८६१ या शेतकऱ्यांसाठी आजतागायत ७२४ कोटी मंजूर झाले आहे. त्यापैकी ४ लाख ८० हजार ७८० शेतकऱ्यांच्या खात्यावर आजतागायत ५८४ कोटी रुपये जमा झाले आहेत. ३६ हजार ६९२ जण अद्याप ई-केवायसीच्या कचाट्यात अडकले आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

ई-केवायसी न केलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा झाले नसल्याने त्यांना बि-बियाणे, खते घेण्यासाठी अडचण येत आहे. शासनाच्या पोर्टलवर ही रक्कम अदा झालेली दिसत आहे. मात्र, ई-केवायसी, फार्मर आयडीमुळे ही रक्कम लटकली आहे. शेतकऱ्यांच्या खात्यावर ही रक्कम जमा करण्याच्या दृष्टीने शिबीरे घेण्यात येत आहेत. ई-केवायसी करताच शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट रक्कम जमा होवू लागली असून, ॲग्रीस्टॅक केलेल्या सर्वच शेतकऱ्यांना थेट मदत मिळत आहे. ही रक्कम मिळविण्यासाठी आता ई-केवायसीचीही गरज नाही.

अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे जिल्ह्यातील विविध भागात झालेल्या शेती, पायाभूत सुविधा व सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी नुकताच केंद्रीय पथकाने सोलापूर जिल्ह्यात दौरा केला आहे.

जिल्हा प्रशासनाच्या वतीने भरविण्यात येत असलेल्या शिबीरांद्वारे याद्या जसजशा अपलोड होत आहेत तसतशा शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसेही पडत राहणार आहेत. हे पैसे दिल्लीतून येत असल्याने सर्व शेतकऱ्यांची टॅली करुनच ते पैसे टाकत असल्याने पैसे मिळण्यास विलंब लागत आहे, असेही त्यांनी सांगितले.

# संविधान बचाव समितीचा सोलापुरात बुधवारी महामोर्चा

## शहर, जिल्ह्यातील सुमारे एक लाख संविधान समर्थक होणार सहभागी


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ नोव्हेंबर-**

संविधान बचाव समितीच्या वतीने बुधवार दि. २६ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चात मुस्लिम, भटके विमुक्त, बौद्ध यांच्यासह बहुजन समाजातील सुमारे एक लाख नागरिक, कार्यकर्ते संविधान समर्थक सहभागी होणार आहेत, अशी माहिती ज्येष्ठ नेते तथा निमंत्रक सुभानजी बनसोडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

बुधवारी सकाळी ११ वाजता संविधान समर्थकांचा हा महामोर्चा न्यू बुधवार पेठ येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथून निघणार आहे. पुढे सम्राट चौक छत्रपती शिवाजी महाराज चौक, नवी वेस पोलीस चौकी मार्गे सरस्वती चौक, चार हुतात्मा पुतळा चौक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे जिल्हाधिकारी कार्यालय पुनम गेट येथे या मोर्चाचा समारोप होणार आहे. या ठिकाणी या मोर्चाचे सभेत रूपांतर होईल. या मोर्चामध्ये बहुजन समाजातील संविधान समर्थक सर्व घटकांचा सहभाग राहणार आहे. सोलापूर शहर जिल्ह्यातील लोक लाखोच्या संख्येने उपस्थिती दर्शविणार आहेत.

राष्ट्रपती, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यांना अपमानास्पद वागणूक दिली जात आहे. देशात वाढलेली बेरोजगारी, विद्यार्थी, शेतकऱ्यांचे, कामगार कष्टकरी, शेतमजुरांचे प्रश्न, सरकारचे शैक्षणिक धोरण, शिष्यवृत्ती, कंत्राटी पद्धत बंद करून सुशिक्षित बेरोजगारांना सरकारी नोकऱ्या देणे, शिक्षणाचे खाजगीकरण थांबवावे, वैज्ञानिक दृष्टिकोनातून मोफत शिक्षण द्यावे, आरएसएस सह सर्व एनजीओची सक्तीने नोंदणी करावी, आरक्षणातील अ - ब- क- ड वर्गीकरण रद्द करावे, एससी, एसटी, ओबीसी यांना क्रिमीलेअर लावू नये, आरएसएस या संघटनेवर बंदी घालावी यासह इतर मागण्यांसाठी हा महामोर्चा काढण्यात येणार आहे, असे निमंत्रक सुभानजी बनसोडे यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस जनार्दन शिंदे, अशोक जानराव, अण्णासाहेब भालशंकर, राजा सोनकांबळे, मिलिंद प्रक्षाळे, रॉकी बंगाळे, अशोक आगावणे, सच्चिदानंद व्हटकर , प्रमिला तूपलवंडे, संध्या काळे , व्ही. डी. गायकवाड यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

### जनविकास क्रांतीसेना संविधान बचाव मोर्चात सामील होणार: विष्णू कारमपुरी



केंद्रातील व राज्यातील सत्ताधारी भाजपा प्रणित महायुती सरकार संविधानामुळेच सत्तेवर येऊन संविधान बदलण्याचा डाव करीत आहेत. अशा संविधान विरोधी सत्ताधाऱ्यांच्या विरोधात, सोलापुरात काढण्यात येणाऱ्या संविधान बचाव मोर्चात जनविकास क्रांतीसेना पक्ष व महाराष्ट्र कामगार सेना सहभागी होणार आहेत. या संविधान बचाव यात्रेत सोलापुरातील बिडी, यंत्रमाग संघटित व असंघटित कामगार बंधू-भगिनी व नागरिकांनी मोठ्या संख्येने या मोर्चात सामील व्हावे असे आवाहन जनविकास क्रांतीसेनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णू कारमपुरी व महाराष्ट्र कामगार सेनेचे सरचिटणीस श्रीनिवास चिलवेरी यांनी केले.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## श्री शावरसिध्द मंदिरास रामप्पा चिवडशेट्टींकडून ५१ हजारांची देणगी

**वळसंग, दि.२४ नोव्हेंबर-**

आचेगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथे श्री शावरसिध्द मंदिराचे बांधकाम सुरू असून मंदिराच्या उभारणीसाठी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रामप्पा चिवडशेट्टी यांनी ५१ हजार रूपयांची देणगी दिली आहे.



यावेळी भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष महेश बिराजदार, इंद्रजीत लांडगे, शावरसिद्ध जळगोडर, दत्तात्रय पाटील, सरपंच विश्रांती पाटील, उपसरपंच रफिक मुल्ला, शावरसिद्ध पाटील, मेहबूब पटेल, चंदू शिलेणी, रायपा पुजारी, अशोक पाटील, कुलदीप पाटील, गेनसिद्ध चुंगीवडियर, अमोघसिद्ध चुंगीवडियर, बनसिद्ध चुंगीवडियर, मलकारी कांबळे, राहुल शिंदे, दिलीप विधाते, सिलिसिद्ध बहिर्जे, प्रशांत क्षीरसागर, बिलेनी करिवाडीयार, काशण्णा मेलीवाडीयार, गिरीश बाळगे, कुलदीप खताळ उपस्थित होते.



# पंढरपुरात उमेदवारांतील नातेसंबंध, ऋणानुबंध ठरतोय चर्चेचा विषय

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२४ नोव्हेंबर -**

पंढरपूर नगरपरिषदेच्या निवडणूकीत भाजपा, नँशलिस्ट काँग्रेस पक्षांसह स्थानिक पातळीवरील तिर्थक्षेत्र विकास आघाडी आणि श्री विठ्ठल परिवर्तन आघाडी एकमेकांच्या विरोधात लढत देत आहेत. या सर्वांन कडून आपआपल्या उमेदवारांच्या प्रचारांचा श्रीगणेशा करण्यात आलेला आहे. यावेळी प्रत्येकांकडून आपआपल्या परिने शक्तीप्रदर्शन देखील केले गेले आहे. प्रचारातील एकमेकांवरील केलेल्या टिकाटिप्पणीसह उमेदवारांकडून राबिवण्यात येत असलेल्या प्रचारातील वेगवेगळ्या फंड्यामुळे यंदाची पंढरपूर नगरपालिका निवडणूक वैशिष्ठपुर्ण ठरत आहे.

यंदाच्या या निवडणूकीचे दुसरे एक वैशिष्ठ म्हणजे एकाच घरातील सासु-सुन, नवरा-बायको, भाऊ- बहिण तसेच आई-मुलगा अशी रक्तांच्या नात्यातील मंडळींच निवडणूकीच्या आखाड्यात एकाच पक्षाच्या बाजुने किंवा एकमेकांच्या विरोधात उमेदवार म्हणून देखील निवडणूक लढविताना दिसत आहेत.



यंदा पंढरपूर नगरपरिषदेचे नगराध्यक्षपद सर्वसाधारण महिलेसाठी आरक्षित झालेले आहे. त्यामुळे भाजपाकडून नगराध्यक्षपदासाठी शामल शिरसट (पापरकर ) या निवडणूकीतील उमेदवार आहेत. तर त्याची सुन प्रतिक्षा विक्रम शिरसट या भाजपाकडूनच प्रभाग क्रमांक ९ (अ) मधुन नगरसेवकपदासाठी निवडणूकीच्या रिंगणात दोन हात करीत आहेत. या बरोबरच प्रतिक्षा शिरसट यांचा चुलतभाऊ संदीप पांडुरंग अभंगराव हे प्रभाग क्रमांक ९ (ब) मधुन भाजपाचेच नगरसेवकपदाचे उमेदवार आहेत.

येथील प्रभाग क्रमांक १५ (अ) मधुन तिर्थक्षेत्र विकास आघाडीकडून आदित्य चंद्रकलेश्वर फत्तेपूरकर हे स्वत: नगरसेवकपदाची निवडणूक लढवित आहेत. तर त्यांच्या पत्नी स्मीता आदित्य फत्तेपूरकर या प्रभाग क्रमांक १५ (ब) मधून नगरसेवकपदासाठी निवडणूकीच्या रिंगणात उभ्या असलेल्या दिसत आहेत. येथील प्रभाग क्रमांक २ (ब) मधुन आदिती अमित डोंबे या श्री विठ्ठल परिवर्तन विकास आघाडीकडून नगरसेवकपदासाठी निवडणूक लढवित आहेत. तर त्यांच्या विरोधात भाजपाकडून त्यांच्या चुलतजाऊबाई असलेल्या श्वेता निलराज डोंबे या निवडणूकीच्या मैदानात उतरल्या आहेत.या शिवाय येथील प्रभाग क्रमांक ३ (अ) मधुन तिर्थक्षेत्र विकास आघाडीकडून माजी नगराध्यक्षा राजश्री प्रताप गंगेकर या पुन्हा एकदा नगरसेवकपदासाठी आपले नशीब आजमावीत आहेत. तर त्यांचे पुत्र अक्षय प्रताप गंगेकर हे तिर्थक्षेत्र विकास आघाडीकडूनच नगरसेवकपदासाठी प्रभाग क्रमांक ३ (ब) चा गड राखण्याचा प्रयत्न करीत आहेत.

एकंदरीतच वेगवेगळ्या राष्ट्रीय पक्षाबरोंबरच स्थानिक आघाड्याकडून निवडणूकीच्या रिंगणात असलेल्या या नात्यागोत्यातील उमेदवार मंडळींच्या लढतींकडे संपुर्ण पंढरपूरकरांचे लक्ष लागलेले आहे. या नात्यागोत्यातील उमेदवारांपैकी कोणा,कोणाचा पंढरपूर नगरपरिषदे मध्ये नगराध्यक्ष तसेच नगरसेवक म्हणून प्रवेश होतो हे निवडणूकीच्या निकाला नंतरच अर्थात ३ डिसेंबर नंतर स्पष्ट होणार आहे.



# अकलूज नगरपंचायत निवडणुकीत राष्ट्रवादी (शप)ची प्रचारात आघाडी

### शितलदेवी मोहिते-पाटील यांचा होम-टू-होम प्रचार

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२४ नोव्हेंबर-**

अकलूज नगर पंचायत निवडणूक रिंगणात आता रंगत भरत आली असून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद चंद्र पवार व मित्रपक्ष शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने होम टू होम प्रचार चालू केला आहे. खासदार पत्नी शितलदेवी धैर्यशील मोहिते पाटील यांनी प्रभाग क्रमांक आठ सकाळपासून पिंजून काढला.

प्रत्येक घर ते घर जाऊन मोहिते पाटील गटाची व पक्षाची भूमिका समजावून सांगत नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या तसेच पण आपली भूमिका काय असेल याबद्दलही सविस्तर चर्चा केली अकलूज हा एक परिवार असून नेहमीच मोहिते पाटील घराण्याच्या पाठीशी उभा असल्याने विजय हा आमचा निश्चित आहे असे यावेळी सांगितले. राजश्री गुळवे यांच्या घरी लिंगायत समाजातील व परिसरातील सर्व महिलांनी एकमुखी पाठिंबा दिला यावेळी सहकार नगर मधील असंख्य महिला तसेच लिंगायत समाजातील महिला उपस्थित होते. शीतलदेवी यांच्या सोबत प्रभाग क्रमांक आठ चे अ गट उमेदवार उज्वला रमणलाल अडाणे ब गट योगेश प्रद्युम्न गांधी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार रेश्मा अडगळे यांनी आपली भूमिका मांडली यावेळी माझी पंचायत समिती सदस्य फातिमा पाटवाला, मोनाली गायकवाड, उज्वला गुळवे, वर्षा गांधी उपस्थितीत होत्या.

# केळी दरातील घसरणीमुळे पिलीवचे शेतकरी वैतागले?

### ऊस लागवडीकडे पुन्हा वाढला कल

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.२४ नोव्हेंबर-**

माळशिरस तालुक्यासह पिलीव परिसरात गेल्या काही दिवसांपासून शेतकऱ्यांचा केळी लागवडीकडे प्रचंड कल वाढला होता. कारण सहजासहजी बाजारपेठ उपलब्ध म्हणजेच व्यापारी स्वत. शेतात येऊन केळी नेऊ लागलेत. यामुळेच शेतकरी मोठ्या प्रमाणात केळीचे उत्पन्न घेऊ लागले. तसेच दर चांगला मिळु लागला. चांगल्या प्रतीच्या केळीला चांगलाच दर मिळु लागल्याने शेतकऱ्यांना चांगलाच आर्थिक फायदा होऊ लागला.

> गेल्या काही दिवसांपासून केळीच्या दरातील प्रचंड घसरणी मुळे केलेला खर्चही निघेना. यामुळे मी केळी काढून ऊसाची लागवड केली आहे.
>
> **-विजय मदने-पाटील,**
> शेतकरी, कुसमोड.

निर्यातक्षम केळीला अगदी चाळीस रुपयांच्या आसपास दर काही दिवसांपुर्वी मिळत होता तोच दर सध्या दहा पंधरा रुपयांपर्यंत खाली आला. तर खोडवा पिकाला दर पाच रुपयांपर्यंत खाली आला. अलीकडील केळीच्या दरातील प्रचंड घसरणीमुळे शेतकऱ्यांनी अक्षरशः केलेला खर्चही निघेना. एवढी विदारक परिस्थिती शेतकऱ्यांवर आल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी केळी पीक काढून टाकले आहे.

शेतकऱ्यांनी केळी पिक काढल्यावर पुन्हा आपला मोर्चा ऊस पिकाकडे वळविला आहे. केळीच्या तुलनेत ऊसाला खर्च कमी येत आहे तसेच रोगराई कमी आहे. ऊसाला तीन हजार रुपये टनापर्यंत दर मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांनी पुन्हा आपला मोर्चा ऊस पिकाकडे वळविला आहे. शासनाने केळी पिकाला हमीभाव देण्याची गरज आहे अन्यथा भविष्यात केळी पीक अडचणीत येण्याची शक्यता आहे.



# मोडनिंब येथील उड्डाण पुलावरून ट्रेलर कोसळला; चालक सुखरूप

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.२४ नोव्हेंबर-**

सोलापूर-पुणे महामार्गावर मोडनिंब (ता. माढा) येथे उड्डाणपुलावरून कंटेनर वाहतूक करणारा ट्रेलर खाली कोसळला. पहाटे पावणे पाचच्या सुमारास सोलापूरहून पुण्याकडे कंटेनर वाहतूक करणारा रिकामा ट्रेलर (क्र. सीजे ३९ सी २७००) जात असताना उड्डाणपुलावर आल्यानंतर चालकाचा वाहनावरील ताबा सुटला. त्यानंतर दुभाजक ओलांडून विरुद्ध दिशेच्या बाजूने हा ट्रेलर पुलावरून अर्धवट अवस्थेत खाली कोसळला. केबिन व पुढील बाजू पुलाखाली, तर मागील बाजू पुलावर लोंबकळलेल्या अवस्थेत राहिली आहे.

प्रचंड मोठा अपघात होऊनही चालकास कोणतीही दुखापत झाली नाही. कोसळलेला ट्रेलर व पुलाच्या भिंतीमधील गॅपमध्ये चालकाचे केबिन कोसळल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही.ट्रेलर आणि पुलाच्या भिंतीमधील मोकळ्या जागेत केबिन कोसळल्याने मोठी जीवितहानी टळली.अपघातात ट्रेलरचे मोठे नुकसान झाले आहे.घटनास्थळी वाहनतळ व्यवस्था बिघडू नये म्हणून पोलिसांनी तत्काळ धाव घेऊन वाहतूक सुरळीत केली.

# जेऊरवाडीत नवनियुक्त अग्निवीर जवानांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि.२४ नोव्हेंबर-**

भारतीय सैन्यदलात निवड झाल्याबद्दल आठ अग्नीविरांचा जेऊरवाडी येथे सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेऊर येथील भारत महाविद्यालयाचे प्राचार्य अनंत शिंगाडे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र केसरी चंद्रासबापू नेमगिरी व मुंबई महापौर केसरी विजय गुटाळ उपस्थित होते

येथील योद्धा करिअर अकॅडमी मध्ये भरतीपूर्व प्रशिक्षण घेतलेल्या ८ विद्यार्थ्यांची भारतीय सैन्यदलात अग्नीवीर म्हणून निवड झाली आहे याबद्दल त्यांचा सन्मान अकॅडमीच्या वतीने करण्यात आला. यशस्वी विद्यार्थ्यांचे हलगीच्या निनादात परिसरातून मिरवणूक काढण्यात आली यावेळी बोलताना प्राचार्य शिंगाडे म्हणाले की अकॅडमीचे संस्थापक सुभेदार मेजर विलास देवबा नाईकनवरे यांच्या शिस्तीमुळेच आज विद्यार्थी घवघवीत यश मिळवत आहेत आयुष्यात जर सक्सेस व्हायचं असेल तर शिस्त सर्वात महत्त्वाची आहे. यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये तुषार राजमाने, रोहित बेरे, रोहित सकपाळ, श्याम हवालदार, जयदीप पिसे हर्षद शिंदे दिनेश कदम व यश घुले अशा आठ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून देश सेवेचा व्रत हाती घेतला आहे सलाम त्यांच्या कर्तुत्वाला तसेच पुढील वाटचालीसाठी त्यांना खूप खूप शुभेच्छा मान्यवरांनी दिल्या यावेळी टाकळीचे सरपंच उमाकांत राजमाने उपळवटेचे सरपंच राहुल घाडगे सोनू होनमाने घाडगेसर यांच्यासह शिक्षक उपस्थित होते.

# मुनीमाने केला ११ लाख ७० हजारांचा अपहार

### आडत व्यापाऱ्याच्या नावावर भुसार मालाची खरेदी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२४ नोव्हेंबर-**

शहरातील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये अडत व्यापाऱ्याच्या नावावर परस्पर भुसार मालाची खरेदी केली आणि व्यापाऱ्याच्या खात्यातून ११ लाख ६९ हजार ४७० रुपये व्यापाऱ्यास दिले. संबंधित मालाची परस्पर विल्हेवाट लावून रकमेचा अपहार केल्याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात मुनीम विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

सागर लक्ष्मण फपाळ (रा.फपाळवाडी, ता. बार्शी) असे गुन्हा दाखल झालेल्या मुनीमचे नाव आहे. व्यापारी सचिन देविदास मडके (वय ४२, रा. दत्तनगर) यांनी फिर्याद दाखल केली. ही घटना २४ एप्रिल ते २ नोव्हेंबर २०२५ दरम्यान घडली.

फिर्यादीत म्हटले आहे, की मार्केट यार्डमध्ये प्लॉट नं. ११२ येथे सचिन देविदास मडके नावाने आडत दुकान असून, भुसार माल, चिंच, तूर वगैरे खरेदीचा अधिकृत परवाना आहे. दुकानात २०१६ पासून इतर मुनिमांप्रमाणेच सागर फपाळ मुनीम म्हणून कामास होता. तो खरेदी-विक्रीचा व्यवहार पाहात असे. बाजारातून माल खरेदी करण्याचे काम त्याच्याकडे सोपविले होते. १५ ऑक्टोबर २०२५ रोजी दुकानातील मुनिमामार्फत दुकानातील स्टॉकची तपासणी केली असता, स्टॉकमध्ये कमतरता आढळून आली. त्यानंतर १५ ते १७ ऑक्टोबर

२०२५ पर्यंत संपूर्ण स्टॉकची व खरेदी केलेल्या मालाची पडताळणी केली असता, २६ एप्रिल ते २ नोव्हेंबर २०२५ दरम्यान अन्नपूर्णा ट्रेडिंग कंपनी (कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी मार्केट यार्ड गाळा नं. ५८) यांच्याकडून उडीद, तूर, चिंच असे माल खरेदी केल्याच्या खरेदी पावत्या निदर्शनास आल्या. हा माल सागर फपाळ याने खरेदी केला होता. त्याने खरेदी केलेल्या मालाची गोदामामध्ये पाहणी केली असता माल आढळून आला नाही. मालाची खरेदी रक्कम अन्नपूर्णा ट्रेडिंग कंपनीस चेकने देण्यात आली होती. तसेच अन्नपूर्णा ट्रेडिंग कंपनीचे चालक शंतनू सागर रोडे व त्यांचे मुनीम शुभम काळे यांनी सांगितले की, माल हा सागर फपाळ यांनी खरेदी केल्याचे व खरेदी रक्कमही चेक स्वरुपात अदा करुन माल घेऊन गेल्याचे सांगितले.

# कासेगावात आजपासून खंडोबा यात्रेस सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ नोव्हेंबर-**

कासेगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथे चंपाषष्ठीनिमित्त श्री खंडोबा यात्रेस मंगळवार दि.२५ नोव्हेंबरपासून सुरूवात होत आहे.

यानिमित्त मंदीरात घटस्थापना करण्यात आली असून दररोज गावातील एका मंडळाकडून माळ घालण्याचा विधी करण्यात आला. यात्रेनिमित्त मंगळवारी नागदिवे असल्याने घराघरातून नैवेद्य तसेच वारूवाल्यासंह मिरवणूकीने खंडोबा मंदीरात जागरण होणार आहे. बुधवारी चंपाषष्ठीदिवशी सकाळी महाभिषेक, नैवेद्य महारती होणार आहे. रात्री खंडोबाची छबीना मिरवणूक निघणार आहे. पहाटे मंदिरात लंगर तोडण्याचा विधी होणार आहे. बुधवारी दि.२६ रोजी कुस्ती स्पर्धेने सांगता होणार आहे.

# शिवसेना कामगार युवासेना जिल्हा उपाध्यक्षपदी आदित्य जाधव

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२४ नोव्हेंबर-**

शिवसेना श्रमिक राष्ट्रीय युवा कामगार सेना जिल्हा उपाध्यक्षपदी आदित्य जाधव यांची निवड करण्यात आली. सदर निवड प्रदेश सचिव अमित भटनागर यांनी केली. हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांच्या आशीर्वादाने, शिवसेना मुख्यनेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे व श्रमिक राष्ट्रीय कामगार सेना प्रदेश कार्याध्यक्ष बाबासाहेब चव्हाण यांच्या शिफारसीनुसार ही निवड करण्यात आली. कामगार सेना सोलापूर जिल्हाध्यक्ष अमोल जाधव, तालुका अध्यक्ष दादासाहेब तनपुरे, भीमराव नाळे, चेतन आव्हाड, मजनू शेख, गणेश झिंजाडे, अमोल भोसले, अविष्कार वाघमारे, राज भोसले, मदन अडसूळ आदि शिवसैनिक उपस्थित होते.



# ऐतिहासिक सायकल राईडमध्ये श्रीपूरच्या तरुणांचा सहभाग

### जगातील सर्वात उंच(१८० फूट) छ.संभाजीराजेंच्या पुतळ्यास केले अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. २४ नोव्हेंबर-**

श्रीपूर (ता. माळशिरस) येथील कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे कर्मचारी व स्थानिक तरुणांनी पुणे येथील ऐतिहासिक सायकल राईड मध्ये सहभाग नोंदवत जगातील सर्वात ऊंच छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन केले.

कारखान्याचे चेअरमन माजी आ. प्रशांत परिचारक, कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांच्या प्रेरणेने व वैद्यकीय अधिकारी डॉ. सुधीर पोकळे यांच्या मार्गदर्शनाखाली पांडुरंग सायडर्स विविध सामाजिक अभियानात सहभागी होत असतो. पिंपरी चिंचवड (पुणे) येथील आ. महेश लांडगे यांनी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा जगातील सर्वात उंच १८० फूट उंचीचा पुतळा उभा करणेचे ऐतिहासिक काम चालु केले आहे. या



पार्श्वभूमीवर आ.लांडगे यांनी इंद्रायणी नदी स्वच्छता मोहीम, पर्यावरण पुरक निरोगी जीवनशैली प्रसारित करण्यासाठी पिंपरी-चिंचवड रिव्हर सायक्लोथॉनचे रविवार दि.२३ नोव्हेंबर रोजी आयोजन केले होते.

> **आम्ही कृतकृत्य झालो**
>
> आ. महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या ऐतिहासिक अभिनव उपक्रमात पांडुरंग परिवाराचे प्रशांतराव परिचारक, कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी व डॉ. सुधीर पोफळे यांच्यामुळे आम्हाला ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होता आले. त्यामुळे कृत कृत्य झाल्याचे समाधान आहे.
>
> **- देशभूषण धाईंजे, संयोजक**

या अनुषंगाने आ. लांडगे यांनी पंढरपूर, भिमाशंकर व शिवनेरी अशी जगातील सर्वात मोठ्या वार्षिक पर्यावरण सायकल रॅलीचे आयोजन केले होते. मोठ्या संख्येने सायकल रायडर्सना या रॅलीत सहभागी झाले होते. त्या आवाहनास प्रतिसाद देत पांडुरंग रायडर्सच्या देशभुषण मधुकर धाईंजे, सुभाष पवार व संतोष लोंढे यांच्या नेतृत्वाखाली आनंद दंदाडे, अब्बास सावंत, राहुल थिटे, ऋषिकेश शिन्दे, वैभव गणगे, हर्षवर्धन चोथे, समर्थ मिस्कर, सोहम जगधने, पारस दोशी, आरव सुर्वे, आदित्य पोखरे, मयांक पोखरे, मिथीलेश गायकवाड, वेदांत लोखंडे यांनी सहभाग घेतला.